॥ श्रीगुरुदत्तात्रेय प्रसन्न ॥

श्रीक्षेत्र

# गाणगापूर-वर्णन.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं. 903



REFBK-0005539

किंमत ६ आणे

703

॥ श्रीदत्तात्रेय प्रसन्न ॥

श्रीक्षेत्र

# गाणगापूर-वर्णन.



प्रकाशक—रामभट गुरुभट पुजारी.

लेखक—कृष्णंभट नरहरभट पुजारी.

संपादक—गु

दुधनी.

REFBK-0005539

न निश्चय व ग्रा टळो ॥
न चित्त भजनीं चळो । मति सदुक्तिमार्गीं वळो ॥
स्वतत्त्व हृदयीं कळो । दुरभिमान सारा गळो ॥
पुन्हां न मन हें मळो । दुरित आत्मबोधें जळों

श्री. मोरोपंत.

आवृत्ति सहावी.

शके १८५८ ] किंमत ६ आणे. [ इ. स. १९३६

प्रकाशक—
**रा. रा. रामभट गुरुभट पुजारी**, यांनीं हें पुस्तक
श्रीक्षेत्र गाणगापूर येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रक--
**रा. रा. शंकर नरहर जोशी**, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.

ॐ


# अर्पणपत्रिका

श्रीसद्गुरु श्रीमन्नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांच्या कृपाप्रसादानें ह्या अज्ञ बालकास लिहिण्याची स्फूर्ति झाली व ज्या सद्गुरूंनीं ही अल्प सेवा पात्र नसतां माझ्याकडून घेतली, त्या दयाघन प्रभूस मी अत्यंत भक्तिपूर्वक अंतःकरणानें हें पुस्तक अर्पण करीत आहें.

५५३८

दास,

कृष्णंभट नरहरभट पुजारी.



## केसरीचा अभिप्राय.

श्रीक्षेत्र

# गाणगापूरवर्णन.

( लेखक--कृ. न. पुजारी, प्र. रा. गु. पुजारी.
गाणगापूर, पो. दुधनी, किं. ६ आणे )

दत्तभक्तांना आवश्यक अशी विविध माहिती या पुस्तकांत संकलित केलेली आहे. गाणगापुराला जाण्याचे मार्ग, तेथें पाहाण्याचीं स्थानें, करण्याचे विधी वगैरे तांत्रिक हकीगत आरंभीं दिलेली असून तेथें होऊन गेलेले सत्पुरुष नरसिंहसरस्वती यांचें चरित्र संत-सहज चमत्कारांसह भाविकपणानें लिहिलेलें आहे. शेवटीं दत्ताच्या आरत्या, संस्कृत अष्टकें, आधुनिक चालींतील पदें यांचा मोठा संग्रह जोडलेला आहे. दत्तात्रेयाचे व संगमाचे फोटो दिलेले असल्यानें पुस्तक दत्तसेवकांस अधिकच प्रिय होईल.

# सहाव्या आवृत्तीची प्रस्तावना.

## श्रीदत्तप्रसन्न.

गेल्या ता. १९।१।१९३० रोजीं " श्रीक्षेत्र गाणगापूर वर्णनाच्या " दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिण्याची संधि मिळाली होती. त्यानंतर लागोपाठ तीन आवृत्ती अल्पावधींतच खपून सहावी आवृत्ति काढण्याचा सुप्रसंग इतक्या लवकर येईल असा भरंवसा नव्हता. परंतु दयाघन श्रीदत्तात्रयप्रभूची लिला अगाध आहे. तीं पुस्तकें फारच थोड्या अवकाशांत खपलीं, इतकेंच नव्हे तर, त्याकरितां कित्येक भक्तांची निकडीची मागणी आल्यामुळें ही साहवी आवृत्ति छापून प्रसिद्ध करणें भाग पडलें आहे. सदर आवृत्तींत म्हणण्यासारखा विशेष फरक नाहीं. फक्त किरकोळ पदें बदलून नवीं घातलीं आहेत. भजनें नवीन घातलेलीं आहेत व तसेंच ५२ श्लोकी गुरुचरित्र दिल्यामुळें वाचक—भक्तांस श्रीगुरुलीलेचें स्मरण थोडक्यांत होणार आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर श्रीदत्ताचे नयन-मनोहर फोटो घातल्यामुळें बाह्य स्वरूप फारच आकर्षक झालें आहे. तथापि किंमत पूर्वीप्रमाणेंच सहा आणे ठेविली आहे. भक्तगण या पुस्तकाचा स्वीकार करून लेखकांस व संपादकांस प्रोत्साहन देतील असा भरंवसा वाटतो. सर्वांस सर्वप्रकारें प्रेरणा करणारा तो जगज्जीवन प्रभु श्रीगुरुदत्तात्रेय महाराज पूर्ण समर्थ आहे.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

एम्. एल्. ए.

पहिल्या प्रतिचे सरदार व जहागीरदार, डेक्कन.

॥ श्रीदत्तः शरणं मम ॥

ॐ तत्सत्.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना ... ... .. ... | पृष्ठ |
| २ | विषय–प्रवेश ... ... .. ... | १ |
| ३ | क्षेत्रांत जाण्याचा मार्ग ... .. ... | २ |
| ४ | यात्रिकरूंसंबंधीं व्यवस्था ... .. ... | ३ |
| ५ | क्षेत्रांत करण्यासारख्या गोष्टी ... .. ... | ४ |
| ६ | क्षेत्र व मठवर्णन ... .. ... | ६ |
| ७ | संगमवर्णन ... ... .. ... | ८ |
| ८ | अष्टतीर्थमाहात्म्य ... .. ... | ९ |
| ९ | रोजचा कार्यक्रम ... ... .. ... | ११ |
| १० | वर्षातील उत्सव ... .. ... | १३ |
| ११ | मुख्य उत्सववर्णन ... .. ... | १५ |
| १२ | संक्षिप्त गुरुचरित्र ... ... .. ... | १८ |
| १३ | महाराजांच्या पट्टशिष्यांची माहिती .. ... | २४ |
| १४ | सद्यःस्थिति ... ... .. ... | २५ |
| १५ | उपसंहार ... ... .. ... | ३० |
| १६ | भूपाळ्या ... ... .. ... | ३१ |
| १७ | काकड– आरत्या... .. .. ... | ३३ |
| १८ | सात वारांच्या आरत्या ... .. ... | ३५ |
| १९ | करुणात्रिपदी ... ... .. ... | ५५ |
| २० | विडा, शेजारती ... ... .. ... | ५६ |
| २१ | पालखीपुढें म्हणण्याची सांप्रदायिक पदें .. ... | ६० |
| २२ | पदें ... ... ... .. ... | ६५ |
| २३ | पंचपदी .. ... .. ... | ७८ |
| २४ | नित्यपाठ, बावन्न श्लोकी गुरुचरित्र .. ... | ८१ |
| २५ | स्तोत्रें... ... ... .. ... | ८५ |
| २६ | पाळणा ... ... .. ... | ९० |
| २७ | प्रार्थना ... ... .. ... | ९० |



श्रीमन्नरसिंहसरस्वतीच्या मठांतील फोटो.



मठांतील श्रीदत्ताचा फोटो.

॥ श्रीदत्त प्रसन्न ॥

श्रीक्षेत्र

# गाणगापूरवर्णन.

## विषय-प्रवेश.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

गीता अ. ४, श्लोक ७–८.

ज्या ज्या वेळेस धर्माचें पाऊल मागें पडत जाईल, ज्या वेळेस धर्मावर चोहोंकडून परधर्मीयांचे हल्ले चढत जातील व ज्या वेळेस एका नारायणावांचून धर्मास कोणीच त्राता राहाणार नाहीं, अशा वेळेस भगवान् श्रीकृष्णांनीं सर्वांस असें शुभ आशीर्वचन देऊन ठेविलें आहे कीं, अशा आणिबाणीच्या प्रसंगीं मी जातीनें मनुष्यदेहानें या मृत्युलोकावर अवतीर्ण होऊन दुष्टांचें शासन, सज्जनांचें पालन व धर्माचें रक्षण करीत जाईन; आणि ह्या वचनाप्रमाणें परमेश्वरानें कैकवेळां मानवस्वरूप धारण करून सर्व विश्वाचें कल्याण केलें आहे.

सुमारें दीडहजार वर्षांपूर्वीं असाच एक धर्मग्लानीचा प्रसंग आला होता. त्यावेळेस आमचा सनातन वैदिक धर्म अस्तंगत होण्याच्या पंथास लागला होता. भरतखंडावर जिकडे दृष्टि फेंकावी, तिकडे बौद्धधर्माचा झेंडा फडकत असलेला दिसत होता. अशा कठीण परिस्थितींत प्रत्यक्ष परमेश्वरानें ‘ जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्य ’

या नांवानें अवतरून, बुडत असलेल्या हिंदुधर्मास सांवरून धरलें; आणि पाखंडी मतांचें खंडन करून व चतुर्थाश्रमाची थोरवी पटवून देऊन त्याप्रमाणें वागण्याचा रस्ता दाखवून दिला. त्यानंतर पुष्कळ काळपावेतों वैदिकधर्माचा प्रभाव पुन्हां हिंदुस्थानांत प्रस्थापित झाला होता; व त्यानंतर चारपांचशें वर्षांमागें अशी परिस्थिति प्राप्त झाली होती कीं, पुन्हां संन्यासाश्रमाला उत्तेजन देणारा अवतारी पुरुष निर्माण होण्याची आवश्यकता भासूं लागली. त्यावेळेस श्रीदत्तात्रेय '**श्रीमन्नरसिंहसरस्वतीस्वामीमहाराज**' या रूपानें प्रगट झाले. श्रींनीं बालवयांतच संन्यासाश्रम धारण करून चतुर्थाश्रमाचा उद्धार केला. मग पुढें काशी, गया, प्रयाग, बदरीकेदार, वाडी, औदुंबर इत्यादि क्षेत्रें फिरत फिरत, मार्गीं भेटतील त्यांचा उद्धार करीत श्रींची स्वारी शेवटीं गाणगापुरास आली; व तें ठिकाण अनुष्ठान करण्यास योग्य वाटल्यावरून श्रींनीं तेथेंच कायमची वस्ती केली व सहज लीलेनें कित्येक गृहस्थाश्रमी लोकांना, विरक्तांना व तपस्व्यांना आपल्या अंगीं वसत असलेल्या अचाट सामर्थ्यानें नानाविध चमत्कार दाखवून दिपवून टाकिलें.

अनेक प्रमुख तीर्थें सोडून, स्वामीमहाराजांनीं गाणगापुरासच वास्तव्य कां केलें व तें ठिकाण कोणत्या देशविभागांत व कोठें आहे याचा दत्तभक्तांस उलगडा व्हावा व श्रीनरसिंहसरस्वतींच्या चरणीं अंशतः तरी सेवा घडावी या उद्देशानें प्रस्तुत प्रसंगीं '**गाणगापूर-वर्णन**' हें पुस्तक लिहिण्याचें कार्य हातीं घेत आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या उक्तीप्रमाणें कर्म करणें ही मनुष्याच्या हातची गोष्ट आहे; परंतु त्यांत यश देणें किंवा न देणें हें सर्वस्वीं परमेश्वराच्या स्वाधीन आहे.

## श्रीक्षेत्र गाणगापुरास जाण्याचा मार्ग.

श्रीक्षेत्र गाणगापूर हें निजामच्या राज्यांत पायगा इलाख्यामध्यें

आहे. या गांवचा गुलबुर्गा जिल्ह्यामध्यें समावेश होतो.

हें क्षेत्र मुंबईहून रायचूरकडे जाणाऱ्या जी. आय्. पी रेल्वेवरील सोलापूर स्टेशनापासून आठवें ' गाणगापूर ' नांवाचें स्टेशन आहे. जाणाऱ्या येणाऱ्या सर्वच गाड्या येथें उभ्या रहातात. स्टेशनापासून क्षेत्र चौदा मैल अंतरावर आहे. यात्रेकरूंना स्टेशनावर उतरण्याकरितां धर्मशाळा असून ती श्रीमदद्वैतानंद बालब्रह्मचारीबुवा यांनीं बांधविली. स्टेशनावर बरीच वस्ती आहे. क्षेत्रास जाण्याकरितां गाड्या व घोडीं मिळूं शकतात. पावसाळा खेरीजकरून मोटारहि चालू असते. दर माणशीं मोटारभाडें बारा आणे व केव्हां केव्हां त्याच्यापेक्षां कमीहि पडतें. निजाम इलाख्यांत जकात–खातें असल्यामुळें यात्रेकरूंना स्टेशनाबाहेर चौकीवर आपापलें गाठोडें सोडून दाखवावें लागतें. नवीं वस्त्रें अगर जिन्नस आढळल्यास रुपयास एक आणाप्रमाणें जकात वसूल करतात. स्टेशन सोडल्यावर तीन मैलांवर एक ओढा लागतो; नंतर दोन मैलांवर दिक्संगी नांवाचें खेडें लागतें. पुढें तीन मैलांवर मदरी व नंतर दोन मैलांवर चौडापूर अशीं खेडीं लागतात. ( चौडापुरास येथील श्रीमंत नरहरराव चौडापूरकर जहागीरदार हे अडलेल्या प्रवाश्यांची जेवणाची व इतर कांहीं गैरसोय असल्यास दूर करतात. ) चौडापूरपासून श्रीक्षेत्र गाणगापूर चार मैल लांब आहे.

## यात्रेकरूसंबंधीं व्यवस्था.

गांवांत येऊन पोहोंचल्यावर तेथील पुजारीमंडळी यात्रेकरूंचें नांव, आडनांव व राहण्याचें गांव विचारून आपापल्या वहींत शोध करून पाहातात. यात्रेकरूंच्या नातलगांपैकीं किंवा वंशांतील जवळचें एखादें नांव निघाल्यास तो पुजारी त्यास आपल्या बिऱ्हाडीं नेऊन शक्य तितकी व्यवस्था ठेवण्याची काळजी घेतो. एखाद्या वेळेस

असेंहि होतें कीं, यात्रेकरूंच्या स्वकीयांचें नांवच सांपडत नाहीं. तेंव्हां तेथील नियमाप्रमाणें ज्याची क्रमानें वांटणी असेल त्या पुजाऱ्यांकडे यात्रेकरूंना आपली सोय करून घ्यावी लागते. इतरांना यजमानकृत्य करण्याचा हक्क नाहीं.

ह्या क्षेत्रांत तीन हक्कदार पुजारी आहेत ते येणेंप्रमाणें:—

**१ उपाध्याय, २ जोशी व ३ हक्कदार सालकरी.**

**त्यांचीं अनुक्रमें कर्तव्यें:—**

**१ उपाध्याय:**—हे यात्रेकरूंना आपल्या घरीं नेऊन त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय करतात. यात्रेकरूंना जर नैवेद्य, ब्राह्मणभोजन किंवा सेवेकरी लोकांस माधुकरी घालणें असेल, तर ती व्यवस्था उपाध्यायासच करावी लागते.

**२ जोशी:**—हे यात्रेकरूंना संगमावर नेऊन त्यांची मर्जी असल्यास स्नानसंकल्प, वायंदान, गोप्रदान आणि अष्टतीर्थस्नान इत्यादि धार्मिक कृत्यें करवितात. लग्न, उपनयन किंवा जावळ इत्यादि देवळांत झालेल्या शुभकार्यांचा कर जोश्यांनाच मिळतो.

**३ सालकरी हक्कदार:**—हे यात्रेकरूंना दर्शन, पूजा, महापूजा अथवा पालखी इत्यादि कृत्यें करवितात.

## क्षेत्रांत करण्यासारख्या श्रेयस्कर गोष्टी.

या क्षेत्रांत बाराहि महिने सेवेकरी लोक वांच्छितकामना पूर्ण करून घेण्यासाठीं श्रींपाशीं सेवा करीत असतात. निरनिराळ्या प्रांतांतले नाना वर्णांचे दत्तभक्त, शारीरिक क्लेशांमुळें अगर अन्य सांसारिक अडचणींमुळें त्रासून गाणगापुरास येऊन सेवा करीत असतात. कित्येक गुरुचरित्रसप्ताह करतात; कित्येक प्रदक्षिणा घालतात व कैक लोक नुसतें नामस्मरण करीत असतात. सारांश, ज्यांना जशी सेवा श्रेयस्कर वाटते, त्याप्रमाणें ती करून श्रींची कृपा संपादन करतात. मोठमोठ्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें अन्नछत्रें व सदावर्तें

आहेत, त्याप्रमाणें तीं येथें नसल्यामुळें सेवेकरी लोकांची थोडीशीं गैरसोय होते. मध्यान्हकाळीं महानैवेद्य झाल्यावर सेवेकरी लोक येथील पुजाऱ्याकडे माधुकरीस जातात. त्यावेळेस जेवढी भिक्षा मिळेल तेवढ्यावरच त्यांना आपली क्षुधा भागवावी लागते. कित्येक लोक केवळ भिक्षेवरच अवलंबून न राहतां घरीं स्वयंपाक करून जेवावयाच्या वेळीं माधुकरीचा प्रसादहि घेतात. कारण

**दत्त गोरक्ष आदी करूनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।**
**निःस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होय ॥**

दासबोध, दशक १४, समास २.

म्हणून येथें भिक्षेचें महत्त्व फार आहे. तेव्हां येथें येणाऱ्या यात्रेकरूंनीं येथें माधुकरी घालणें ही एक श्रेयस्कर बाब आहे.

कित्येक दत्तभक्तांस येथें वारंवार येणें होत नाहीं व त्यांना तर माधुकरी घालण्याची उत्कट इच्छा असते; अशा परिस्थितींत कोणी तरी स्वार्थसाधु गाणगापुराचें नांव पुढें करून सेवेकरी लोकांच्या भिक्षेप्रीत्यर्थ वर्गणी जमवीत असतो. एकदोन वर्षांपासून श्रीपाद नारायण जोशी हीच व्यक्ति दत्तात्रय शंकर जोशी गाणगापूरकर, असें निरनिराळ्या प्रसंगीं भिन्नभिन्न नांवें धारण करून होती; त्यांनीं वऱ्हाड, खानदेश इत्यादि ठिकाणीं हिंडून, छापील पावत्या देऊन शेंकडों रुपये जमविले आहेत. त्याचा येथील सेवेकरी लोकांस कांहीं उपयोग झाला नाहीं व होत नाहीं. तरी यापुढें दत्तभक्तांस धोक्याची सूचना ही आहे कीं दिलेल्या द्रव्याबद्दल छापील पावती मिळते, एवढ्यावरून तें द्रव्य सत्कार्यींच पडेल असा विश्वास बाळगूं नये. आपणांस माधुकरीप्रीत्यर्थ द्रव्य पाठवावयाचें असल्यास तें येथील आपल्या उपाध्यायाकडे पाठवावें. उपाध्याय नसल्यास '**गाणगापूरवर्णन**' ऑफिसच्या पत्त्यावर क्षेत्रमजकुरीं पाठवावें. म्हणजे त्याचा सदुपयोग होईल. ब्राह्मणभोजन व माधुकरी इत्यादि अन्नदानासंबंधीं व संगमा-

चर स्नानसंकल्प, वायनदान इत्यादि दानांसंबंधीं अमुकच खर्च करावा लागेल, असें कांहीं नक्की सांगतां येत नाहीं; कारण ही गोष्ट सर्वस्वीं यात्रेकरूंच्या मर्जीवर व सांपत्तिक स्थितीवर अवलंबून आहे. पण गांवांतील मठांत मात्र देवदर्शन व पूजा यासंबंधीं पुजाऱ्यांच्या अनुमतें पंचांनीं ठरविलेले नियम आहेत, ते येणेंप्रमाणें:—

निर्गुण पादुकांची पूजा करण्यास एक १ रुपाया; तुळसीपत्र वाहण्यास चार आणे; कापूरआरतीस चार आणे; महापूजा (देवपाटाच्या आंत) तीन रुपये व (आहेर) पांच रुपये. देवाची पालखी काढण्यास दहा रुपये. येणेंप्रमाणें कर्मीतकमी अर्पण करावे लागतात.

## क्षेत्र व मठवर्णन.

क्षेत्राच्या पूर्वेस दोन फर्लांगांवर कल्लेश्वर नांवाचें देवस्थान आहे. दक्षिणेस भीमा नदीचा प्रवाह संथपणें वाहत आहे व जवळच केशवदेव व चक्रेश्वर हीं देवस्थानें आहेत. पश्चिमेस सुमारें एक मैल अंतरावर भागीरथीतीर्थ व विश्रांतिकट्टा असून उत्तरेस तंतुकाचें देवालय आहे. येणेंप्रमाणें या गांवची चतु:सीमा पवित्र स्थानांनीं वेष्टिलेली आहे, व गांवच्या मध्यभागीं श्रीमन्नरसिंहसरस्वती दत्तमहाराजांचा मठ आहे.

ह्या गांवांत दोनअडीचशें घरें असून त्यांत पुजारी व इतर सुखवस्तु मिळून पंचवीस घरें ब्राह्मणांचीं आहेत; पांचसहा भुसारमालाचीं दुकानें आहेत. एक पोलीस-चौकी आणि श्रीदत्त मोफत वाचनालय असून तेथें फक्त धर्मग्रंथ वाचावयास मिळतात. येथें पोष्टाची थोडीशी गैरसोय आहे; कारण येथून पंधरा मैलांवर असलेल्या दुधनी या गांवीं ब्रिटिश ब्रँच पोष्ट—ऑफिस आहे; तेथून आठवड्यांतून दोन वेळां पोष्टमन येऊन डिलिव्हरी करून जातो. तसेंच मोंगलाई पोष्ट अफजलपूर येथें असून तेथूनहि पोष्टमन येत असतो.

मठाच्या पश्चिमद्वारासमोर गणपतीचें देवालय व त्याच्याजवळ एक धर्मशाळा आहे. ती हैद्राबाद येथील कै० चिंदबरराव मनसबदार यांनीं बांधविली आहे व जवळच आणखी एक मोठी इमारत असून ती मुंबईचे माईनकर यांनीं अन्नछत्राकरितां बांधविलेली आहे.

**मठवर्णनः**—मठाच्या पूर्वेस व पश्चिमेस दोन महाद्वारें आहेत. त्यांपैकीं पश्चिमेकडील महाद्वार पाडून त्या जागीं नवीन व मोठें शोभिवंत महाद्वार व नगारखाना हीं सोलापूर येथील साधु भीमाशंकर आप्पामहाराज यांनीं बांधविलीं आहेत.

**मठाच्या आवारांत असलेलीं देवस्थानेंः**—मठाच्या पूर्वेस महादेव व पादुका आहेत. दक्षिणेस औदुंबर व त्याखालीं गणपती, महादेव व पार्वती यांच्या मूर्ति आहेत. पश्चिमेस अश्वत्थ वृक्ष होता, तो नुकताच पडून गेला आहे; आणि त्या जागीं आतां नवीन अश्वत्थ वृक्ष लाविलेला आहे. पारासभोंवतीं नागनाथ, मारुती व तुळशीवृंदावन हीं आहेत. ह्याच अश्वत्थ वृक्षावर पूर्वीं ब्रह्मराक्षस राहात होता ( गु. च. अ. २३ ). उत्तरेस मारुतीचें देवालय, गणपती व अश्वत्थ वृक्ष हीं आहेत.

पूर्वद्वारांतून प्रवेश केल्यानंतर पांच ओंवऱ्या लागतात. ह्याशिवाय पश्चिमेस एक व उत्तरेस सात अशा ओंवऱ्या आहेत. येथें सेवेकरी लोक अनुष्ठान करीत असतात. मठासमोर सागवानी लाकडाचा मंडप आहे. तो पुण्याचे कै. श्रीमंत बाळासाहेब रास्ते यांनीं बांधविला. मंडपांत संगमरवरी दगडाची फरशी आहे. ती श्रीमंत नाना मोतीराम पाटील बलवाडीकर यांनीं नवसानें पुत्र झाला म्हणून बांधविली आहे. मठांत पश्चिमेस एका कोनाड्यांत श्री. विघ्नहर चिंतामणीची वालुकायम मूर्ति आहे. ग्रामाधिपतीच्या आग्रहावरून मठप्रवेश करतेवेळीं महाराजांनीं स्वहस्तें ह्या मूर्तीची स्थापना करून नंतर

मठप्रवेश केला आहे. म्हणून ज्याप्रमाणें महाराजांची त्रिकालपूजा होऊन महानैवेद्य होतो, त्याप्रमाणें या श्रीविघ्नहर गणपतीचें त्रिकाल पूजन व महानैवेद्य होत असतो. श्रीविघ्नहर चिंतामणीच्या समोर एक दरवाजा आहे. त्याची चौकट व उंबरठा राणीबेन्नूर येथील रहिवाशी कै. श्रीपाद नाईक यांनीं चांदीनें मढविलेला आहे. या दरवाज्यांतून मुख्य गाभाऱ्यांत प्रवेश करण्याचा मार्ग आहे. या दरवाज्याच्या उत्तरेस भिंतींत एक झरोका असून तो सोलापूर येथील दत्तभक्त बॅरिस्टर दिवाकर यांनीं चांदीनें मढवलेला आहे व त्यांतून मुख्य गाभाऱ्यांतील त्रैमूर्तीचें दर्शन होतें. आंतील देव्हाऱ्यांत महाराजांनीं स्वहस्तें ठेवलेल्या पादुका निर्गुण आहेत. गाणगापुरास आज जें एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें या पादुकांमुळेंच होय. ह्या पादुकांत महाराजांचें साक्षात् वास्तव्य आहे. ह्या पादुका मूळ कोणत्या स्वरूपांत आहेत. ह्याचा अजून कोणासहि थांग लागला नाहीं. कित्येक विभूतींना ह्यांतून प्रत्यक्ष दर्शन घडलें आहे. ह्या पादुकांस पाण्याचा स्पर्श नाहीं. फक्त केशर, कस्तुरी, अष्टगंध व अत्तर इत्यादि सौगंधिक द्रव्यांचा त्यांवर लेप होत असतो.

**संगमवर्णनः**—भीमा आणि अमरजा या दोन नद्यांचा संगम गांवाच्या नैर्ऋत्य दिशेस दोन मैलांवर आहे. संगमास जाण्याचा रस्ता नदीच्या किनाऱ्यानें गेलेला आहे. गांव व संगम यांच्या दरम्यान एक मैल अंतरावर भागीरथी तीर्थाचा ओढा लागतो; यापुढें नजीकच एक टेंकडी असून तेथें नागनाथाचें देवालय आहे. येथेंच सायंदेवास आपल्या अंगावर दोन सर्प धावून येत असलेले दृष्टीस पडले ( गु. च. अ. ४० ). येथून जवळच श्रीगुरुमहाराजांच विश्रांतिस्थान आहे. महाराज संगमावरून गांवांत जातांयेतांना ह्या कट्ट्यावर बसत असत. हा कट्टा, ज्या शूद्राचें शेत महाराज्यांच्या कृपेनें जास्त पिकलें त्या शेतांत आहे. तेथून पुढें संगमा-

जवळ गेल्यावर एक भस्माचा डोंगर दिसतो. त्यांतून प्रतिवर्षीं हजारों लोक भस्म नेतात. परंतु चमत्कार हा कीं, येथील भस्म कमी होत नाहीं. प्रथम संगमेश्वराचें देवालय लागतें व तेथून थोड्याच अंतरावर पूर्ववाहिनी अमरजा व उत्तरवाहिनी भीमा या दोन नद्यांचा संगम झाला आहे. संगमेश्वराच्या देवळापुढें पूर्वाभिमुख महाराजांचें देवालय आहे. ह्या ठिकाणी पूर्वीं एक मोठा अश्वत्थ वृक्ष होता व ह्या वृक्षाखालीं महाराज अनुष्ठानास बसत. तो वृक्ष पडून गेल्यावर त्या जागेवर पादुका व लिंग स्थापन करून पुण्याचे कै० श्रीमंत सरदार बाळासाहेब रास्ते यांनीं देऊळ बांधविलें आहे. देव्हाऱ्यांत त्रयमूर्ति दत्ताचें दर्शन होतें व तेथील पूजाअर्चासुद्धां हक्कदार पुजारी करीत असतात. देवालयापुढें सभामंडप आहे, तो हैद्राबाद येथलि रहिवाशी श्रीयुत नरसोपंत बोरामणीकर यांनीं बांधविला आहे.

मंडपासमोर तुलसीवृंदावन असून त्यांत मारुतीची मूर्ति आहे. देवालयाच्या दक्षिणेस व उत्तरेस तीन धर्मशाळा आहेत. त्यांपैकीं दोन पुण्याचे श्रीयुत परशुराम नारायण रानडे व एक सोलापूर येथील व्यापारी गौरप्पा यांनीं बांधविल्या आहेत. समोरच एक ओटा असून येथें शुष्ककाष्ठ औदुंबराचें झाड होतें. नरहरी या नांवाच्या भक्तास त्याच्या कुष्ठरोगशमनार्थ वाळलेलें औदुंबराचें काष्ठ देऊन त्यास पानें फुटेपर्यंत पाणी घालण्यास महाराजांनीं सांगितलें होतें. शेवटीं सातव्या दिवशीं त्याची ती निस्सीम भक्ति व दृढ विश्वास पाहून महाराजांनीं आपल्या कमंडलूंतील गंगाजल काष्ठावर प्रोक्षण करतांच त्या शुष्क काष्ठास पानें फुटलीं व तो भक्त कुष्ठरोगापासून मुक्त झाला. तो वृक्ष तीस वर्षांमागें महापुरांत सांपडून वाहून गेला.

### अष्टतीर्थमाहात्म्य ( गु. च. अ. ४९ ).

नामधारकांनीं सिद्धास असा प्रश्न केला कीं, सर्व तीर्थें सोडून

महाराजांनीं गाणगापुरासच वास्तव्य कां केलें ? तेव्हां सिद्धयोग्यांनीं त्याच्या शंकेचें निरसन खालीलप्रमाणें केलें आहे, " हें क्षेत्र सामान्यत: वरवर पाहणारास जरी महत्त्वाचें वाटत नाहीं,—तरी काशी, गया आणि प्रयाग या तिन्ही ठिकाणीं तीर्थयात्रा केल्यास जें पुण्य प्राप्त होतें, तें येथील अष्टतीर्थस्नान केल्यानें मिळूं शकतें."

" ( १ ) **षट्कुळ तीर्थ:**—एकदां दिपवाळीस महाराज आम्हां सर्व शिष्यमंडळीस व ग्रामस्थ लोकांस म्हणाले कीं, 'तुम्हांस त्रिस्थळीं स्नान करण्यास फार लांब जावयास नको; माझ्याबरोबर चला, मी तुम्हांस यात्रा करवितों.' असें म्हणून आम्हांस संगमावर नेलें व तेथें भीमा आणि अमरजा यांच्या संगमावर स्नान करण्यास सांगून म्हणाले कीं, या षट्कुळतीर्थांत स्नान केल्यास प्रयागस्नानाचें फळ आहे व अपमृत्यु टळतो. कारण पूर्वीं जालंदर नांवाच्या दैत्यानें देवांचा पराभव केल्यामुळें पुष्कळ देव मरण पावले. त्यांच्या संजीवनार्थ अमृत नेत असतां कांहीं भाग सांडून त्याचा जो प्रवाह झाला, ती ही अमरजा नदी होय. यामुळें या तीर्थास एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे."

" ( २ ) **नरसिंह तीर्थ**—ह्या तीर्थांत स्नान करून संगमेश्वराची पूजा केल्यास श्रीशैल्य—मल्लिकार्जुनास पूजल्याचें पुण्य मिळतें व आपले मनोरथहि पूर्ण होतात. ( हें तीर्थ संगमावरील देवळासमोर आहे. )"

" ( ३ ) **भागीरथी तीर्थ**—या तीर्थांत स्नान केल्यास मणिकर्णिकेंत स्नान केल्याचें पुण्य मिळतें. कारण पूर्वीं भारद्वाजगोत्रांतील एका शिवभक्त ब्राह्मणानें शंकरास प्रसन्न करून घेऊन वर मागितला कीं आपणास दररोज मणिकर्णिकेचें स्नान व विश्वेश्वराचें दर्शन घडलें पाहिजे. 'तथास्तु' म्हणून शंकर गुप्त झाले व त्या ठिकाणीं एक कुंड व महादेवाची मूर्ति प्रगट झाली. तेथून गुप्त प्रवाह

भीमेस मिळाला आहे. हल्लीं पंढरपूरचे आराध्ये व बडवे हे त्या शिवभक्त ब्राह्मणाचे वंशज असल्यामुळें ते काशीस न जातां येथेंच काशींतले सर्व विधी करतात. ”

“ ( ४ ) **पापविनाशी तीर्थः**—या तीर्थांत स्नान केल्यास मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो. महाराजांच्या पूर्वाश्रमांतील भगिनी रत्नाबाई हिनें येथें त्रिरात्र स्नान करतांच तिचा कुष्ठरोग नाहींसा झाला. ”

“ ( ५ ) **कोटि तीर्थः**—ह्या तीर्थांत स्नान केल्यानें जंबुद्वीपांतील सर्व तीर्थांचें स्नान केल्याचें पुण्य प्राप्त होतें. ‘ **एकेक दान कोटिसरशी,** ’ एक दान केल्यास कोटि दानाचें पुण्य मिळतें. ”

“ ( ६ ) **रुद्रपाद तीर्थः**—या तीर्थांत स्नान केल्यास गयेंत स्नान केल्याचें पुण्य प्राप्त होतें. तेथें विष्णुपद आहे आणि शिवाय गयेप्रमाणें श्राद्धक्षौरादि विधि येथेंहि करावे लागतात. ”

“ ( ७ ) **चक्र तीर्थः**—या तीर्थांत स्नान केल्यास द्वारावती तीर्थांत स्नान केल्याच्या पुण्याहून चौपटीनें जास्त पुण्य मिळतें. ह्या तीर्थांत अस्थि टाकल्यास त्या चक्राकार होतात.

“ ( ८ ) **मन्मथ तीर्थः**—हें तीर्थ कल्लेश्वर देवस्थानाच्या समोर आहे. या ठिकाणीं स्नान करून कल्लेश्वराची पूजा केल्यास गोकर्णतीर्थस्थानफल व महाबळेश्वराचें अर्जनपुण्य मिळतें. ”

या क्षेत्राच्या सीमेच्या आंतील सर्व देवस्थानें व तीर्थें यांची पूजाअर्चा व उत्पन्न वगैरेंबद्दल पुजारीच हक्कदार आहेत.

---

## रोजचा कार्यक्रम.

पहांटेस तीन वाजतां काकडआरती होते. मग महापूजाविसर्जन करून सालकरी पूजेस आरंभ करतो. प्रथम देवळांत असलेले

नारसिंह, शाळिग्राम, दक्षिणावर्ती शंख, शिवलिंगें, बाण इत्यादि देवांवर महान्यास, लघुन्यासपूर्वक रुद्राभिषेक, एकादष्णी करून मग महाराजांच्या निर्गुण पादुकांची पूजा ( केशरलेपन ) झाल्यावर मग श्रीविघ्नहर चिंतामणीची पूजा होते. नंतर देवळांसभोंवतीं असलेल्या गणपती, मारुती, औदुंबर, अश्वत्थवृक्ष, नृसिंहदेव, सूर्यनारायण इत्यादि देवांची पूजा करून प्रातःकाळची आरती करतात; व सर्व मंडळीस आरती, तीर्थ व पंचामृत देतात. येणेंप्रमाणें पहांटे तीन वाजल्यापासून जी पूजा सुरूं होते ती सकाळीं सहा वाजतां संपते.

माध्यान्हकाळीं महानैवेद्य होईपर्यंत सर्वत्रांस पादुकांचें दर्शन व पूजा करून घेतां येते. नैवेद्य होऊन महापूजा बांधल्यानंतर निर्गुण पादुकांचें दर्शन मिळत नाहीं. महानैवेद्य झाल्यानंतर सेवेकरी लोक भिक्षेस निघतात. संध्याकाळीं आठ वाजल्यानंतर पाऊण तास आरती होत असते, मग इंदुकोटीनामक स्तोत्र म्हणत देवळासभोंवतीं भालदार, चोपदारसहित सालकरी, पूजारी, औदुंबर, अश्वत्थ, गणपती, मारुती इत्यादि देवांची आरती करीत तीन प्रदक्षिणा घालतात. पालखी असल्यास इंदुकोटी स्तोत्र म्हणत नाहींत; तेथें दर गुरुवारीं रात्रीं देवाची पालखी निघत असते. तथापि यात्रेकरूंनीं इतर दिवशीं पालखी काढविल्यास कोणत्याही वारीं निघूं शकते. प्रथम आरती झाल्यानंतर वस्त्रालंकारांनीं सुशोभित केलेल्या उत्सवमूर्तीस पालखींत आणून बसवितात. मग तेथील ठराविक पदें म्हणत तीन प्रदक्षिणा झाल्यानंतर पालखी मूळ जागेवर आणून बसवितात व शेवटीं आरती वगैरे करून उत्सवमूर्तीस देवळांत नेतात व रोजच्याप्रमाणें श्रीविघ्नहर चिंतामणीची आरती व श्रींची कापुरआरती होऊन शेवटीं मंत्रपुष्प झाल्यानंतर सर्वत्रांस तीर्थप्रसाद, अंगारा देतात. देवळांत मंत्रपुष्प चाललें असतां बाहेर मंडपामध्यें श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य परमपूज्य वासुदेवानंदसरस्वतीकृत करुणात्रिपदी होते. मग

विडा, शेजारती होऊन दर्शन बंद होतें. येथें दररोज त्रिकाल पूजेचे वेळीं चौघडा झडत असतो. तो श्रीमंत राजे रायरायान् बहादूर दक्षिण हैद्राबादकर यांजकडून ठेवण्यांत आला आहे. मग दहा वाजतां येथील पुजारी पंचपदी भजन करतात.

## वर्षांतील उत्सव.

चैत्र शुद्ध १ प्रतिपदा ह्या दिवशीं पहांटेस महाराजांच्या निर्गुण पादुकांस केशरकस्तुरीमिश्रित गंध व अष्टगंध यांचें लेपन करितात. मग सायंकाळीं येथील जोशी देवळांत पंचांग सांगतो. रात्रौ पालखीची मिरवणूक होऊन वर्षप्रतिपदेचा उत्सव समाप्त होतो.

वैशाख शुद्ध १४ चतुर्दशी ह्या दिवशीं सूर्यास्ताच्या सुमारास नरसिंहजन्म होऊन पौर्णिमेस पारण्यानिमित्त सालकरी पुजारी यांजकडून प्रयोजन होत असतें.

ज्येष्ठ शुद्ध १ प्रतिपदेपासून दशमीपर्यंत दशहारानिमित्त भीमरथीचें पूजन होत असतें.

आषाढ शुद्ध १५ पौर्णिमेपासून चातुर्मास सुरू होतो. चतुर्थाश्रमी लोकांना दोन महिनेपर्यंत सीमोल्लंघन करतां येत नाहीं. ह्या दिवशीं श्रींची व इतर यतींची व्यासपूजा करतात.

श्रावण शुद्ध १ प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत दररोज शिवालिंग व खडावा यांवर रुद्राभिषेक करीत असतात. पूजा व आरती झाल्यावर माधवपत्नीनामक स्तोत्र म्हणत मठास तीन प्रदक्षिणा करून मग सर्वत्रांस तीर्थ, पंचामृत व प्रसाद देतात. मासअखेर अन्नसंतर्पण करून अभिषेकसमाप्ति करतात. श्रावणमासांत कल्लेश्वरावरहि दररोज येथील पुजारी अभिषेक करीत असतात.

भाद्रपद शु० ४ गणेश चतुर्थी या दिवशीं पहांटेस श्रीपाद श्रीवल्लभांचा जन्मोत्सव होतो. नंतर देवळांत सर्वत्रांना प्रसाद मिळतो व दुपारीं श्रीविघ्नहर चिंतामणीस वस्त्रालंकारांनीं सजवून महापूजा

बांधतात. हे उत्सव पूजारीवर्गाकडून फारच आस्थापूर्वक पार पडत असल्यामुळें दिवसेंदिवस आकर्षक होत आहेत.

आश्विन शु० १० विजयादशमीस सायंकाळीं पितळी दरवाजासमोर असलेल्या मारुतीसन्निध गणपतीजवळ शमीपूजन होऊन पालखी निघते.

आश्विन व० ७ सप्तमी या दिवशीं येथील सुप्रसिद्ध सत्पुरुष व कवि रामचंद्र महाराज गोबूरकर यांची पुण्यतिथि असते. ह्यांनीं महाराजांच्या गुणवर्णनपर गीतें केलीं आहेत. तीं पुढें "पदें" यांत दिलीं आहेत.

आश्विन व० १२ गुरुद्वादशीस श्रीपाद श्रीवल्लभांच्या अवतार-समाप्तिनिमित्त उत्सव होत असतो. या दिवशींचें प्रयोजन चौंडापूरचे जहागीरदार नरहरराव हे फारच आस्थापूर्वक करीत असतात.

आश्विन व० १४ नरकचतुर्दशी या दिवशीं येथील भक्तमंडळी व पुजारीवर्ग दिंडीसह भजन करीत अष्टतीर्थस्नानें करतात.

कार्तिक शु० १५ पौर्णिमा व व० प्रतिपदा ह्या दोन दिवशीं वनभोजनानिमित्त संगमावर मोठा उत्सव होतो. ह्याचें सविस्तर वर्णन पुढें दिलें आहे.

मार्गशीर्ष शु० १४ चतुर्दशीस दत्तजन्मानिमित्त मोठा उत्सव होतो. ह्याचें सविस्तर वर्णन पुढें दिलें आहे.

पौष शु० २ द्वितीया ह्या दिवशीं दुपारीं बारा वाजतां चरित्र-नायक श्रीमन्नरसिंहसरस्वतींचा जन्मोत्सव होतो. तो येथील पुजारी-मंडळी करीत असतात. हा उत्सवही पाहण्यासारखा असतो.

माघ शु० १ प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत प्रत्येक पुजारी नव-रात्रउत्सवानिमित्त आपआपले नंदादीप मठांत आणून ठेवितात; व

पौर्णिमेस उत्सवसमाप्ति होते. ह्या दिवशीं रात्रीची आरती फारच प्रेक्षणीय असते.

माघ व० १ प्रतिपदेपासून चतुर्थीपर्यंत येथें सर्वांत मोठा उत्सव होतो. ह्याचें वर्णन मुख्य उत्सववर्णनांत आलें आहे.

माघ व० १४ शिवरात्रीच्या दिवशीं रात्रीं १० वाजल्यापासून पहांटे ३ वाजेपर्यंत चार यामपूजा होऊन माधवपत्नीनामक स्तोत्र म्हणत मठासभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालतात.

पुढें मंत्रपुष्प वगैरे होऊन तीर्थप्रसाद सर्वत्रांस दिल्यानंतर पूजा समाप्त होते.

फाल्गुन व० ५ रंगपंचमीच्या दिवशीं महाराजांची महापूजा बांधून कस्तूरीमिश्रित केशरी रंग उडवितात.

## मुख्य उत्सववर्णन.

कार्तिकी पौर्णिमा व प्रतिपदेस भोजन व दीपाराधनानिमित्त संगमावर मोठा उत्सव होतो. मोठी यात्रा भरते. पौर्णिमेस सकाळीं १० वाजतां उत्सवमूर्तीस वस्त्रालंकारांनीं सुशोभित करून १२ वाजतां देवळासभोंवतीं एक प्रदक्षिणा घालून पालखी वाजतगाजत मोठ्या समारंभानें वेशीपर्यंत सावकाश येते. नंतर भक्तमंडळी अनंतकोटी-ब्रह्मांडनायकाची स्फूर्तिदायक गर्जना करून पालखी मोठ्या त्वरेनें विश्रांतिकट्ट्यावर आणून बसवितात. वे. शा. सं. रामभट गुरुभट पुजारी हे येथें प्रसाद मिळण्याची सोय करीत असतात. नंतर पुन्हा पालखी त्वरेनें येऊन संगमेश्वराजवळ थोड्या अंतरावर येऊन उभी राहाते. पालखी वाहणाऱ्या भक्तांच्या पायांवर पाणी घालून सुवासिनी स्त्रिया महाराजांस आरती ओवाळतात व शेवटीं पालखी संगमावरील देवळांत आणून बसवितात. अभिषेक व महानैवेद्य झाल्यावर भक्तमंडळी जेवावयास् बसतात. ह्या दिवशीं प्रयोजनाचा खर्च श्रीमंत सरदार माधवराव रास्ते, पुणेंकर यांजकडून मिळतो.

रात्रीं नऊ वाजतां, आरतीस प्रारंभ होऊन दहा वाजतां ती संपूर्ण होते. मग आरती, तीर्थप्रसाद झाल्यावर पुन्हां पालखी गांवाकडे त्वरेनें जाऊं लागते. ह्या वेळेचें तें दृश्य फारच पाहाण्यासारखें असतें. इकडे देवळांत जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे दिवेच दिवे दिसतात. दूर अंतरावर भक्तसमूहांस अनेक दिवट्या व चुड्या यांनीं वेष्टिलेली पालखी मध्यरात्रीच्या सुमारास धांवत असलेली पाहून भाविकांच्या मनांत आनंद व आश्चर्य यांचें भरतें येऊन डोळे प्रेमाश्रूंनीं भरून येतात व एखाद्या कट्टया नास्तिकालासुद्धां देवाच्या अस्तित्वाबद्दल खात्री पटते. असो. पुढें थोडा वेळ विश्रांतिकट्ट्याजवळ थांबून पालखी गांवाच्या वेशीजवळ येते. मग भजन करीत ठिकठिकाणीं थांबून पदें म्हणत म्हणत पालखीस देवळांत येण्यास पहाटे चार वाजतात; नंतर नेहमींप्रमाणें पालखीचा कार्यक्रम होऊन समारंभ आटोपतो. प्रतिपदेससुद्धां असाच कार्यक्रम असतो. परंतु फक्त प्रयोजनांत तेवढा फरक असतो. ह्या दिवशीं प्रसादास बाजरीची भाकरी व आंबाड्याची भाजी व तेलहि असून शिवाय रुईच्या पानांत जेवण्याचा सांप्रदाय आहे. ह्या दिवशींचा खर्च येथील सरकार खुर्षिज्यायबहादूर यांजकडून मिळतो.

मार्गशीर्ष शु० १४ चतुर्दशी या दिवशीं दत्तजन्मानिमित्त मोठा उत्सव होत असतो. हजार दोनहजारांपर्यंत यात्रा भरते. मंडपामध्यें मखर बांधून त्यांत श्रीविष्णूचा मुखवटा बसवून महापूजा बांधतात व बारा वाजतां महाराजांच्या बालमूर्तीस पाळण्यांत घालून झोके देतात, व सर्वत्रांस सुंठवडा वांटून झाल्यानंतर दत्तजन्माचा कार्यक्रम आटोपतो व दुपारीं उपवासाचा प्रसाद देवळांत सर्वत्रांस मिळतो. पौर्णिमेस पारण्यानिमित्त अन्नसंतर्पण श्रीमंत राजे रायरायान्-बहादूर हैद्राबादकर यांच्यातर्फे श्रीमंत नरहरराव चौडापूरकर हे फार आस्थापूर्वक करीत असतात. रात्रीं पालखी आटोपल्यावर उत्सव

मूर्तीस मखरांत आणून बसवितात व रात्रौ जागरण, कीर्तन, भजन, गायन इत्यादि कार्यक्रम होत असतो. सकाळीं ललित होऊन सर्व मानकरी मंडळीस हार व प्रसाद दिल्यानंतर दत्तजयंतीचा उत्सव आटपतो.

**माघ व।। १ प्रतिपदे**पासून चतुर्थीपर्यंत येथें सर्वांत मोठा उत्सव होतो. सातआठ हजारांपर्यंत यात्रा भरते. पौर्णिमेच्या दिवशीं पहांटे पांच वाजतां नेहमीं मुख्य गाभाऱ्यांतील देव्हाऱ्यांत असणाऱ्या महाराजांच्या निर्गुण पादुका श्रीविघ्नहर चिंतामणीच्या सन्निध देव्हाऱ्यांत आणून ठेवितात. त्यानंतर कोणालाच निर्गुण पादुकांचें दर्शन मिळत नाहीं. प्रतिपदेस प्रातःकाळची पूजा आटोपल्यावर महाराजांच्या पादुका मुख्य गाभाऱ्यांत दरवाज्यांत आणून ठेवितात. ह्या दिवशीं दर्शनाचें महत्त्व फार असल्यामुळें सकाळीं सहा वाजल्यापासून दुपारीं चार—पांच वाजेपर्यंत एकसारखे भाविक लोक दर्शन व पूजा करून घेत असतात. चार वाजतां मंडपाखालीं चौकांत संन्यासी लोकांची पाद्यपूजा होऊन शेवटीं सिंदगीचे निस्सीम दत्तभक्त अय्यनवरू यांची आरती व पूजा होते. असा हा पाद्यपूजेचा समारंभ आटोपल्यानंतर सर्व मंडळी नदीकांठीं असलेल्या केशवदेवस्थानाच्या पटांगणांत जेवावयास बसतात. ह्या दिवशींच्या प्रयोजनाचा खर्च येथील सरकार खुर्षिजायबहादूर यांजकडून मिळतो. ह्या चार दिवसांत प्रसाद-जेवण उशिरा होत असल्यामुळें यात्रेकरूंना फराळाकरितां कै. दत्तभक्त श्रीपतराव लातूरकर पोहे देत असत. सध्यां त्यांची पत्नी पतीनें आरंभिलेलें अभिनंदनीय कृत्य तसेंच पुढें चालवीत आहे.

**माघ व।। २ द्वितीयाः**—ह्या दिवशींचें अन्नसंतर्पण येथील ग्रामस्थ लोक वर्गणी जमवून करीत होते. परंतु आतां चार वर्षांपासून सोलापूरचे साधु भीमाशंकर अप्पा महाराज हे करीत असतात.

**माघ व॥ ३ तृतीयाः**—ह्या दिवशींचें प्रयोजन श्रीमंत सरदार नानासाहेब चंद्रचूड हे करीत असतात.

**माघ व॥ ४ चतुर्थीः**—या दिवशीं दुपारीं बारा वाजतां देवळांत गोपाळकाला होऊन महाराजांची पालखी मोठ्या थाटानें वाजतगाजत नदीवर स्नानाकरितां नेतात. ह्या वेळेस आसपासच्या खेड्यांतील लोक, यात्रेकरू व ग्रामस्थ यांचा एकच समूह होऊन तो नदीवर स्नान करीत असलेला पाहून मन सुप्रसन्न होतें. मधूनमधून पिशाच्चें आरडतओरडत नदींत मुक्ति घेत असतात. इकडे सालकरी, पुजारी व इतर मानकरी मंडळी मिळून महाराजांच्या खडावावर रुद्राभिषेक करून सर्वत्रांस गोपाळकाल्याचा प्रसाद वांटतात. नंतर भजन करीत मोठ्या समारंभानें पालखी देवळांत आणतात. मागें सुवासिनी वस्त्रालंकारांनीं सुशोभित होऊन आरत्या घेऊन येत असतात. एवढा सर्व कार्यक्रम व्हावयास सायंकाळचे चार वाजतात. ह्या दिवशींच्या अन्नसंतर्पणाचा खर्च श्रीमंत सरदार माधवराव रास्ते, पुणेंकर हे करीत असतात. या उत्सवांत रात्रींची आरती चार दिवस बंद असते. येणेंप्रमाणें येथील मुख्य उत्सवांचा कार्यक्रम असतो.

## संक्षिप्त गुरुचरित्र.

श्रीदत्तात्रेयांनीं पुष्कळ अवतार धारण केले आहेत. त्यांपैकीं चारित्रनायक हे प्रत्यक्ष तिसरे अवतारिक पुरुष होते. ह्यांचें चरित्र लिहिण्यापूर्वीं पूर्वपीठिका लिहून माझा अधिकार नसतां मी चरित्रलेखनाचें कार्य हातीं घेत आहे.

पूर्वीं अत्रिऋषींची भार्या अनुसूया या नांवाची एक महान् पतिव्रता होऊन गेली. तिनें आपल्या पातिव्रत्याच्या अलौकिक प्रभावानें त्रयमूर्तींस प्रसन्न करून घेऊन त्यांना बाळरूपानें आपल्या घरीं

ठेवून घेतलें. ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हे तिघे दत्तरूपानें अनुसूयेच्या घरीं राहिले.

श्रीदत्तमहाराज नेहमीं माध्यान्हसमयीं भिक्षा मागत पतितांचा उद्धार करीत फिरत असतात हें सर्वश्रुत आहेच. असेंच एके दिवशीं श्रीदत्त पांचाळनगरांत वास करीत असलेल्या एका सदाचारसंपन्न ब्राह्मणाच्या घरीं भिक्षेस गेले. त्या दिवशीं ब्राह्मणाच्या घरीं श्राद्ध होतें. विप्रस्त्रीनें मनांत कांहीं संशय न बाळगतां श्राद्धास सांगितलेल्या ब्राह्मणांच्या जेवणापूर्वीं श्रीदत्तास भिक्षा घातली; त्यामुळें श्रीदत्तमहाराज संतुष्ट होऊन " जननि, इच्छित वर माग. " असें म्हणतांच त्या स्त्रीनें तुम्हासारखा जगद्वंद्य पुत्र व्हावा असा वर मागितला. " तथास्तु " म्हणून श्रीदत्त गुप्त झाले. पुढें त्या साध्वीच्या पोटीं श्रीदत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या नांवानें अवतरले. यांच्या मौंजीबंधनाच्या वेळीं मातृभिक्षा ग्रहण करीत असतांना ह्यांनीं चारी वेद मुखोद्गत म्हणून दाखविले. पुढें ह्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षीं मातापित्यांनीं लग्न करण्याबद्दल आग्रह केल्यामुळें यांनीं योगस्त्रीवांचून सर्व स्त्रिया मातेसमान आहेत, असें सांगून ते तीर्थपर्यटनास आज्ञा मागूं लागले. तेव्हां मातापित्यांना अत्यंत दुःख होऊन ते म्हणाले, " आंता वृद्धापकाळीं आमचें व तुझें आंधळ्यापांगळ्या भावांचें कोण रक्षण करणार ? " मातेचे शब्द ऐकून श्रीपाद श्रीवल्लभांनीं अमृतदृष्टीनें आपल्या बंधूंना पाहातांच ते अव्यंग व विद्वान् झाले. पुढें महाराज तीर्थयात्रेस गेले. शेवटीं फिरत फिरत कुरवपुरास आले. एके दिवशीं ते कृष्णेंत स्नान करीत असतांना एक विधवा बाई आपल्या मतिमंद मुलासह आत्महत्या करीत असलेली त्यांना दिसली. तेव्हां लागलीच त्यांनीं त्या बाईस आत्महत्येपासून परावृत्त करून आत्महत्येचें कारण विचारलें. तेव्हां त्या बाईनें सांगितलें कीं, " हा माझा मुलगा मतिमंद जन्मल्यामुळें लोकलज्जेस्तव

आम्ही जीव देण्यास प्रवृत्त झालों. आतां पुढील जन्मीं तरी असा मूर्ख मुलगा आपल्या पोटीं न जन्मतां तुमच्यासारखा एखादा जगद्वंद्य पुत्र होईल असा मला आशीर्वाद द्या." हें ऐकून श्रीपादश्रीवल्लभांनीं त्या बाईला शनिप्रदोष व्रत करण्यास सांगून, त्या मतिमंद मुलाच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्यास विद्वान् केलें. पुढें कुरवपुराचा महिमा वाढल्यामुळें तेथें अनेक दत्तभक्त दर्शनास जाऊं लागले. असाच एक दत्तभक्त आपले नवस फेडण्याकरितां समागमें द्रव्य घेऊन कुरवपुरास येत असतां मार्गांत चोरांनीं सर्व द्रव्य लुबाडून त्याचा जीव घेतला. परंतु श्रीपादश्रीवल्लभांनीं जटाधारी भस्मांकित वेष धारण करून त्रिशूळानें त्याचा वध केला व त्या भक्तास सजीव केलें, आणि एका रजकभक्तास राज्य देऊन आश्विन वद्य द्वादशी (गुरुद्वादशीस) निजानंदीं निमग्न झाले. हा श्रीदत्ताचा दुसरा अवतार होय.

---

# श्रीनरसिंहसरस्वती-चरित्र.

आत्महत्या करीत असलेल्या विधवाबाईस शनिप्रदोष व्रत केल्यानें अवतारिक पुरुष जन्मेल, असा श्रीपादश्रीवल्लभांनीं वर दिला होता. कांहीं दिवसांनंतर ती बाई मरण पावली व तिचा पुढील जन्म करंजनामक नगरांत एका सुशील घराण्यांत झाला. ह्या गांवास लाडाचें कारंजें म्हणतात. तें गांव वऱ्हाडांत आहे. ह्या बाई उपवर होतांच माधवनामक शिवोपासक ब्राह्मणाबरोबर ह्यांचा विवाह झाला. नंतर योग्यकाळीं श्रीमन्नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज यांच्या पोटीं जन्मले. ते जन्मतांच ॐ काराचा उच्चार करूं लागले. जातक वगैरे वर्तविल्यानंतर मुलाचें नांव नरहरी असें ठेविलें. पुढें सात वर्षें-



श्रीमन्नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज, श्रीक्षेत्र गाणगापूर.

[प्र.२०

पर्यंत नरहरीनें ॐकाराशिवाय दुसरा शब्दच उच्चारला नाहीं. दुर्दैवानें आपणांस मुका मुलगा जन्मला म्हणून मातापितरांस अत्यंत दुःख झालें. ह्या सात वर्षांच्या अवधींत नरहरीनें अनेक चमत्कार करून दाखविले, परंतु मायेनें अंध झालेल्या मातापित्यांस त्याची खरी ओळख पडली नाहीं. असो. पुढें एके दिवशीं मुलानें सहज खेळत खेळत हातांत लोखंडाचा तुकडा घेऊन त्याजकडे अमृतदृष्टीनें पाहतांच त्या लोखंडाचें बावन्नकशी सोनें झालें. हा चमत्कार पाहून आईबापांस अत्यंत आनंद होऊन त्यांना धन्यता वाटली. कांहीं दिवसांनंतर नरहरीनें मौंजीबंधन केल्यास आपणांस बोलतां येईल असें खुणेनें दाखविलें व त्याप्रमाणें मौंजीबंधनाच्या वेळीं चार वेद, सहा शास्त्रें मुखोद्गत म्हणून दाखविलीं. बालवयांतच इतकीं अलौकिक कर्में करणें हें अवतारिक पुरुषाशिवाय शक्यच नाहीं असें गांवांतील विद्वान् लोक म्हणू लागले.

मोठमोठे पंडित, शास्त्री इत्यादि विद्वान् लोक गहन विषयांवर चर्चा करून ज्ञान संपादण्यास येऊं लागले. मौंजीबंधन झाल्यावर नरहरीनें आपणांस तीर्थयात्रा करावयास जावयाचें आहे, सबब आपणांस निरोप द्यावा अशी मातेस विनंति केली. तेव्हां माता म्हणाली, " तुजवांचून आपणांस दुसरा मुलगा नाहीं. वृद्धापकाळीं आमचें रक्षण करशील म्हणून आम्ही आशा बाळगून होतों. " मातेचे हे शब्द ऐकून नरहरीनें पुष्कळ ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या. " मनुष्याचें अस्तित्व पाण्यावर तरंगत असलेल्या बुडबुड्याप्रमाणें आहे. ज्याप्रमाणें एखादी वीज चमकून तत्काळ नाहींशी होते, तद्वत् हें शरीर नाशवंत आहे."

**देह तो क्षणभंगुर । कवण राहिला नाहीं स्थिर ।**
**जोंवरी असें दृढ शरीर । पुण्यमार्गें राहाटावें ।**

" म्हणून प्रत्येकानें शक्य तितक्या लवकर धर्मानें वागून पुण्य

संपादन करावें. तेंच एक इहलोकीं व परलोकीं तारण्यास समर्थ होईल." अशा प्रकारचा उपदेश करून मातेचें सांत्वन केलें. चार मुलगे व एक मुलगी होईल असा तिला आशीर्वाद दिला. परंतु मातेनें एक मुलगा होईपर्यंत घरींच राहिलें पाहिजे, असा हट्ट धर-ल्यामुळें एक वर्षपर्यंत नरहरी घरीं राहिले; व दोन मुलें होतांच एकवीस वर्षांनंतर भेटण्याचें आश्वासन देऊन ते यात्रेस निघून गेले. प्रथम काशीस जाऊन तेथें ते कांहीं दिवसपर्यंत योगाभ्यास करीत राहिले. त्यांचें तें अद्वितीय तेज पाहून सर्व यति, तपस्वी, आदि लोक आश्चर्यचकित झाले. वृद्ध कृष्णसरस्वतीस तर असें वाटलें कीं, संन्यासाश्रमास ऊर्जितावस्थेस आणण्यास हाच मुलगा समर्थ होईल. म्हणून त्यांनीं त्यास चतुर्थाश्रम स्वीकारण्याबद्दल विनंति केली. त्यांच्या विनंतीस मान देऊन महाराजांनीं त्यांच्यापासून संन्यासाश्रमाची दीक्षा घेतली; व नरसिंहसरस्वती हें नांव धारण करून गया, प्रयाग, बद्री-केदार वगैरे तीर्थांस जाऊन, ठिकठिकाणीं भेटतील त्यांचा उद्धार करीत एकवीस वर्षांनीं पुन्हां ते करंजपुरास आले. ती दंडधारी तेजस्वी मूर्ति पाहून आईबापांस अत्यंत आनंद झाला. गांवांत सर्व ठिकाणीं त्यांची पूजा झाली त्या वेळीं श्रींनीं एकाच वेळीं अनेक रूपें धारण करून सर्वांकडून पूजा स्वीकारली व शेवटीं आईबापांस "तुम्ही भवपाशांतून मुक्त झालां आहांत" असा आशीर्वाद देऊन ते वैजनाथास आले. त्यांच्याबरोबरची पुष्कळ शिष्यमंडळी सेवा करण्याकरितां त्यांच्याजवळ राहिली होती. त्यांना तीर्थयात्रेस जाण्यास सांगून भिलवडीजवळ ते औदुंबरीं एक चातुर्मास राहिले व तेथें देवीच्या चरणीं जिव्हा कापून वाहणाऱ्या मूर्ख द्विजपुत्रास ज्ञान देऊन नरसोबावाडीस गेले. महाराज वाडीमध्यें एक तपपर्यंत तपश्चर्या करीत राहिले. तेथें एके दिवशीं एका गरीब ब्राह्मणाच्या घरीं भिक्षेस जाऊन, त्याच्या अंगणांत असलेला घेवड्याचा वेल तोडून महा-

राजांनीं त्यास सधन केलें. पुढें ते योगिनीस वर देऊन गाणगापुरास गेले. तेथें भीमा आणि अमरजा या नद्यांचें संगमस्थान तपश्चर्या करण्यास योग्य वाटल्यावरून तेथें राहिले, व माध्यान्हकाळीं दररोज गांवांत भिक्षेस जात. एके दिवशीं महाराज एका गरीब ब्राह्मणाच्या घरीं गेले. त्याजपाशीं भिक्षा घालण्यास कांहींसुद्धां नव्हतें. म्हैस होती ती देखील वांझ होती; परंतु आश्चर्य हें कीं, महाराजांच्या कृपादृष्टीनें ती वांझ म्हैस दूध देऊं लागली व तें दूध प्राशन करून महाराज स्वस्थानीं गेले. ही आश्चर्याची गोष्ट ग्रामाधिपतीस कळतांच तो सहपरिवार संगमावर गेला व महाराजांच्या पायांवर लोटांगण घालून विनवूं लागला. " आपण गांवांतच मठ करून आमचा उद्धार करावा. " त्याच्या विनंतीप्रमाणें महाराज गांवांत राहिले. महाराज दररोज पालखींतून संगमावर जात असत. हें त्यांचें राजवैभव पाहून कुमशी येथें राहाणारा त्रिविक्रमभारती नांवाचा यति महाराजांची निंदा करूं लागला. त्याचा गैरसमज दूर करण्याकरितां महाराज जातीनें कुमशीस गेले व त्याला विश्वरूपदर्शन देऊन आपला शिष्य करून घेतलें. विद्येनें उन्मत्त होऊन वेदचर्चेस आलेल्या दोघां ब्राह्मणांपुढें महारा- कडून चारी वेद म्हणवून घेतले व ' गर्वामुळें सर्वांचा नाश होतो' असें सिद्ध करून दाखविलें. भास्करभट नांवाचा काश्यप गोत्राचा एक ब्राह्मण महाराजांची आपल्या हातून कांहीं तरी सेवा घडावी म्हणून अडीच तीन शेर धान्य घेऊन आला. परंतु तीन महिनेपर्यंत महाराजांस भिक्षा घालण्याची संधि त्यास मिळाली नाहीं. शेवटीं एके दिवशीं सर्व शिष्यांसह मला भिक्षा घालशील तर आपण तुझ्या येथें भिक्षेस येऊं, असें महाराजांनीं सांगितलें. त्यानें ती गोष्ट महा- राजांच्या अनुग्रहावरच स्वीकारली. स्वयंपाक तयार झाला. अडीच शेर धान्याचा स्वयंपाक परंतु चार हजार लोकांचें जेवण अशी असंभवनीय परिस्थिति असतांसुद्धां केवळ महाराजांच्या कृपेमुळें तो

त्यांतूनहि पार पडला. पुढें तो भास्करभट सहकुटुंब तेथेंच राहिला. हल्लीं त्याचेच वंशज येथील पुजारी असून हेच श्रींची पूजाअर्चा करीत असतात.

तंतुक नांवाच्या एका विणकर भक्तास महाराजांनीं एका क्षणांत श्रीशैल्यदर्शन घडविलें. "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद एका सहगमनास निघालेल्या बाईस दिल्यामुळें तिच्या नवऱ्यास जिवंत करून महाराजांना आपले शब्द खरे करावे लागले. दिवाळीसणानिमित्त आठ गांवांचीं आमंत्रणें आलीं असतां, अष्टरूपें धारण करून महाराजांना भक्तांची पूजा घ्यावी लागली. बेदरचा बादशहा स्फोटक झाल्यामुळें महाराजांच्या दर्शनास आला असतां संगमाच्या सीमेंत येण्याच्या आंतच त्याचा स्फोटक नाहींसा झाला. याप्रमाणें अनेक अद्भुत लीला दाखवून, आपण गाणगापुरांत प्रत्यक्ष अहर्निश आहोंत असें सर्वांस अभिवचन देऊन श्रीशैल्ययात्रेच्या निमित्तानें बरोबर मुख्य चार शिष्यांस घेऊन महाराज गेले व पाताळगंगेंत गुप्त झाले. तरी हल्लीं गाणगापुरास त्यांचें प्रत्यक्ष वास्तव्य आहे. कारण महाराजांनीं गुप्त व्हावयाच्या वेळी "माझें निरंतर वास्तव्य या निर्गुण पादुकांतच राहील" असें आपल्या शिष्यांना सांगितलें.

## महाराजांच्या पट्ट शिष्यांची माहिती.

( १ ) **त्रिविक्रम भारती:**—हे शिष्य येथून चार कोसांवर असलेल्या कुमसी नांवाच्या गांवांत नरसिंहोपासना करित असत. त्यांस महाराजांनीं विश्वरूप दाखविलें.

( २ ) व ( ३ ) **नरकेसरी** व **नंदीनाम** हे दोघेहीं हिपरगी गांवाचे रहिवाशी होते. तेथें कल्लेश्वराचें देऊळ आहे. तेथील हे उपासक होत. नंदीनामाचें कुष्ठ गेल्यामुळें व नरकेसरीस स्वप्नामध्यें महाराजांचें दर्शन झाल्यामुळें ते दोघेहि एकनिष्ठ सेवक झाले.

(४) **सायंदेव:**—हा कडगंची येथील राहाणारा होय. हा गांव

गाणगापुरापासून १८ मैलांवर आहे. येथेंच गुरुचरित्राची मूळ पोथी आहे.

( ५ ) **नामधारकः**—हा गुरुचरित्रलेखक होय. यालाच सिद्धानें आपल्या गुरूचें अलौकिक चरित्र सांगितलें. नामधारक व सिद्ध यांची भेट येथून दोन मैलांवर असलेल्या सिद्नाळ या गांवीं झाली. यालाच सरस्वती असें दुसरें नांव आहे.

सायंदेवाची वंशावळ.

आडनांव—साखरे
गोत्र—कौंडिण्य
शाखा—आपस्तंब

सायंदेव
|
नागनाथ
|
देवराय
|
गंगाधर
|
नामधारक ( ऊर्फ सरस्वती )

**सद्यःस्थिति.**

**कन्यागति बृहस्पति । बहुधान्य संवत्सर ख्याति । सूर्य चाले उत्तर दिगंतसी । संक्रांति कुंभ परियेसा ।। १ ।। शिशिर ऋतु माघमासि । असित पक्ष प्रतिपदेसी । शुक्रवारीं पुण्य दिवशीं । श्रीगुरु बैसले निजानंदीं ।। २ ।।**

ह्यावरून महाराज गुप्त होऊन जवळ जवळ ४७० वर्षें झालीं. कारण हे सर्व योग शालिवाहन शके १३८० या वर्षी जुळून येतात असें सिद्ध झालें आहे. जरी महाराज गुप्त होऊन बराच काळ लोटला, तरी त्यांच्या कीर्तीमध्यें लवलेशही कमी न होतां,

ती उत्तरोत्तर वृद्धिंगत होत आहे. ह्या ठिकाणीं भाविकांनीं सेवा केल्यावर होणाऱ्या दृष्टांतांवरून व नित्य अनुभवास येणाऱ्या अद्‌भुत चमत्कारांवरून महाराज गुप्त स्वरूपानें येथें प्रत्यक्ष वास करीत आहेत हें सिद्ध होत आहे. कैक निस्सीम दत्तभक्तांना तर प्रत्यक्ष-दर्शन घडलें आहे. दृढभक्ति असल्यास कोणासही येथें महाराजांची कृपा संपादन करितां येते; व आजपर्यंत हजारों लोक नानातऱ्हेचे शारीरिक कष्ट करून देवाला आपल्या दृढभक्तीनें वश करून घेऊन आपापल्या असाध्य कामना पूर्ण करून घेण्यासाठीं येथें राहिले. शेंदीडशें सेवेकरी आपली कामना पूर्ण करून घेण्यासाठीं येथें रहात असतात. आजपर्यंत महाराजांनीं अव्यक्त स्वरूपांत केलेल्या कांहीं चमत्कारांचें वर्णन खालीं दिलेलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

( १ ) श्रीमंत सरदार बाळासाहेब रास्ते, पुणेंकर यांच्या पूर्वजास भगेंद्र झाला होता. डॉक्टर वैद्य ह्यांनीं हा रोग असाध्य आहे असा अभिप्राय दिल्यानंतर ह्यांना वाटलें कीं, कांहीं तरी दैविक चमत्कारांनीं हा रोग नाहींसा होईल. ह्या उद्देशानें ते गाणगापुरास आले व तेथें सेवा केल्यावर त्यांना असा दृष्टांत झाला कीं, संगमावर संगमेश्वराचे देवळाच्या पाठीमागें एक वनस्पति आहे, त्याचा तूं रस काढून भगेंद्रावर लाव म्हणजे तें बरें होईल, आणि खरोखरच त्यांचा असाध्य रोग बरा झाला. त्यांनीं ह्या देवस्थानास पुष्कळ चांदीचीं भांडीं व अनेक उपयुक्त वस्तू दिल्या आहेत; त्यांचा येथें नित्य उपयोग होतो. सर्वस्वीं ह्या देवस्थानाला त्यांची मदत आहे व आतांसुद्धां त्यांच्या वंशजांकडून प्रतिवर्षीं बरेंच द्रव्य खर्च होतें.

( २ ) रा. रा. बारपांडे ह्या नांवाचे एक दत्तभक्त आपल्या कुष्ठी झालेल्या मुलास घेऊन सेवेस येऊन राहिले. त्यांच्या हातून कांहीं दिवस सेवा घडल्यानंतर महाराजांनीं असा दृष्टांत

दिला कीं, तूं जर मला सोन्याचा मुगुट अर्पण करशील, तर तुझ्या मुलाचें अंग बरें होईल. पुढें त्यांनीं दृष्टांताप्रमाणें एका सोनाराकडून मुकुटाचें काम सुरू केलें. थोड्याच दिवसांत मुलाच्या अंगावरील कोड हळूंहळूं नाहींसें होऊं लागलें. महाराजांस मुकुट अर्पण करितांच मुलगा पूर्ववत् निरोगी झाला. ह्या गोष्टीस बारा वर्षें झालीं.

( ३ ) कै. श्रीपतराव लातूरकर, एक निस्सीम दत्तभक्त, संतति व्हावी ह्या उद्देशानें येथें राहिले होते. त्यांची इच्छा थोडेच दिवसांत पूर्ण होऊन त्यांना मुलगा झाला. ते तेथें दरवर्षीं माघ मास उत्सवांत चार दिवसपर्यंत हजारों दत्तभक्तांस फराळास पोहे घालीत असत. हल्लीं त्यांची पत्नीसुद्धां पतीनें आरंभिलेलें सत्कृत्य पुढें तसेंच चालवीत आहे.

( ४ ) रा. रा. परांडेकर ह्या नांवाचा विद्यार्थी क्षयरोग झाल्यामुळें येथें श्रींपाशीं सेवा करण्याकरितां आला होता. डॉक्टरांनीं हा रोग असाध्य ठरविला; परंतु त्यानें कायावाचामनेंकरून श्रींची सेवा केल्यामुळें तो रोगापासून मुक्त झाला.

( ५ ) रा. रा. बऱ्हाणपूरकर ह्या नांवाचे एक गृहस्थ आपली कामना पूर्ण करून घेण्यासाठीं येथें सेवेस राहिले. गांवीं जाण्याबद्दल निरोप झाला. परंतु प्रसाद मिळाल्याशिवाय जावयाचें नाहीं असा यांनीं दृढ निश्चय धरल्यामुळें तात्काळ त्यांना दुसरे दिवशीं स्वप्नांत नारळाचा प्रसाद मिळाला. परंतु चमत्कार हा कीं, ते जागे होऊन पाहातांच प्रत्यक्ष उशाशीं प्रसादाचा नारळ व फुलें दृष्टीस पडलीं.

( ६ ) गंधर्व नाटक मंडळींतील रा. रा. नारायण महादेव जोशी ह्यांना महारोग झाल्यामुळें ते येथें सेवेस राहिले होते. ७।८ महिन्यांत त्यांचा महारोग पूर्ण बरा झाला; सध्यां ते चतुर्थाश्रम स्वीकारून काशीस निघून गेले आहेत.

( ७ ) शंकरबुवा तुळजापूरकर या नावांचे महान् तपस्वी होऊन

गेले. त्यांनीं येथें सतत चाळीस वर्षेंपर्यंत श्रींची निष्कामभक्तीनें सेवा केली. त्यांचे दररोजचा कार्यक्रम म्हणजे पहांटे चार वाजतां उठून स्नान करून जे अनुष्ठास बसत ते दुपारीं चार वाजतां उठत. ह्या अवधींत संध्या, पूजा, पारायण, जप इत्यादि कार्यक्रम यथासांग करीत. त्यांना प्रत्यक्ष महाराजांचें दर्शन झालें होतें. दोन वर्षांखालीं यांना "गिरनारला आपला देह ठेव" असा दृष्टांत झाला होता; व त्याप्रमाणें ते गेले व तेथें त्यांनीं देह ठेविला. हल्लीं त्यांचें छायाचित्र व खडावा नेहमींच्या अनुष्ठानस्थानावर घाटपांडे यांनीं स्थापन केल्या आहेत.

( ८ ) श्रीमोतीबाबा जामदार म्हणून येथें एक प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले. हे नागपूरकर भोसल्यांचे जामदार होते. ह्यांना मुंज झाल्यापासून ब्रह्मकर्माची जी गोडी लागली ती शेवटपर्यंत तशीच कायम होती. ह्यांची शिकवण म्हणजे स्वार्थ साधून परमार्थ करा. संसारांत राहून विरक्त कसें राहातां येतें हें त्यांनीं जगास दर्शविलें. हे नेहमीं गुरुचरित्राचें पारायण करीत असत. येथें आल्यानंतर जेव्हां जेव्हां ते निर्गुण पादुकांचें दर्शन घेत, तेव्हां अर्धा अर्धा तास त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु एकसारखें येत असत. सारांश त्यांचें शुद्ध आचरण देवावरील अलोट निष्ठेमुळें ते अनेक दैविक चमत्कार करून दाखवीत. निर्गुण पादुकांचें दर्शन सतत व्हावें अशी त्यांची अत्यंत उत्कट इच्छा असे. वयाला शंभर वर्षें पूर्ण झालीं होतीं, नागपुराहून गाणगापुरास येण्यास शरीर असमर्थ झालें होतें; परंतु त्यांचा मनोनिग्रह इतका दांडगा कीं, शेवटचें दर्शन घेतल्याखेरीज रहावयाचें नाहीं व त्याप्रमाणें त्यांच्या शिष्यांनीं त्यांना स्टेशनाहून एका मेण्यांत घालून गाणगापुरास आणलें व शेवटचें दर्शन घेऊन नागपुरास पोहोंचतांच ते कैलासवासी झाले.

( ९ ) सरदार आण्णासाहेब चंद्रचूड, जहागीरदार, पुणेंकर, हे

अडतीस वर्षांपूर्वी येथें येऊन राहिले. त्यांच्या मेंदूंत कांहीं बिघाड झाला होता व त्यास संततीहि पण नव्हती. येथें त्यांनीं पुष्कळ ब्राह्मण अनुष्ठानास बसविले, व अन्नसंतर्पणहि बरेंच केलें. ह्यामुळें त्यांची प्रकृति सुधारली व पुढें त्यांना संतति झाली. हल्लींसुद्धां दरवर्षीं ह्या घराण्यांतून देवस्थानासंबंधीं बराच द्रव्यखर्च येथें होतो.

( १० ) काशिनाथपंत छत्रे हे पंधरावीस वर्षांपूर्वीं येऊन येथें संगमावर सेवेस राहिले. दोनतीन महिन्यांनीं त्यांना दृष्टांत झाला व त्यांत त्यांना चाबूक मिळाले, आणि त्यांनीं त्यांचा उपयोग सर्कसमध्यें करून आपल्या देशांत आणि परदेशांतसुद्धां त्यांनीं श्री आणि कीर्ति मिळविली.

( ११ ) रामराव करवंदे म्हणून दहा बारा वर्षांपूर्वीं एक कोड फुटलेला गृहस्थ महाराजांपाशीं सेवा करण्याकरितां येथें येऊन राहिला होता. कांहीं दिवसांनंतर त्याला दृष्टांत झाला, त्यांत महाराजांनीं त्यास असें सांगितलें कीं, " तूं दह्यामध्यें मिरची वांटून सर्वांगास लाव. " त्याप्रमाणें त्यानें एकवीस दिवस लावल्यानंतर त्याचा कुष्ठरोग समूळ नाहींसा झाला.

( १२ ) ग्वाल्हेरचे भास्करराव पागनीस ह्यांची प्रकृति अत्यंत बिघडल्यामुळें येथें ते सेवेस येऊन राहिले. त्यांना अन्न कृमिरूप दिसत असल्यामुळें ओकारी येत असे. त्यांनीं येथें पुष्कळ ब्राह्मण अनुष्ठानास बसविले व संततधार अभिषेक चालू ठेविला. त्याचप्रमाणें अन्नदानहि बरेंच केल्यामुळें त्यांना असा दृष्टांत झाला कीं, "तुझी प्रकृति सुधारेल; वाडीस जाऊन दर्शन घे. " मग त्याप्रमाणें ते नरसोबावाडीस जाऊन दर्शन घेऊन ग्वाल्हेरास निघून गेले.

( १३ ) त्याचप्रमाणें **कडगांवचे नारायणमहाराज,** जे आजमित्तीस श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या विभूतींमध्यें अग्रगण्य आहेत, ते

येथील महाराजांच्या कृपाप्रसादामुळेंच होय. त्यांचें सविस्तर चरित्र ऐकून किंवा वाचून सर्वत्रास माहीत असल्यामुळें येथें जास्त लिहीत नाहीं.

ह्याप्रमाणें प्रत्यहीं घडणाऱ्या प्रत्येक चमत्काराचें वर्णन कोठवर करावें ! ह्या सर्व चमत्कारांवरून महाराज येथें निर्गुण स्वरूपांत प्रत्यक्ष वास करीत आहेत असें सिद्ध होतें. महाराज हें सर्वांस समान असल्यामुळें ज्याप्रमाणें जे भक्त सेवा करतील त्याप्रमाणें त्यांना फळ मिळणें स्वाभाविक आहे. कारण त्यांचें वाक्यच असें आहे कीं

**॥ ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ॥**

---

# उपसंहार.

" सत्य संकल्पाचा दाता भगवान् । सर्व पूर्ण करी मनोरथ " ह्या वचनाप्रमाणें श्रीमन्नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनीं सर्वस्वीं मदत करून माझ्या हस्तें ही अल्प सेवा करून घेतली, याबद्दल मी स्वतःस धन्य समजतों. त्याचप्रमाणें सहृदय वाचक हंसक्षीर-न्यायानें ह्या पुस्तकांतील महत्त्वाचा भाग ग्रहण करून त्याज्य गोष्टींकडे दुर्लक्ष करतील अशी मी आशा बाळगतों. कारण हा माझा पहि-लाच प्रयत्न आहे. शिवाय मातृभाषा कानडी असल्यामुळें पुष्कळ चुका असण्याचा संभव आहे, त्याबद्दल क्षमा असावी. शेवटीं ज्या श्रीमन्नरसिंहसरस्वतीच्या कृपाप्रसादानें '**गाणगापूरवर्णन**' हें पुस्तक लिहिण्याचें कार्य तडीस गेलें, त्या दयाघन प्रभूस माझे शतशः प्रणिपात असोत.

**श्रीगुरुचणारविंदार्पणमस्तु.**

---

॥ श्रीदत्तः शरणं मम ॥

॥ श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनरसिंहसरस्वती ॥

## ॥ श्रीदत्तात्रय प्रसन्न ॥

### भूपाळी गणपतीची.

उठा उठा हो सकळिक वाचे स्मरावा गजमुख ।
ऋद्धिसिद्धींचा नायक सुखदायक भक्तांसी ॥ ध्रु० ॥
अंगीं शेंदुराची उटी माथां शोभतसे किरिटी ।
केशर कस्तूरी ललाटीं कंठीं हार साजिरा ॥ १ ॥
कानीं कुंडलाची प्रभा चंद्रसूर्य जैसे नभा ।
मौंजी नागबंधीं शोभा स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥
कांसे पितांबराची घटी हातीं मोदकांची वाटी ।
रामानंद स्मरतां कंठीं तो संकटीं पावतो ॥ ३ ॥

### भूपाळी दत्तात्रेयाची.

उठिं उठिं बा दत्तात्रेया । भानू करूं पाहे उदया ॥
करीं दीनावरि तूं दया । चरण दावीं वेगें बा ॥ धृ० ॥

मंदवायु जो सूटला । पक्षी करिती किलबिला । दीपवर्ण शुद्ध जाहला । पूर्व दिशा उजळली ॥ १ ॥ करुनी कृष्णेचें स्नान । घेउनि पूजेचें सामान । मनीं लागलें हें ध्यान । कवाड केव्हां उघडेल हें ॥ २ ॥ आले देवादिक दर्शना । त्यांच्या पुरवाया वासना । संतोषोनि आपल्या मना । तीर्थप्रसाद अर्पावा ॥ ३ ॥ गुरु त्रयमूर्ती अवतार । केला पतितांचा उद्धार । म्हणुनी घेतला अवतार । भक्त तारावयासी ॥ ४ ॥ रामदास लागे पायीं । हेंचि मागणें मज देई । तूंचि माझी बाप माई । करुणा करी भक्तासी ॥ उठि० ॥ ५ ॥

## भूपाळी दत्तात्रेयाची ( कानडी ).

अरुणोदयाईतेळय्या । देवा नरसिंह सरस्वति गुरु यतिवर्या निर्द्रायळिदुनिनगय्या । निगम निद्रातितिनेयंदु होगळुवदय्या । सद्रूप सद्गुरुराया निन्न चिद्रूपदल्ले बंदीगिल्लवु माया ॥ चाल ॥ सच्चितानंदघना । सतत निन्नदु ध्याना सद्भाविगळजनरे भाविसुवरय्या ॥ १ ॥ हरिहराविधि मोदलागी त्रैमूर्तिगळुनिलुवरु गुरुशेविगागी गुरु निन्न महिमीदकागी । सुरासुररेला बंदिरवरु तलिबागि ॥ चाल ॥ परब्रह्मपराशिवने । परम सुखदायकने परम निन्निजपदने । अदु तोरिसय्या ॥ २ ॥ मौनागि मलगीद्याकय्या । कारणेनु तिळीयदु श्रीपादराया अनुसूयाऽत्रिऋषितनया । गुरु नीने अवतरसीदि दत्तात्रया ॥ चाल ॥ जन्ममरणिवु कळियो ब्यागनेमनक बोधसि इडवोनीने ज्ञानसागर बालकृष्णने गुरु रामगय्या ॥ ३ ॥

## काकडारती श्रीविघ्नहर चिंतामणीची.

( सत्पुरुष श्रीरामचंद्रमहाराज गाणगापूर कृत. )

काकडारती करूं चिंतामणी चिन्मय चिन्मूर्ती । विनायक चिन्मय चिन्मूर्ती । विघ्नहर चिंतामणी मूर्ती । सुमुख तूं सुखदायक मूर्ती । एकदंत तूं प्रसन्न असतां नयेचि भवभ्रांती ॥ ध्रु० ॥ पंचभूतांचें पट तें घेउनि कांकडा केला । वळुनिया कांकडा केला । मनानें कांकडा केला । कल्पुनी कांकडा केला । पंचप्राण ममतास्नेही बुडवुनि भिजवीला ॥१॥ सर्वाला मी साक्षी होउनि ज्योती लावियली । सोज्वल ज्योति लाविियिली । परात्पर ज्योती लावियली । सर्वेहि कांहीं नाहिंच म्हणवुनि एकचि मी उरलों ॥ २ ॥ चिंतन तुझेंचि करितां मीपणही गेलें । चिंतामणी श्रीसद्गुरुबाबा राम एक झाले॥३॥

## काकडारती दत्ताची.

श्रीगुरुदत्ता काकडारती ओवाळिन आतां । तुजला ओवाळिन आतां । भावें ओवाळिन आतां । निद्रातीत जागृत असतां नयेचि उठवीतां ॥ ध्रु० ॥ मायावस्त्रांतुनि हे चिंधी सांपडली मजला । नरतनु सांपडली मजला । अवचित सांपडली मजला । वाया न जाऊं द्यावी म्हणुनी काकडा केला ॥ १ ॥ विद्या अविद्या द्वैत उठतां त्रिपुटी उद्भवली । साहजिक त्रिपुटी उद्भवली । मायिक त्रिपुटी उद्भवली । सद्वस्तूचें स्मरणहि नसतां । पीळ पडुनि गेली ॥ २ ॥ मोहरूपें स्नेहांत बुडवुनि ज्योती लावियली । स्वयंज्योती लावियली । परंज्योती लावियली । पाहुनि सद्गुरु बाबा राम म्हणे निशा सरली ॥ ३ ॥

## काकडारती दत्ताची ( कानडी )

चाल—शिवदर्शन मजला

दत्तगुरुगारती ब्यळगुवनो । कक्काडिदुआरती ब्यळगुवनो आरती ॥ ब्यळगुवे अरुवि कक्काडिदु मरवुकत्तलिगे हरिसी हाकुवदिदु ॥ ध्रु० ॥ स्वामि गुरुनरसिंह सरस्वतीयो । प्रेमदिंदवतरिसिदी यतीयो । नेम-दिंदाचरिसिदी कृतियो कामिसुवरिगे नीनु कामिसुवंथवफल कामधेनूने आगी काम पूरिसिदीयो ॥ १ ॥ मनसिनली त्रिविक्रमभारतियो निनग आव निंदिसुवदीपरियो । निन्नदेंथा करुणियु निनगे निंदिसिदरु येनू कोपिसदे निन्नविश्वरुप तोरिसिदियो ॥ २ ॥ तंतुकग श्रीशैल्यवु तोरिसिदियो । अंतरेनु नोडिदव अलेपरिये अंथवगल्हे निन्नरूप तोरिसिदियो । अंतिल्लदे अनंतरूपानीनू संत सद्गुरू बाबानंतरामग ध्वरियो ॥ ३ ॥

३

# आरत्या

## आरती धूपाची

संवेदन निजअग्नि सोज्वळ निजतेजा । करूनिया सुवास वासना बीजा । तेथें धूप जाळिला त्रिगुणात्मक सहजा । तो सुवास भरिता अंगीं आनंद माझा । जयदेव जयदेव जय जय कुलदीपा । तुझिया पदपद्माप्रति अर्पिन मी धूपा ॥ ध्रु० ॥ निर्गुण निर्विकार आनंद-रूपा । पूर्णानंद झालों पूर्ण प्रतापा । तो तूं आम्हालागीं झालासी सोपा । शिवरामाचे अंगीं करावे धूपा ॥ १ ॥

## एकारती

देहत्रयवाती एकवटुनीया । अव्यक्त स्नेहानें वरव्या भिजवुनिया । साक्षित्वाचा दीप सोज्वळ लावुनिया । मीतूंपण सांडून पदिं ओवाळुनिया ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय तेजोराशी । एकारति ओवाळूं तुझिया पायासी ॥ १ ॥ स्वयंप्रकाश तुझें रूप हें साजीरें । पाहातां मनबुद्धीचे जाहले पाझर । पूर्णानंदें सुख हें सबाह्य अंतर । शिवरामीं आराम नित्य नवभर ॥ २ ॥

## नैवेद्यारती

रसरसना रस खाशी गुरुराज सखया । रसभरित पक्वान्नें पायससम खाया । नाना लवण शाखा पापड वोदनया । भक्ष्य परान्नें भक्षुनि कथिका रुचि खाया । जयदेव जयदेव जय जठराग्निरूपा । पावा रसपाकाते रस अन्न स्वरूपा ॥ १ ॥ तृप्ति तुज अर्पण अर्पक तूं । अर्पण अर्पनि अर्पक तृप्ती सहज तूं । पूर्णानंद ढेकर शिवराम भरितु । न चले आग्रह घेतां ग्रासुनिया मी तूं ॥ २ ॥

## नीरांजनारती

पंचप्राणांचें नीरांजन करुनि । पंचतत्त्वावरती परिपूर्ण भरुनि । मोह माया ममता समूळ भिजवूनी । अपरोक्ष प्रताप तेज पाजळोनी ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय निरंजना । नीरांजन ओवाळुं तुझिय

समचरणा ॥ १ ॥ ज्वाला न काजळ दिवसां न रात्रीं । सदोदित प्रकाश प्रत्येक प्रकृति । पूर्णानंदें झालों बोले मी किती । उजळों हे शिवराम नित्य नवदीसी ॥ २ ॥

## श्रीपादवल्लभ आरती

श्रीपाद श्रीवल्लभयतिवर भगवन्गुरुकीर्ते । नानां नरसुरवरगण-संस्तुत करुणाभयमूर्ते । नित्यानंदसमाधिसमाहितमानसपारिपूर्ते । मुनिजनमानसहंसपरात्पर जयजय गुरुमूर्ते ॥ १ ॥ सर्गास्थितिलयकारण शंकर परिपूर्णस्फूर्ते । चरणयुगें भूसुरगणपालक ·दारित—आवर्ते । दुरितविनाशक कृष्णातटमठाविहरण परिपूर्ते । कल्पतरु औदुंबर छाये निर्विसिष्ठापूर्ते ॥ २ ॥ मामतिकृपणमनाथं जीवय भुवनव्यावर्ते । करुणाकर मामुद्धर पतितं गुरुमायागर्ते । स्वत्पदशेखर तीर्थ सद्गुरु स्वत्पदव्यावर्ते । भारति नाथे यतिं प्रति·पालय भवभयपाशाते ॥ ३॥

## मंगलारती कानडी

स्वामी नरसिंह सरस्वती गे मंगल । कामीतकामफलतृप्तीगे मंगल ॥ ध्रु० ॥ निरुपम नित्यनीरमायागे मंगल । निर्वाणव्यक्ति यतिरायागे मंगल ॥ १ ॥ भक्तजनर कल्पवृक्षागे मंगल । भक्तिंदुभजसुव मोक्षागे मंगल ॥ २ ॥ भीमागंधर्वपूरवासागे मंगल । भीमाशंकर गुरुवेषागे मंगल ॥ ३ ॥ स्वामी नरसिंह सरस्वती गे गुरुमूर्ति । यतिवर्या गे मंगल कामीतकामफलतृप्तीगे मंगल ॥ ४ ॥

## गुरुवार आरती १

आघ्राणुनि धूपारति एकारति फिरवी । अर्पुनि भक्ष्यभोज्य मुख-शुद्धी करवी । त्यानंतर पंचारति ओवाळुनि फिरवी । सुवर्ण रचिलीं पुष्पें पूजा पहावी ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय विश्वंभरदेवा । कृष्णातटिं औदुंबरसहजाची सेवा ॥ १ ॥ नवखंड पृथ्वी तुज नव-रत्नें वळिला । ओवाळुनि ठेवितसे दावुनिया सकळां । नवलाश्चर्य स्तवन प्रार्थितसे कमला । नवकोटी नारायण शेषानें धरिला ॥ २॥

नवग्रह संतोषतसे नर कारण कार्या । सबाह्य होउनि रक्षिसी पावन गुरुवर्या । ब्रह्मानंदक्षेत्रीं मठ बांधुनि वर्या । जडित जडिला होसी गोपालकवर्या । जयदेव ॥ ३ ॥

## आरती २

ब्रह्माचि केवळ आले अक्कलखोपेसी । औदुंबर दत्तात्रेय कृष्णातिर-वासी । केवळ सच्चिद्घन तो पावन भक्तासी । शिवरूप समजुनि आलों सेवक चरणासी ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय ब्रह्मानंदा । श्रीगुरु परमानंदा सच्चित्सुखकंदा ॥ १ ॥ म्हणती त्रिगुणात्मक हे ब्रह्मचि अवतरले । ज्याच्या दर्शनमात्रें कलिकिल्मिष हरले । शर-णागत भाविक दासा उद्धरिलें । पदांबुज नौकेनें भवसागर तरले ॥ २ ॥ नयनीं अज्ञानांचें तिमिर तम दाटे । ज्ञानांजन देउनिया लाविसी सद्वाटे । विफल जिणें तापत्रय सद्गुरुविण वाटे । लवपळ-वियोग घडतां युगसम घडि लोटे ॥ ३ ॥ तव गुण निजहित पाहत संसारीं श्रमलों । नेणों संचित कैसें सुकृत आचरलों । सेवक मी सर्वज्ञा शरणागत आलों । तारावें पतिताला चरणीं अनुसरलों ॥ ४ ॥ अघसंचित दोषानें फिरलों चौऱ्यांशी । अवचितयोगें आलों या नरदेहासी । अतिदुःखानें पिडलों पावे गुणराशी । अक्षयसुखही द्यावें आत्मारामासी ॥ ५ ॥

## आरती ३

जयजया नरसिंह सरस्वती । जय सद्गुरुमूर्ति । पाय वंदोनि भक्ति । साधुसंतजनाविश्रांति । विष्णुविभूती । देशी सायुज्यमुक्ति । जय ॥ध्रु०॥ स्वामी शरणागतवज्रपंजरू श्यामसुंदरू अतसीपुष्पे प्रकारू । माथां मुकुटप्रभाविस्तारू । कोटी दिनकरू । कर्णीं कुंडलें मकरू । कंठीं वैजयं-तीचा हारू । रुळे मनोहरू । पदककौस्तुभ रुचिरू । कटीं मेखला पीतांबरू । शोभे निर्धारू । चरणीं नुपुरे तोड्रू ॥ १ ॥ स्वामी माध्यंदिन शाखे अवतारू । धरुनी गुरुवर । निर्गुण निराकारू । रामकृष्ण वपू

साकारू । तैसा सुखकरू । बाललीला अपारू । दावोनि जननींस मनोहरू । मौंजी विस्तारू । झाल्यानंतर त्वरू । येवोनि काशीविश्वेश्वरू । नमूनि सत्वरू । चतुर्थाश्रम अंगीकारू जयजया०॥ २ ॥ स्वामी कुरुंदवाडासी येवोनि तेथें राहोनी । नाना चरित्रें दावोनी । मग गाणगापुरा येवोनी । वस्ती करोनी । गुरुगम्य प्रगटोनी । गुरुचरित्र लिहोनी । पूजा करोनी । अर्थ जाणे तत्क्षणीं । त्याची येरझार राहोनी । गुरु होवोनी । शंकर तोचि मानी । जयजया० ॥

## शुक्रवार ( १ )

श्रीमद्योगविलोलं सच्चित्सुखखेलम् । विहितौदुंबरमूलं कुशलं शिवसकलम् । कृष्णातीरसुलीलं मुनिजनसुखपालम् । लीलं चिन्मयममलं नरहरिपदकमलम् ॥ १ ॥ जयदेव जयदेव सद्‌गुरु परमात्मन् ! दत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ स्वामिन् ॥ ध्रु० ॥ श्रीपाद श्रीवल्लभ दुर्लभपदतीर्थम् । शुक्लं दुर्गा जान्हवि अघमोचनतीर्थम् । प्रयागसंगमकाम्यं वरदाभयतीर्थम् । कृष्णापंचकसिद्धं कोट्याविधितीर्थम् ॥ २ ॥ श्रीमद्ब्रह्मविहारं चिन्मयमनोहारम् । ब्रह्मानंदाकारं भुवने श्रुतिसारम् । यस्यौदुंबरमूलं त्रैगुणअवतारम् । नरसिंहयतिवरधीरं रघुपतिसुतपालम् ॥ ३ ॥

## ( २ )

त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा । त्रिभुवनीं आधार त्रैलोक्यराणा । नेति नेति शब्द नये अनुमान। सुरवरमुनिवर योगी समाधिले ध्याना ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरु दत्ता । आरती ओवाळितां हरसि भवचिंता ॥ ध्रु० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त । अभाग्यासी कैची नकळे ही मात । पराही परतली कैचा हा हेत । जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ २ ॥ दत्तदत्त ऐसें लागलें ध्यान । हरपलें मन झालें उन्मन । मीतूंपणाची झाली ओसण । एका जनार्दनीं श्रीदत्त ध्यान ॥ ३ ॥

( ३ )

कृष्णापंचगंगासंगम निजस्थान । चरित्र दावुनि केलें गाणगापुरीं गमन । तेथें भक्तश्रेष्ठ त्रिविक्रम यति जाण । विश्वरूपें तया दिधलें दर्शन ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता । नरसिंह सरस्वत्या जय विश्वंभरित्या ॥ ध्रु० ॥ वंध्यासाठीं वर्षें पुत्रनिधान । मृत ब्राह्मण उठवी तीर्थ शिंपून । वांझ महिषी काढवी दुग्ध दोहून । अंत्यजाचे मुखीं निगम संपूर्ण ॥ १ ॥ शुष्ककाष्ठीं पल्लव दावुनि लवलाही । कुष्टी ब्राह्मण केला शुद्ध निजदेहीं । अभिनवलीला त्याची वर्णूं मी कांहीं । म्लेंच्छ राजा येउनि वंदी तव पायीं ॥ २ ॥ दिपवाळीचे दिवशीं भक्त येवोनी । आठहीजण मस्तक ठेविती तव चरणीं । आठहि ग्रामीं भिक्षा केली ते दिनीं । निमिषमात्रें तंतुका नेला शिवस्थानीं ॥ ३ ॥ ऐसें चरित्र दावुनी जडमूढ उद्धरिले । भक्तवत्सल ऐसें ब्रीद मिरविलें । अगाध महिमा म्हणुनी वेदश्रुति बोले । गंगाधरतनय वंदी पाऊलें ॥ ४ ॥

( ४ )

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी । वारी वारी जन्ममरणातें वारीं । हारी पडलों आतां संकट निवारी। जयदेवी जयदेवी जय महिषासुरमाथिनी।सुरवर ईश्वरवरदे तारक संजिवनी।।ध्रु०।।त्रिभुवनभुवनी पाहतां तुज ऐसी नाहीं । चारी श्रमलों परंतु न बोलवे कांहीं । साही विवाद करतां पडले प्रवाहीं । तें तूं भक्तालागीं पावसि लवलाही ॥ १ ॥ प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासा । क्लेशापासुन सोडी तोडी भवपाशा । अंबे तुजवांचून कोण पुरवील आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ २ ॥

## शनिवार आरती

श्रीमन्नरसिंहसरस्वती गाणगापुरवासिन् । भीमाऽमरजा संगम अश्वत्थसान्निद्धन् । अगणितमाहिमा सहजत्रयमूर्ति स्वामिन् । वंदे नरहरि-

योगिन् जय करुणालीलं । जयदेव जयदेव जय नरहरिया । श्रीपाद श्रीवल्लभ करुणानिधि प्रिया ।। ध्रु० ।। श्रीपाद श्रीवल्लभ कुरुक्षेत्र-स्थानम् । वामद्वारे गणपति वृंदावनयुग्मम् । पश्चात् शुक्लांबरधर संगमेश्वरकूलम् । हनुमन्नागा जान्हवि औदुंबरमूलम् ।। १ सन्मुख कृष्णा वेण्या पंचगंगा युग्मम् । अमरपुरातें प्रगटे पश्चिम अश्वत्थम् । निजजनभक्तसेवित गोपालयुग्मम् । किंकर कुंभजवंशीं वांछित तव चरणं ।। २ ।।

( २ )

काषायांबरखंडसुनिर्मितकौपीनम् । दंडकमंडलुमंडितमुंडिन्मूर्धानम् । अरिमंडलमदखंडनपंडितविज्ञानम् । योगकलाकलिताखिलस्वस्पदमहिमानम् । जयदेव जयदेव जय यतियूथपते । रुचिरानंदसरस्वति मामुद्धर सुमते ।। ध्रु० ।। पद्मासनविजयश्रीसेवितपादाग्रम् । अर्धोन्मीलितनयनं निरीक्षितनासाग्रम् । प्रणवांतःप्रतिपाद्यम् स्वानुभव एकाग्रम् । जगदुद्भाव सुधामनि जगदीशावाग्रम् ।। १ ।। हरिकीर्तनसभया धृतवैकुंठनिवासम् । पंचीकरणमहावाक्योपदेशम् । निजजननिगमागमभाषितचिद्भासम् । वंदे रुक्मसुतार्चितपादुकमविचिंत्यम् ।। २ ।।

( ३ )

काषायांबरवसना रुद्राक्षभरणा । दंडकमंडलु शोभे यतिरूप सगुणा । भस्मोद्धारण अंगीं सुप्रभागहना । प्रसन्नमूर्ति वरदा निजभक्ताधीना । जयदेव जयदेव जय भोजनपात्रा । सुरवर वंदुनि स्तविती निगमागमवक्त्रा ।। ध्रु० ।। कामधेनु श्रीगुरु भक्ता कैवारी । तीर्थें पावन करिती त्रैलोक्यांतरीं । भिलवडी चातुर्मास स्थित औदुंबरीं । द्विजवर याचक केला निगमागवमक्त्री ।। १ ।। कृष्णाप्रयागसंगम श्रीगुरु सुराधीश । सिद्धभूमि वसवी कल्पद्रुमसुरस । अमरपुरीं धनवर दे धनपद रजकास ।। २ ।। कल्पतरु चिंतामण यतिवर तपराशी । गेले शिरोळभिक्षे कणिकद्वारेसी । शिलापात्रीं कण्या भक्षुनि पर्येसी। सति पाला-

वर देउनि प्राप्ती वर भूसी ॥ ३ ॥ स्मरणीं पावन नरहरी ब्रह्म परम । चरणप्रताप न कळे निजभक्तां प्रेम । अपराधी मी अमित यांचा करि क्षेम । रामदास वंदी तव पादपद्म ॥ ४ ॥

( ४ )

दैत्यीं पूर्वीं उर्वी त्रासित अति निकरीं । क्षीरसागरीं प्रार्थिति सुरमुनि अवधारी । ऐकोनी कृपें द्रवला श्रीप्रभु अंतरीं । म्हणे ना मी सर्वा श्रीगुरु कैवारी । जयदेव जयदेव जय नरहरी अवतारा । श्रीकर श्रीवर श्रीधर विधिकर श्रुतिसारा ॥ध्रु०॥ भक्तमुखीं श्रीस्तंभीं क्रोधें अवतरले । कड कड शब्द होतां फणिवर सुर लवले । अग्निधाकें कूर्ममेरु नग खचले । तटतट तुटती तारे सागर कालवले ॥ १ ॥ भूकंपित पातालीं स्वर्गादि गगन । डळमळलीं ब्रह्मांडें चंडांशुशशिपवन । हिरण्यकश्यपु अंगीं स्वनखें विदारून । अंतरमाळा घाली श्रीसिंहवदन ॥ २ ॥ सुरेंद्रादि अमर श्रीसह सन्निध । प्रल्हादादिक स्तविती तोषुनि अनिरुद्ध ॥ ३ ॥ नखें रोवितां औदुंबरीं हरितां विषक्रोध । जयजयकार करिती सुरमुनि अगाध ॥ ४ ॥ औदुंबरीं कल्पद्रुम करोनि प्रख्यात । लक्ष्मी नरसिंहदेव सर्वहि वर देत । जाणुनि राहे नरहरि तरुतळिं अतिप्रीती । पदतीर्थामृत गंगा सेवित गुरुभक्ती ।५।

## रविवार

अयं कृष्णारूपं वेण्या शिवरूपम् । कोशं पंचगंगा षट्कुळरहिवासं । प्रज्ञाकल्पद्रुमाशिव आत्मा गुरुमीशम् । दत्तं देशिकवरदं त्रिगुणात्मकमीशम् । जयदेशिक तेजोयम आनंद योगी । सद्गुरुराज स्वामी करुणामृत भोगी । ॥ध्रु० ॥ १ ॥ भवनिधितरणोपायं यतिमज्जननमनं । साधकसिद्धकरूपं आत्मकतनुलग्नम् । स्वमेव कारणमष्टतीर्थं गुणगहनं । प्रकटे राष्ट्रप्रकाशित श्रीपदि तनुलग्नम् ॥ २ ॥ ब्रह्मज्ञानमनंतं तत्परयतिकार्यं । मायामानुषवेषं यतिरगंभीरम् । नामस्मरण नामधारककृतकार्यं । सत्यज्ञानमनंतं यतिलीलावर्यम् ॥ ३ ॥

( २ )

श्रीपाद श्रीवल्लभ औदुंबर निकटीं । भस्मोद्धारण अंगीं रुद्राक्ष कंठीं । व्यांघ्रांबर आसन हिमकर तो मुकुटीं । रक्षी भक्तालागीं भव-भयसंकटीं । जयदेव जयदेव जय औदुंबरवासी । कृष्णा तूझे चरणीं उद्धरि जगाशीं ॥ ध्रु० ॥ जिव्हा देउनि द्वीजा वेद वदवीसी । छेदुनि शाखावेल त्याप्रति वर देसी । रजकोद्धारण करुनी राज्यीं स्थापिसी । उदीम विप्रालागीं तस्कर वधीशीं ॥ १ ॥ वामभागीं गणपति पादुक निजस्थान । पूर्वभागीं देखा अमरेश्वर गहन । प्रयाग संगम जाणा न धरा अनुमान । स्नानमात्रें होतीं पतितोद्धारण ॥ २ ॥ संगमेश्वर अमरेश्वर दुर्गेश्वर जाण । प्रयागेश्वर निकटीं सुदर्शन पूर्ण । पश्चिमे अश्वत्थीं कमला आपण । ऐसें स्थान आहे कल्पतरू जाण ॥ ३ ॥ ऐसा महिमा वर्णित यात्रे जन येती । स्नानमात्रें साधिति चारिही मुक्ती । तेथें कैंचे राहे दोषादिक वस्ती । गुरु भक्तासी स्वामी द्या चरणीं मुक्ति ॥ ४ ॥

( ३ )

श्रीकृष्णातटनिकटीं औदुंबरस्थान । त्रैमूर्तींचा वास तेथें अनुदीन । जाउनि भक्त करिती पादुकार्चन । प्रसन्न होउनि त्यांप्रति देती वरदान । जयदेव जयदेव जय दिगंबर योगी । श्रीपाद श्रीवल्लभ तारक तूं जगीं ॥ ध्रु० ॥ शिरोळ नाम ग्रामीं विप्रस्त्री होती । तिजसी स्थिर नोव्हे उदरीं संतती । यास्तव जाउनि द्विजा करिती विनंति । द्विजवर बोलती सेवा औदुंबर त्वरिती ॥ १ ॥ सती ऐकुनी तेव्हां स्थाना अर्चीत । पिशाच्च वदे इससी दंडिन मी त्वरित । चित्तीं भिउनी वनिता वृक्षाश्रय करित । तव ती गुरुसी देखुनि पाठीसी रिघत ॥ २ ॥ गुरुनि दंडुनी पिशाच्च आज्ञा करीती । सुकृत अर्चन करणें या लागीं मुक्ती । पुत्र होईल तुजला युग्म प्रख्याति । मृत पुत्र जीवविला अपार संतती ॥ ३ ॥ संतोषोनि

तेव्हां दंपती निका । आराधना केली द्विजानें ऐका । ऐशी ख्याति केली त्या स्थानीं ऐका । विनवीतसे गुरु भक्तजनलोकां ॥ ४ ॥

## कानडी आरती.

स्नानक कृष्णापंचगंगासंगम । ज्ञानक यल्लरू आत्मरू अग्निहोत्र धर्म । दानक ब्रह्मरु तत्परु वेदोक्त कर्म । मानव यल्लरु आत्मरु अध्यापन प्रेम । जयदेव जयदेव जय करुणासिंधो । श्रीपाद श्रीवल्लभ दत्तात्रय साधो ॥ध्रु०॥ महागणपति पूजीं भक्तिंदालि माडू । सिंहासनगुरुपादुक अर्थिदालि नोडू । महाद्वारद मुंदे वृंदावन यरडू । महाशेषा हनुमंत योगिनीवर कूडू ॥ १ ॥ संगमेश्वर अमरेश्वर शुक्रेश्वर लिंगा । अगम्य अरळी वक्षा औदुंबर योगा । हांगे पश्चिमदिक्किगे अश्वत्थलिंगा । महालक्ष्मी वायव हरिहर सर्वांगा ॥२॥ मरूलोकद वळगे इंथा स्थळविल्ला । दारु वंदरे इल्ले द्वैतद नडतिल्ला । करुणादिंदालि भक्तर मनसिनबेकल्ला । गुरुधनु कोडूवनु ब्यागे बेडिद फळ ब्यल्ला ॥ ३ ॥ आगो इयो तिळियदु होगवदु यल्ला । ईगो मनसिन भ्रांति दारिगे दारिल्ला । सागो ब्यागने नीनु संशय बिडुयल्ला । ह्यांगो चिंतामणि गति दत्तात्रय वल्ला ॥ ४ ॥

## सोमवार आरती.

लवथवती विक्राळां ब्रह्मांडीं माळा । विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा । लावण्य सुंदर मस्तकीं माळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ १ ॥ कर्पुरगौर भोळा नयनीं विशाळा । अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा । विभूतींचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥२॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजीं अवचित हळहळ जें उठलें । तें त्वां असुरपणें प्राशन पैं केलें । नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥३॥ व्याघ्रांबर फणिवर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुख-

कारी । शतकोटीचें बीज वाचें उच्चारीं । रघुकुळतिलक रामदासा अंतरीं ॥ ४ ॥

( २ )

सद्योजातं प्रपद्यामि स्मरणे श्रुतिमंत्रम् । सांबं पंचवक्त्रं चेतो मम देवम् । सहजं सहजानंदं सकलं परिपूर्णम् । सर्वं ब्रह्मेतीति श्रुतिभिः प्रतिपाद्यम् । जयदेव जयदेव जय त्रिंबकराजन् । गंगाधर गौरीधर शंकर शूलपाणिन् ॥ ध्रु० ॥ भवे भवे नातिभवे आजाति त्रिनेत्रम् ।) भजस्व तेजो बुद्धिर्महता जगदीशम् । अनादिनाथे वेदे आत्मा विश्वेशम् । मृगधर परशूहस्त शिवचंद्रमौलिन् ॥ १ ॥ कामदेवं वंदे विदेहकैवल्यं । सद्योजातं साधिजे पृष्ठश्रेष्ठत्वम् । विभूतिचर्चित-भूषितभूषणं सर्वांगम् । नमामि रुद्रं काले तारकजगदीशम् ॥ २ ॥ अघोरंघोरं हयरुद्रोभिमम् । भूतं भूतनाथं भुजंगफणिभूषम् । कप-र्दिकामारिं भयकृद्भयनाशनम् । सर्वं सर्वाध्यक्षं भक्तानुग्रहणम् ॥ ३ ॥ तत्पुरुषाय विद्महे तन्मय आनंदम् । महादेवं बुद्धिव्यापकजगदीशम् । त्रिगुणं त्रिगुणातीतं । तत्पदपरमेशम् शंभोनादामोदं प्रणवं ओंका-रम् ॥ ४ ॥ ईशानः सर्वभूती भजेत विद्यत्वम् । ब्रह्मादिपत्यत्वं ब्रह्मापरमेशम् । सत्यं सत्यानंदं चिन्मयसहकाशम् । चिदानंद-हेतुः शिव शिव ओंकारम् ॥ ५ ॥ विद्याधर अमर किन्नर गायति संगीतम् । नंदी भृंगी चंडी गणपति नृत्यत्वम् । तांडव विगणित शंभो अद्भुत आनंदम् । हरिहरब्रह्माध्यक्षं त्रिंबकप्रभुराजम् ॥ ६ ॥ अनंतशेषहरिहर ब्रह्मामध्यस्थम् । नारदतुंबरगीतं सन्मुख हनुमं-तम् । अगणितमहिमाध्यक्षम् अभयं वरदानम् । गंगाधरदीक्षितकृत मुक्तिसायुज्यम् ॥७॥

( ३ )

दिगंबर पीतांबर व्याघ्रांबरवसन । सहचारी दशबाहू विद्युत् त्रिनयन । मातापुर नगर एक स्मशान । वसतिस्थान भिन्न परि तो

अभिन्न । जयदेव जयदेव दत्ता अवधूता । श्रीकृष्णा भगवंता जय गौरीकांता ।। ध्रु० ।। ब्रह्मचर्यसंपन्न श्रीरमणीयस्थान । हेमाद्रि तनया जाया हे चंद्रवदन । पाचूचें करि पद्म नागारी गहन । वृषभारूढ जो कां त्रिपुरारी गहन ।।१।। स्तविता भेदाभेद न कळे तत्त्वतां । न कळे भेदाभेद कवण मी वक्ता । गुरुचि सर्वहि ऐसें भासे पंडिता । म्हणवुनि मौने चरणीं ठेवियला माथा ।। २ ।।

( ४ )

सुखकरिता दुःखरहिता निर्मल एकांता । कलिमलदहना गहना स्वामी समर्था । न कळे ब्रह्मादिकां अंत अनंता । तो तूं आम्हां सुलभ जय कृपावंता । जयदेव जयदेव जय करुणाकरा । आरती ओवाळूं सद्गुरु माहेरा ।। ध्रु० ।। मायेविण माहेर विश्रांति ठाव । शब्दीं अर्थलाभ बोलणें वाव । सद्गुरुप्रसादें सुगम उपाय । रामीरामदास फळला सद्भाव ।। १ ।।

## मंगळवार आरती.

कृष्णापंचगंगासंगम बहु थोर । उत्तरवाहिनि शुक्ल तीर्थ अपार । श्रीऔदुंबर सावित्रि पुष्टि निर्धार । तेथें स्वपदीं तुझें आनंदसार । जय देव जयदेव जय सद्गुरुवर्या । नरसिंह सरस्वती नकळे तव चर्या ।। ध्रु० ।। परमहंस योगी यतिवर संन्याशी । सिद्धनाथ पूजिती वर्णिता महिमेसी । अनेक कोटीतीर्थें गुरुचरणांपासीं । वंदुनि सेवा करिती पावति यशमुक्ति ।। १ ।। प्रत्यक्ष कलियुगीं यात्रा भरत । माघवद्य प्रतिपदा आनंद होत । हरिकीर्तन करिती जे साधुजन संत । ऐसे उद्धव लिंग हृदयीं प्रकटत ।। २ ।।

( २ )

मूर्ध्नि यस्य स्वकरे दया निजध्यासी । त्यांची ममता जाळुनि धुळिसी मिळवीसी । करुणा योगच्छत्या प्रति लोक येती । त्यांना स्वपदीं देवा देखत बसवीसी ।। ध्रु० ।। जयदेव जयदेव जय सद्गुरु

वर्या । अभाविकाला नकळे अद्भुत तव चर्या ॥ १ ॥ व्याघ्रांबर कनिकेया सकृदपि संचरासि । त्यांचा भवसंताप निववाया वससी । यश त्वं कल्याणं मनसा चिंतयसि । त्यांचीं दुरितें तत्क्षणीं निर्मूल करिसी ॥ २ ॥ तव पदपंकजयुगलीं भक्त्या दृढतया । नमितां स्तवितां ध्यातां मग कैची माया । स्वामी शरणांगत रुक्मतनया । करितां गर्भीं योगी देवा सखराया ॥ ३ ॥

( ३ )

श्रेष्ठःश्रेष्ठाचार्यपरिव्राजकहंसम् । प्राहुस्त्यागी भोगी कर्मणि संन्यासस् । मम चिंतापाशम् रहितनीवासम् । सब्रह्म जानति ब्रह्मण्याधीशम् । जयदेव जयदेव जय सद्गुरुवर्या । नरसिंहसरस्वती स्वामी षड्गुणऐश्वर्या ॥ ध्रु० ॥ शशांकशोभितवदनं लोचनदैदीप्यम् । सहस्रकिरणें प्रभा प्रचंडस्वरूपम् । मस्तकिं जटामुकुट तन्मध्ये लोपम् । कुंडल मकराकारं करणीं आलोपम् ॥ १ ॥ दंडकमंडलुमंडितकरयुग लिश भागीं । भूतामूते भूतिक भुवनत्रय अंगीं । कंठाभरणमाला वज्रांकित योगी । दिव्यांबरकौपीनं बरवा वितरागी ॥ २ ॥ स्वभाशन शासन मुद्रासन निकटा । समाधि अवस्था योग भोगूनि उत्कृष्टा । योग युंजन युंजन कळा उपविष्टा । नहिजा नहि करणीं स्मरणीं अस्पृष्टा ॥ ३ ॥ मायाकल्पमनंतमाचिंत्यशक्ति । सकृत् दर्शनमात्रे भवभय संहरति । मंत्रोपदेशबोधे धरुनि निजशांति स्वामीचरणस्मरणे नारायणारती ॥ ४ ॥

( ४ )

अत्रि अनुसूयानंदन दत्तात्रय हरा । गिरी सुंदर सिंहाचल है स्थान तेरा । माथां छत्र बिराजित वनमंडत सारा । अंक व श्रीमुख शोभत शरणांगत तेरा । जयदेव जयदेव त्रिभुवनके राजा । चारो वेद बजावत नौबत की बाजा ॥ ध्रु० ॥ सनकादिक मुनि साधक नारद कर जोरे । विघ्नेश्वर साहेब उमराव तेरे । बैठे निज तक्तों-

पदपंकज सेविति ब्रह्मादिकपाळा ॥ १ ॥ दंडकमंडकलुछाटी भस्मांकित काया । शैली शृंगी कंठीं शोभे प्रभुराया । कलियुगीं अवतार भक्त ताराया । चला जाऊं पाहूं षड्रिपु माराया ॥ २ ॥ स्नान गोदातीरीं भिक्षा करवीरीं । झोळी सोडुनि भक्षी रंका सरोवरीं । त्रैलोक्याचा राजा निद्रा माहूरीं।गोपालात्मज चिंतामणिचा कैवारी॥३॥

( २ )

कृष्णापंचगंगा उभयसंगमीं अखंड तुमचा वास श्रीपाद स्वामी । औदुंबरछायेसी बससी सुखधामीं । करुणासिंधु यतिवर मति द्या तव नामीं ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय गुरुमूर्ते । श्रीपादश्रीवल्लभनरसिंह सरस्वती ॥ ध्रु० ॥ माध्यंदिन शाखेसी घेउनि अवतार । लीलाचरित्र केलें अगणित अपार । काय वर्णूं महिमा मी अति पामर । शरण आलों आतां न करा अव्हेर ॥ २ ॥ माघमासीं यात्रा भरली सज्जन । मृदंगवीणा लावुनि करिती कीर्तन । ठायीं ठायीं श्रीगुरुचरित्रपठण । सदाशिव भावें करिं निरांजन ॥ ३ ॥

## पालखी बसल्यानंतर म्हणावयाची आरती.

अत्रिअनसूयानल्यवतारव कोंडू । दत्तात्रेय अंबवा रुपावा कोंडू । पतिआज्ञा इल्लदे भिक्षावा कोंडू । सतिगे सुखवा कोट्टु भक्तीया कोंडू । जयदेव जयदेव जय सद्गुरुराया । कायो करुणाकर नी साधुजनप्रिया ॥ ध्रु० ॥ कलौ श्रीपाद श्रीवल्लभनागी । कलिमल हरिसि मुढर कायुवनी योगी । नरसिंह पुरवादोळू प्रख्यातवागी । वैदूर रजकग राज्या कोट्टिदि घख्यागी ॥ १ ॥ कारंजनगरदालि हुट्टिदि नरहरि नी । तोरिसी संज्ञामात्रे व्रतबंधन मौनी । सर्वरिगे तत्त्व हेळिदि सन्मानी । इरदे तिळदे होदी आनंदकांनीं ॥ २ ॥ नाकानु आश्रम धरिसिदिनी ब्यागे । नालकु पदवि कुडत तिरिगिदी जगदोळगे । बेर्कोंबो शिष्या माडिदि सायंदेव गे । आकृष्णानिकटा वलिदू योगिनिगे ॥ ३ ॥ महास्थानामरजा संगम अनुपम्य । महिमी पोगळलि

यष्ठु गाणगापुरगम्य । इहपर दर्शनमात्रे कुडवे सुखधाम । साहित वागी दासग सलहो निज प्रेम ॥ ४ ॥

## गुरुचरित्राची आरती.

मूर्तित्रयगुणसारं निर्गुणविस्तारम् । षड्गुणपारावारं दुर्जनसंहारम् । भक्तप्रियदातारं कल्पितपरिवारं । मुनिजनमानसहारं निगमागमसारम् ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव वंदे गुरुचरितम् । कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ॥ १ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर कृतकृत्यम् । नरहरि भारतिलीला ब्रह्मादिकस्तुत्यम् । कलिमलदाहकमंगलदायकफलनित्यम् । पारायण देही मे पुस्तकमपि चित्तम् ॥ २ ॥ त्वद्भुतलीलासारं श्रुतिसकलाधारं । कांडत्रयविस्तारं प्रत्ययलघुकारम् । कल्पद्रुमफलभारं कल्पितदातारम् । पठनामृतरसधारं भवभयपरिहारम् ॥ ३ ॥ अगाधश्रीगुरुकरणं भूइच्छातरणम् । ज्ञानामृतरसभरणं जडजीवोद्धरणम् । भक्त्या कृतमपि स्मरणं तापत्रयहरणम् । निगमारहितमहिमा मोक्षश्रीवर्णम् ॥ ४ ॥ श्रीगुरुकरुणाकृत्यं सिद्धेश्वरगतिम् । शारदा गंगाधरसुतमथितं नवनीतम् । भाविकभक्तप्रियकरकृतलौकिक दत्तम् त्वद्भुतशेषं वांच्छितसखहरिहरचित्तम् ॥ ५ ॥

## आरती अष्टतीर्थांची.

अगम्य यात्रातीर्थ क्षेत्रं गुरुस्थानम् । प्रत्यक्ष वैकुंठ गाणगापुरगमनम् । भक्तवत्सलस्वामीशरणागतशमनम् दत्तं यति नारायण दर्शन यतिचरणम् ॥ ध्रु० ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुमूर्ते । आरती ओवाळूं सद्गुणपरिपूर्ते । भीमामरजासंगम प्रयोगपदातीर्थम् । उत्तरादिशा महायात्रा भागीराथितीर्थम् । मूळस्थळ औदुंबर नरसिंहतीर्थम् । पापविनाशी सद्गुरुपादोदकतीर्थम् ॥ १ ॥ जातां स्वामी शरण आनंदस्थानम् । कोटी तीर्थ स्नान कोटी फलयज्ञम् । रुद्रतीर्थ दर्शन गयावर्जनपुण्यम् । चक्रतीर्थ जाणा यात्रागोकर्णम् ॥ २ ॥ मन्मथतीर्थ देखा पर्वतसन्मुखम् । स्नानमात्रे सिद्धि

तंतुक फल अधिकम् । अष्टतीर्थमाहात्म्यं नरहरिकौतुकम् । कल्लेश्वर मल्लिकार्जुन दुर्लभ स्थलमेकम् ॥ ३ ॥ कोटीपुण्य चारित्र ऐकति विस्तारम् । सत्यज्ञान विचारं साधन गुरुवारम् । जगदुद्धारक नरसिंहसरस्वती अवतारम् । रामदास भजे तुज वारंवारम् ॥ ४ ॥

## श्रावणमासांत व शिवरात्रीच्या दिवशीं नामपूजा झाल्यानंतर म्हणण्याची आरती.

दत्त श्रीपाद श्रीवल्लभ नरकेसरी । त्रयमूर्ती अवतारी रे । माधव पत्नी अंबा उदरीं जन्मुनि कारंजनगरीं रे। मूक होऊनि संज्ञा दावुनि मौंजी बंधन झाला रे । तत्त्वज्ञान चतुर्वेद मुखोद्गत उच्चारी रे । मंगल जय मंगल । मंगल यातिवर्या रे मंगल जय मंगल ॥ ध्रु० ॥ माता आज्ञा घेउनि काशी मणिकर्णिका महाक्षेत्रीं रे । वृद्ध कृष्ण सरस्वती मुनिचे उपदेश घेउनी रे । चतुर्थाश्रम अंगिकारुनि बदरीवना चालिला रे । मेरू सव्य करूनि माधव सरस्वती शिष्य केला रे ॥ १ ॥ तेथुनि गोदातीरीं धरुनि बासर ब्रह्मेश्वरी रे । सायंदेवासी अनुग्रह देउनि कुरुंदवाडासि आला रे । भुवनेश्वरीं कृष्णातीरीं योगिनियां वर दिला रे । अमरापूरीं विप्राघरीं वेल तोडुनी दिघलें निधान रे ॥ २ ॥ उत्तर दक्षिणमध्यें काशी भीमामरजासंगम रे । गुप्त गंधर्वनगरी भिक्षा जातो एक्या सद्नीं रे । वांझ महिषी काढुनी क्षीरपान करूनी गेला रे । तेणेंकरुनि प्रसन्न होउनि राजा वंदी चरणा रे ॥ ३ ॥ समस्त ग्राम सहपरिवार येउनि लोटांगणीं रे । स्वामी आला अभय देउनी ग्राम पश्चिमभागीं रे । श्रीगुरुतें देखुनि राक्षस येउनि धरितो चरणा रे । मोक्षपद देउनि येथें मठ करुनी राहिला रे ॥ ४ ॥ प्रातःकाळीं षट्कुळ संगम स्नान अनुष्ठाना रे । माध्यान्हीं तो मठासि येउनि नित्य आराधना रे । कुमसी होता त्रिविक्रम भारति नरसिंह उपासका रे । जाउनि विश्वरूप दावुनि विचित्र खेळलीला रे ॥ ५ ॥ पश्चिमदेश राजा यवन तेथुनि विप्रयुग्म रे । मदोन्मत्त होउनि वेदतर्क करी आम्हांला रे । त्रिविक्रम भार-

तर्सी छळुनि महागुरुपाशीं आला रे । पतितोन्मुखीं वेद म्हणविला ब्राह्मण मोक्ष पावला रे ॥ ६ ॥ प्रेतसंजीवन करुनि स्त्रियेसि अष्टपुत्र वर दिल्हा रे । साठ वर्षें वांझे कन्या पुत्र बहु ख्याती रे । बसवेश्वर नरहरि कवि तो कलिनाथाचा दास रे । श्रीगुरुदया होऊन त्याचे वंश परंपरीं रे ॥ ७ ॥ श्रीगुरुमहिमा वर्णू किती अशक्य तो आम्हांला रे। तंतुकासी श्रीशैल्ययात्रा पांच घटिकांमध्यें रे । तीन अडीच शेर स्वैंपाक करुनि चार सहस्र जेविला रे । ऐसें श्रीगुरुचरित्र स्वामी दासासी पालिपारे ॥ ८ ॥

## ( वरील आरतीचें कानडी भाषांतर ).

दत्त श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी अवतार त्रयमूरुतियो । माधव पत्नी अंबानुदरदि जन्मासि कारंज पुरदलियो । मूक नागि सुचनेय माडुतले व्रतबंधाई तु क्षणदलियो । तत्त्वज्ञानचतुर्वेद मुखदिंदंदनु ईप-रियो । मंगला जय मंगला । मंगल गुरुयतिवर्यगिदो ॥ध्रु०॥ माता-नाज्ञा कोंडव काशी मणिकर्णिक महाक्षेत्रदल्यो । वृद्ध कृष्ण सरस्वति मुनिदिदु उपदेशवुता गृहिसुतल्यो । चातुर्थाश्रम अंगिकारिसी बदरि-वनकता न्होगुतल्यो । मेरू प्रदक्षिण माडी माधव सरस्वतीगुपदेशाइ-तल्यो ॥ १ ॥ आलिंद गोदातीर पिडिदुता बासर ब्रह्मेश्वरदलियो । सायंदेवगे अनुग्रह कोट्टु कुरुंदवाडके बरवुतल्यो । भुवनेश्वर कृष्णा-तीरदि योगिनिरींगे वर कोट्टल्यो । अमरापुरदोळबेळ्ळिकाडिदु धन कोट्टनु विप्रनभनियल्यो ॥ २ ॥ उत्तर दक्षिण नडिविदे काशी भीमामरजासंगमनो । गुप्त गंधर्वापुरदाळि भिक्षक पोदनोंदु मनिवळ-वनो । गोड्याम्मिदु मली हालहिंडिसी पान माडिता पोदवनो । अदरिंखु प्रसन्नवागि चरणके वंदन माडिदनो ॥ ३ ॥ समस्त ग्राम प्रजाबंदवरू हाक्यारू लोटांगणणों । स्वामी वंदुता अभयव कोट्टु ग्राम पश्चिम भागकनो । श्रीगुरुविगे ता राक्षस नोडी पिडितद आतन चरणवनो।अदक मोक्षपदक होंदिसी अल्ले मठ माडी ता निरुवचनो॥४॥

प्रातःकालके षट्कुळ संगम स्नान अनुष्ठानवनो । माध्यान्हक्के ता मठक्क बरुतले नडिवदु नित्याराधननो । कूर्मसियह्लिरुवो त्रिविक्रम भारती नरसिंहन उपासकनो । विश्वरूप तंदवगे तोरिसि विचित्रदाटवू लीलानो ।। ५ ।। पश्चिम देशद अविंद राजा अल्लिदुविप्ररुइब्बरो । मदोन्मत्ताघोंटु बरुतले वेदतर्क माडॆवुवरो । त्रिविक्रम भारतीगे छाळिसी महागुरु बळिगे बंदिहरो । पतितोन्मुखादिंद्वेदनिसुतले अवरु मोक्ष पदकहोंदिदरो ।।६ ।। प्रेतसंजीवन माडी स्त्रियळिगे अष्टपुत्र वर दानवनो । अरवत्तेर्षिन बंजिगे कन्या पुत्र ख्यातिवान कोट्टवनो । बसवेश्वरई नरहरीकवियु कल्लिनाथन दासरनो । श्रीगुरु दयावाघोयितु अवरिगे वंश परंपरदल्लिनों ।। ७ ।। श्रीगुरु महिमिदु वर्णिसलेष्टु । अशक्य इरवदू ननगिदनो । तंतुकग श्रीशैल्यदयात्रा ऐदु घळिगियो मुगिसिदनो । मूरु अडीशेर दडगिय माडी नाल्कु सहस्रजनकुणिसिदनो । इंथा सद्गुरु स्वामी चरित्रिदु बाबारामगे प्रेमिदनो ।। ८ ।।

## पादुकेचे पूजेचे वेळीं म्हणण्याची आरती.

श्रीमत्सद्गुरुपरमहंस यति समर्थ नरसिंहसरस्वातियो । नेमिसि तव ता मोदले चंदू क्षेत्र गाणगापुरदालियो । प्रेमभावदिंद बरुव दासरिगे कामपुरिसुव ईधोरियो ।। चाल ।। नामतंत्रदू नेनिसुवरिगे तन्निजसुख कोडुवनु हर्षदियो । मंगल जय मंगल मंगलदारति गुरुविगिदो शुभ मंगलदारति देवगिदो ।। ध्रु० ।। दिव्य पादुका सुवर्णमयदवु चरणकमलदालि तोरुववो । देवासुररु गण गंधर्वरु पूजिसुवंथा पादुकिओ । सोविसुवरु त्रैमूर्तिगळादरु सद्गुरुविन निजपादुकिवों ।। चाल ।। भवमोचन किदे दर्शनागुवदु पादुकने इवु तारकवो ।। २ ।। वेष यंथदु स्वामिदु नोडिदू चतुर्थाश्रम कोप्पवनो । काषायांबरभूषितनागी दंडोकमंडलु धरिसुवनो । भस्मोद्धूलित सर्वांगदालि शोभिसुभंथा देविवनो ।। चाल ।। भूषणेल्ल रुद्राक्षनि इडुवनु योगिराज महापुरुषिवनो ।।३ ।।

श्यामवर्ण अति सुंदर मृदुतनु पूर्णचंद्रन्हांगमुखकळेनो । कमलाकर प्रभु कमलनयन गुरु नासिक संपिगिरिददनो । सुमदन सरगळु जाजि माल्लिगिवु कोरळोळगोप्पुव बहुपरिनो ॥ चाल ॥ नेमिनित्यदलि ईपरि ध्यानिसी मनदलि पूजिसु बेकिदनो ॥४॥ केशरिगंधवु हणिमेल्हचि कस्तूरि मेल तिलकवनो । कुसुम शेवंतिगि तुलसि बिल्वदळ । येरि सुवरु गुरु स्वामिरगिदो । घोषागुवदू वेदमंत्रदिदु आरति आद आनंतरनो ॥ चाल ॥ ईसजगद्गुरु बाबा रामगरक्षिसवनु बहुपरि ईवनो ॥५॥

## नित्यप्रदक्षिणेचें अष्टक.

इंदुकोटितेजकिरणसिंधुभक्तवत्सलम् । नंदनात्रिसूनुदत्तमिंदिराक्ष-श्रीगुरुम् । गंधमाल्य अक्षतादि वृंददेववंदितम् । वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि मां ॥ धृ० ॥ मायमाशअंधकारछायादूर भास्करम् । आयताक्ष पाहि श्रीय वल्लभेशनायकं । सेव्यभक्त-वृंदवरद भूयो भूयो नमाम्यहम् ॥ १ ॥ चित्तजादिवर्मषट्कमत्त-वारणांकुशम् । तत्त्वसारशोभितात्मदत्तश्रीयतिवल्लभम् । उत्तमावतार-भूतकर्तृभक्तवत्सलम् ॥ २ ॥ व्योमआपवायुतेजभूमिकर्तृमीश्वरम् । कामक्रोधमोहरहितसोमसूर्यलोचनम् । कामितार्थदातृभक्तकामधेनु श्रीगुरुम् ॥ ३ ॥ पुंडरीकआयताक्षकुंडलेंदुतेजसम् । चंडदुरि-तखंडनार्थदंडधारि श्रीगुरुम् ॥ मंडलीकमौलिमार्तंडभासिता-ननम् ॥ ४ ॥ वेदशास्त्रस्तुत्यपाद आदिमूर्तिश्रीगुरुम् । नादबिंदुकला-तीत कल्पपादसेव्ययम् । सेव्यभक्तवृंदवरद भूयोभूयो नमाम्यहम् ॥५॥ अष्टयोगतत्त्वनिष्ठतुष्टज्ञानवारिधिं । कृष्णावेणीतीरवासपंचनदीसंगमम् । कष्टदैन्यदूरभक्ततुष्टकाम्यदायकम् ॥ ६ ॥ नारसिंहसरस्वतीशनाममष्ट-मौक्तिकम् ॥ हारकृत्यशारदेन गंगाधराख्यस्वात्मजम् ॥ धारु-णीकदेवदीक्षगुरुमूर्तितोषितम् । परमात्मानंदं श्रीयापुत्रपौत्रदायकम् ॥ ७ ॥ नारसिंहसरस्वतीशअष्टकं च यः पठेत् । घोरसंसारसिंधुता-रणाख्यसाधनम् । सारज्ञानदीर्घ आयुरारोग्यादिसंपदम् । चारुवर्गका-म्यलाभ वारंवारं यः पठेत् ॥ ८ ॥

## विघ्नहर चिंतामणीची आरती.

सुखकरिता दु:खहरिता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति । दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचितहारा तुज गौरीकुमरा । चंदनाची ऊटी कुंकुमकेशरा । हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणतीं नूपुरें चरणीं घागरिया ॥१॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदना ॥ संकष्टीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ २ ॥

## कापुराची आरती.

देहत्रय करुनि शुद्ध सत्वाचा रवा । शुद्ध सत्वाचा रवा । ज्ञानज्योति उजळोनियां साक्षीत्व ठेवा ॥ ध्रु० ॥ कापुराची आरती देवाधिदेवा । उजळो देवाधिदेवा । सुप्रभेनें प्रभातीत स्वानंद ठेवा ॥१॥ उष्मा न काजळ विरहीत कळा । सोज्वळ तेज:पुंज एकत्र गोळा ॥२॥ दिनानिशीं तेथें हरपलें ध्यान । चंद्रादित्यमंडळ लोपलें त्याणें ॥३॥ प्रगट गुप्त गुह्य गुह्यांत गुह्य । गुरुकृपा अंजन घालोनि पाहे ॥ ४ ॥ भीमाशंकर करी आरती यती । कापूर आरती यती । प्रत्यगात्मा परमात्मा एकत्र होती ॥ ५ ॥

## ॥ उत्तरारती ॥

ओवाळूं आरती सद्‌गुरुनाथा । माझ्या श्रीगुरुनाथा । सद्भावानंदें चरणीं ठेवीन माथा ॥ ध्रु० ॥ सद्‌गुण ही आरती निर्गुणीं ओवाळूं । कल्पनेचा धूप घालुनि दीप पाजळूं ॥ १ ॥ अव्यक्ताचा मूळपुरुष ओवाळुनि सांडूं । आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि कुरवंडूं ॥ २ ॥ सद्‌गुरूचें पूजन केलें षोडशोपचारें । रामानंद जीवन्मुक्त झाला संसारीं ॥ ३ ॥ ओवाळूं० ॥

## करुणात्रिपदी.

### पद १ लें ( चाल—उद्धवा शांतवन कर जा० ).

शांत हो श्रीगुरुदत्ता । मम चित्ता शमवी आतां ॥ ध्रु० ॥ तूं केवळ माताजनिता । सर्वथा तूं हितकर्ता । तूं आप्त स्वजनभ्राता । सर्वथा तूंची त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तूं भयहर्ता । दंडधर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आर्ता आश्रय दत्ता ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा । जरि दंडा धरिसी यथार्था । तरि आम्हीं गाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥ चाल ॥ तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करुं धावा । सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता ॥ २ ॥ तूं नटसा होउनि कोपी। दंडिताहि आम्ही पापी । पुनरपिही चुकत तथापि आम्हांवरि नच संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनि नच हो कोपी । निज कृपा लेशा ओपी । आम्हांवरि तूं भगवंता ॥ ३ ॥ तव पदरीं असतां ताता । आडमार्गीं पाउल पडतां । सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ॥ चाल ॥ निजबिरुपदा आणुनि चित्ता । तूं पतितपावन दत्ता । वळे आतां आम्हांवरतां । करुणाघन तूं गुरुनाथा ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हें घरदार । तव पदीं अर्पुं असार । संसारा हित हा भार ॥ चाल ॥ परिहरिसी करुणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो । वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ ५ ॥

### पद २ रें ( चाल—इस तन धन की कोन ).

श्रीगुरुदत्ता जय भगवंता । तें मन निष्ठुर न करी आतां ॥ध्रु०॥ चोरे द्विजासी मारितां मन जें । कळवळलें तें कळवळो आतां ॥श्री०॥ ॥ १ ॥ पोटशूळानें द्विज तडफडतां । कळवळलें तें कळवळो आतां॥ श्री० ॥ २ ॥ द्विजसुत मरतां वळलें तें मन । हो किं उदासिन न वळे

## विघ्नहर चिंतामणीची आरती.

सुखकरिता दुःखहरिता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति । दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचितहारा तुज गौरीकुमरा । चंदनाची ऊटी कुंकुमकेशरा । हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणतीं नूपुरें चरणीं घागरिया ॥१॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदना ॥ संकष्टीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ २ ॥

## कापुराची आरती.

देहत्रय करुनि शुद्ध सत्वाचा रवा । शुद्ध सत्वाचा रवा । ज्ञानज्योति उजळोनियां साक्षीत्व ठेवा ॥ ध्रु० ॥ कापुराची आरती देवाधिदेवा । उजळो देवाधिदेवा । सुप्रभेनें प्रभातीत स्वानंद ठेवा ॥१॥ उष्मा न काजळ विरहीत कळा । सोज्वळ तेजःपुंज एकत्र गोळा ॥२॥ दिनानिशीं तेथें हरपलें ध्यान । चंद्रादित्यमंडळ लोपलें त्याणें ॥३॥ प्रगट गुप्त गुह्य गुह्यांत गुह्य । गुरुकृपा अंजन घालोनि पाहे ॥ ४ ॥ भीमाशंकर करी आरती यती । कापूर आरती यती । प्रत्यगात्मा परमात्मा एकत्र होती ॥ ५ ॥

## ॥ उत्तरारती ॥

ओवाळूं आरती सद्गुरुनाथा । माझ्या श्रीगुरुनाथा । सद्भावानंदें चरणीं ठेवीन माथा ॥ ध्रु० ॥ सद्गुण ही आरती निर्गुणीं ओवाळूं । कल्पनेचा धूप घालुनि दीप पाजळूं ॥ १ ॥ अव्यक्ताचा मूळपुरुष ओवाळुनि सांडूं । आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि कुरवंडूं ॥ २ ॥ सद्गुरूचें पूजन केलें षोडशोपचारें । रामानंद जीवन्मुक्त झाला संसारीं ॥ ३ ॥ ओवाळूं० ॥

## करुणात्रिपदी.

### पद १ लें ( चाल—उद्धवा शांतवन कर जा० ).

शांत हो श्रीगुरुदत्ता । मम चित्ता शमवी आतां ॥ ध्रु० ॥ तूं केवळ माताजनिता । सर्वथा तूं हितकर्ता । तूं आप्त स्वजनभ्राता । सर्वथा तूंची त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तूं भयहर्ता । दंडधर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आर्ता आश्रय दत्ता ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा । जरि दंडा धरिसी यथार्था । तरि आम्हीं गाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥ चाल ॥ तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करुं धावा । सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता ॥ २ ॥ तूं नटसा होउनि कोपी। दंडिताहि आम्ही पापी । पुनरपिही चुकत तथापि आम्हांवरि नच संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनि नच हो कोपी । निज कृपा लेशा ओपी । आम्हांवरि तूं भगवंता ॥ ३ ॥ तव पदरीं असतां ताता । आडमार्गीं पाउल पडतां । सांभाळुनि मार्गावरता । आणितां न दुजा त्राता ॥ चाल ॥ निजबिरुपदा आणुनि चित्ता । तूं पतितपावन दत्ता । वळे आतां आम्हांवरतां । करुणाघन तूं गुरुनाथा ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हें घरदार । तव पदीं अर्पुं असार । संसारा हित हा भार ॥ चाल ॥ परिहरिसी करुणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो । वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ ५ ॥

### पद २ रें ( चाल—इस तन धन की कोन ).

श्रीगुरुदत्ता जय भगवंता । तें मन निष्ठुर न करी आतां ॥ध्रु०॥ चोरें द्विजासी मारितां मन जें । कळवळलें तें कळवळो आतां ॥श्री०॥ ॥ १ ॥ पोटशूळानें द्विज तडफडतां । कळवळलें तें कळवळो आतां॥ श्री० ॥ २ ॥ द्विजसुत मरतां वळलें तें मन । हो किं उदासिन न वळे

आतां ॥ श्री० ॥ ३ ॥ सतीपति मरतां काकुळती येतां । वळलें तें मन न वळलें कीं आतां ॥ श्री० ॥ ४ ॥ श्रीगुरुदत्ता त्याजि निष्ठुरता । कोमल चित्ता वळवी आतां ॥ श्री० ॥ ५ ॥

## पद ३ रें ( चाल—इस तन धन की कोन ).

जय करुणाघन निजजनजीवन । अनुसूयानंदन पाहि जनार्दन ॥ जय० ॥ ध्रु० ॥ निज अपराधें उफराटी दृष्टी । होउनि पोटीं भय धरुं पावन ॥ जय० ॥ १ ॥ तूं करुणाकर कधिं आम्हांवर । रुससि न किंकरवरद कृपाघन ॥ जय० ॥ २ ॥ वारीं अपराध तूं मायबाप । तव मनिं कोप लेश न वामन ॥ जय० ॥ ३ ॥ बालकापराधां गणे जरि माता । तरी कोण त्राता देईल जीवन ॥ जय० ॥ ४ ॥ प्रार्थी वासुदेव पदिं ठेवीं भाव । पदिं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥ ५ ॥

## पद ४.

सांगावें कवण्या ठाया जावें । कवणातें स्मरावें । कैसें काय करावें । कवण्या परि मी राहावें । कवण घेऊनि गाणग्रामीं स्वामी तें मिळवावें ॥ सां० ॥ ध्रु ॥ या हारी जेवावें व्यवहारीं बोलावें संसारीं । घालुनि अंगिकार प्रतिपाळिसि जो निर्धारी, केला जो निज निश्चय स्वामी कोठें तो अवधारीं । या रानीं । माझी करुणावाणी । काया कष्टी प्राणी ऐकुनि घेशिल कानीं । देशिल सौख्यानिधानी । संकट होउनि मूर्च्छित असतां । पाजिल कवण पाणी । त्या वेळां । सत्पुरुषांचा मेळा । पहातसे निज डोळा लाविसी भस्म कपाळा । सांडी भय तूं बाळा । श्रीपाद श्रीवल्लभ म्हणती अभय तुज गोपाळा सांगावें० ॥

## विडा.

विडा घ्या हो नरहरिराया । धरुनी मानवाची काया । यतिवेष घेउनिया । वससी दीनासी ताराया ॥ वि० ॥ १ ॥ ज्ञान हें

पूगीफळ । भक्ती नागवेलीदळ । वैराग्य चूर्ण विमळ । लवंग सत्क्रिया सकळ ॥ वि० ॥ २ ॥ प्रेमरंगीं जैसा कात । वेळा अष्ट-भावसहित । जायफळ क्रोधरहित । पत्री सर्वभूतहित ॥ वि० ॥ ॥ ३ ॥ खोबरें हेंचि क्षेम । फोडूनि द्वैताचे बदाम । मनोजय वर्खहेम । कापूरही शांतिनाम ॥ वि० ॥ ४ ॥ कस्तुरी निरहंकार ॥ कोठें न मिळती उपचार । भीमापुत्र यास्तव फार । सत्वर देऊनि वारंवार ॥ वि० ॥ ५ ॥

## शेजारती

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता । नरसिंह सरस्वती अव-धूता । चिन्मया सुखधामीं जाऊनि पहुडा एकांता ॥ १ ॥ वैरा-ग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला । स्वामि चौक झाडीला । तया-वरी सप्रेमाचा शिडकावा केला ॥ २ ॥ पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति । सुंदर नवविधा भक्ति । ज्ञानाच्या समया लावुनी उजाळिल्या ज्योती ॥ ३ ॥ भावार्थाचा मंचक हृदयाकाशीं टांगिला । हृदयाकाशीं टांगिला । मनाचीं सुमनें जोडुनी केलें शेजेला ॥ ४ ॥ द्वैताचें कपाट लोटुनि एकत्र केलें । गुरु हें एकत्र केलें । दुर्बुद्धीच्या गांठी सोडुन पडदे सोडिले ॥ ५ ॥ आशा-तृष्णा-कल्पनेचा सांडुनि गलबला । गुरु हा सांडुनि गलबला । दया-क्षमा-शांति दासी उभ्या शेजेला ॥ ६ ॥ अलक्ष उन्मनि घेउन नाजुक हा शेला । गुरु हा नाजुक हा शेला । निरंजनीं सद्गुरुस्वामी निजे शेजेला ॥ ७ ॥

## ॥ विज्ञापना ॥

आतां गुरुराया परिसा विज्ञापना । दासाची करुणा येवूं द्यावी ॥ १ ॥ नेणोनियां सोय फिरलों दिशा दाही ॥ झालों दुःख देहीं बहु काळ ॥ २ ॥ तुमची ब्रीदावळी पतीतपावन । कीर्ति ही ऐकूनि शरण आलों ॥ ३ ॥ माझा मायबाप गणगोत बंधु । तूंचि कृपा-सिंधु दत्तराया ॥ ४ ॥ आतां कांहीं नेणें तुमच्या पायाविणें । संसा-

राचें भेणें दुरी करा ॥ ५ ॥ जोडोनिया हातशीर पायांवरी । ठेविलें निर्धारीं जनार्दना ॥ ६ ॥ तुज मी अनंता काय सांगूं आतां ॥ माझी सर्व चिंता असूं द्यावी ॥ ७ ॥ नेणें भक्ति ज्ञान कर्म उपासना । तुज मी नारायणा ध्यात आहे ॥ ८ ॥ पतित मी पापी दुर्गुणी आगळा । परी आलों गोपाळा शरण तुज ॥ ९ ॥ पतित तारिले पशु उद्धरीले । पक्षी तेहि नेले मोक्षालागीं ॥ १० ॥ सिद्धेश्वर म्हणे ऐशी तुझी ख्याति । माधवा श्रीपति तारी आतां ॥ ११ ॥

## करुणाष्टक.

मातेच्या उदरांत मास नव हे राहें तधीं अग्निनें । उष्मा होउनि जंतु दंशिति तया स्थानांत दुर्गंधिनें । मातेच्या विविधान्नभक्षणरसें केलें बहू घाबरें । दत्तात्रया फार दुःख मजला झालें अतां पाव रे ॥ १ ॥ येतां बाहेर सौख्यदुःख न कळे बोलावया येइना । देती औषध जें तयासि रुचलें तें नेणत्या भावना । किरकिर करिति म्हणुनि मारिति करें येवोनिया कां वरें ॥ दत्ता० ॥ २ ॥ किंचित् ज्ञान आलें तधीं मज बहू खेळावयाची सवें । खोड्याही करणें परासि पिडणें हें आवडें आठवें । होती लोक समस्त तात जननी कोपें जसें दाव रे ॥ दत्ता० ॥ ३ ॥ आलें यौवन तो मदांध बनलों विद्याधनाच्या बळें । योषितलंपट होउनी पितृगुरुज्ञातेहि धिक्कारिले । होय स्त्री अवलोकितांचि मदनें माच्चित्त हें बावरे ॥द० ॥ ॥ ४ ॥ रोगें ग्रासियले उपाय न चले या औषधानें कधीं । प्रातः-स्नानहि ब्रह्मकर्म न घडे शक्ती नसे विग्रहीं । चिंता श्वासभरें निरंतर मुखीं येईना तुझें नांव रे ॥ दत्ता० ॥ ५ ॥ वृद्धत्वें पुत्रकन्या दिलिस गुरुवरा वांझ नारीस देवा । वृद्धा तैशीच वंध्या महिषि दुभविली देउनी द्रव्यठेवा । छेदूनी घेवडवेल विप्र बहु संतोषवीला बरें ॥ दत्ता० ॥६॥ करुणाघन म्हणूनि वानिति तुला वेदांतशास्त्रज्ञही । भक्ताभीष्ट सदाहि दुःख हरिसी दुष्टांतका प्रत्यहीं । भृत्या किंचित

दुःखि पाहुनि त्वरें घेसी सख्या धाव रे ।। द० ।। ७ ।। भीमात्मज-तनयासि संसृतिभयें दुःखें बहू ग्रासिलें । हें दवडा अथवा मनीं जरि असे हें पाहिजे भोगिलें । भोगाया मनिं धैर्य देउनि पदीं देई तुझा ठाव रे ।। दत्ता० ।। ८ ।।

## शेजारती.

नरसिंहसरस्वती । मनीं धरुनिया प्रीती । ओवाळीतों शेजारती । अंगीकारा यतीपती ।। नर ।। ध्रु० ।। ब्रह्मा येउनि देवदेवा । म्हणे कोणा कवण्या जीवा । उपजवूं कोठें केव्हां । संदेश हा मज व्हावा ।। नर० ।। १ ।। विष्णूही येऊनिया । आज्ञा मागे वंदोनीया । कवण्या जीव काय खाया । कैसें देऊं कवण्या ठाया । नर० ।। २ ।। नेऊनिया महादेवा । वंदोनीया पादद्वंदा । ज्ञान देऊं कवण्या जीवा । आज्ञा करा स्वयमेवा ।। नर० ।। ३ ।। अंबा म्हणे बाळा यती । फार झाली असे रात्री । झोंप लागो तुजप्रती । भक्त रक्षूनि श्रम होती ।। नर ।। ४ ।। विनवितातीं भक्तवृंद । सेवा घेऊनिया छंद । पूर्ण देईन ब्रह्मानंद । भीमापुत्रनंदकंद नर० ।। ५ ।।

## प्रसाद.

पावला प्रसाद आतां उठा निजावें । स्वामी सुखें पहुडावें । आपुल्याला श्रम होती बहुत स्वभावें ।। ध्रु० ।। आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा स्वामी दत्ता दयाळा । पुरले मनोरथ जातों आपुल्या स्थळा ।। १ ।। तुम्हांसि आम्हीं जागविलें आपुल्या चाडा । दत्ता आपुल्या काजा । शुभाशुभकर्म दोष हरवाया पीडा ।। २ ।। तुका म्हणे दिधलें उच्छिष्टाचें भोजन । स्वानंदाचें भोजन । नाहीं निवडिलें आम्हां आपुल्या भिन्न ।। ३ ।।

अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज सद्गुरुराज स्वामीमहाराजकी जय.

## अपराधक्षमा.

अपराध क्षमा आतां केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ॥ अबद्ध सुबद्ध गुण वर्णियले तूझे ॥ ध्रु० ॥ न कळेची टाळवीणा वाजला कैसा । गुरु हा वाजला कैसा । अस्ताव्यस्त पडे नाद झाला भलतैसा ॥ १ ॥ नाहीं ताल ज्ञान नाहीं कंठ सुस्वर । गुरु हा कंठ सुस्वर । झाला नाहीं बरा वाचे वर्ण–उच्चार ॥ २ ॥ निरंजन म्हणे देवा वेडेवांकुडे । गुण हे वेडेवांकुडे । गुणदोष न लावावा सेवकाकडे ॥ ३ ॥

## श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराजकी जय.

ज्या ज्या स्थळीं हें मन जाय माझें । त्या त्या स्थळीं हें निज-रूप तूझें । मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणीं । तेथें तुझें सद्गुरु पाय दोन्हीं ॥ १ ॥

भीमाअमरजासंगमनिवासी राजाधिराज स्वामी महाराजकी जय ॥

## सिद्धांत अवधूत चिंतनः श्रीगुरुदेवदत्तः—
## गुरुवारीं पालखीपुढें म्हणण्याचीं सांप्रदायिक पदें.

जय जय गुरुमूर्ते गुणकीर्ते । श्रीनरसिंहसरस्वती । हरी हा श्री ॥ ध्रु० ॥ भक्तवित्तविशाला दाखवी चिन्मयरूप विशाला ॥ १ ॥ निजपद देशी तयाला स्वर्गच्युतपद होय कशाला ॥ २ ॥ रामात्मज प्रतिपाला देउनि इहपर सौख्य कृपाला ॥ ३ ॥

### पद २ रें.

हरगुरु गुरुनर नेंबा पातक नरकालय पडकोंबा । हरहर पशु-प्राणी पशुप्राणी । माडिदि नरतनु हानी ॥ ध्रु० ॥ हानी अरियदे ज्ञानी तिरगुवे नाना परिपरि योनी ॥ १ ॥ परिपरि योनिगे बरुवा गुरुगळु परिपालय माडदिरुवा ॥ २ ॥ इरुबंथवु निजवेनो इरळंत्यरुळं तपघातवनो ॥ ३ अपघातक मन दवगे सद्गुरु कृपयंदागुव दंवगे ॥ ४ ॥

## पद ३ रें.

शुद्ध मनुळ्ळवनागि । पूगी सागी निंतले बागी । हरिकथा किंवा लिंदा । केळलो परमानंदा ॥ ध्रु० ॥ कर्णगळेल्लवुतंदु । श्रवणादि स्थिर माडुव बेकेंदु ॥ १ ॥ शंकर सकल सुनामा केवल । पंचजनक विश्रामा ॥ २ ॥

## पद ४ थें.

तो हा यति नरसिंहसरस्वती रे नाहीं भक्ति करितां देई मुक्ति रे । सहजस्थिति वर्णितां कवणा शक्ति रे पाहतां न कळे ब्रह्मांडिं आदिअंतीं रे । तो हा ॥ ध्रु० ॥ लीला करुनी दाविलें रूप सगुणी रे । मायारजनी निरसिले तत्क्षणीं रे । काय सांगूं गुरुराज अंतः-करणीं रे । तो हा ॥ १ ॥ रजकालागीं दिधलें सिंहासन रे । गंगानुज राखिला वृत्तिस्थाना रे । गया काशी दाविली ऐक्या दीना रे । भाग्य त्याला लाधला नीजधन रे । तो हा० ॥ २ ॥ पत्रशाखा जेविला विप्रसदनीं रे । वेला तोडुनि टाकिल्या त्याच्या भुवना रे । चिंता करिती लेकरूं बाई तान्हा रे । काढी मूळ लाधला निजधन रे । तो हा० ॥ ३ ॥ विणकरेशीं दाविले मल्लिकार्जुन शूद्रशेत कापिलें बहु धान्या रे । पांच शेर जेविले सहस्रचारी रे । वेद वेदवी पतीता-भिमंत्रोनि । तो हा० ॥ ४ ॥ साठ वर्षें वांझेला पुत्रकन्या रे । नंदिनाम सर्वांगीं कुष्ठवर्णा रे । गेला त्याचा पाहतां तुझें चरणा रे । दासावरि गुरुराज पूर्ण कृपा रे । तो हा० ॥ ५ ॥

## पद ५ वें.

धन्य दिवसु आजि वर्णुं काय हे गुरुराज पाहे । देखिल्यानें सुख न समाय हें ब्रह्मांडिं पाहें ॥ ध्रु० ॥ आळशावरी वाहे सेवि गंगा करि तापभंगा । देखिल्यानें उद्धरित जगा दर्शन दे गा ॥ १ ॥ सकळ मंगळ आजि झालें व्रतपर्व घडलें । सकळतीर्थस्नान आजि केलें

पातक गेलें ॥ २ ॥ पूर्ण शिवराम धन्य जाहला हो गोड बोला । पूर्वपुण्यसंचित फळासि आला सत्संग घडला ॥ ३ ॥

### पद ६ वें.

सद्गुरुविगे ना येनु माडि उद्धरागुवे । नानु उद्धरागुवे । देहातीतनागि चरण कमलक यरगुवे ॥ ध्रु० ॥ तारकमंत्र उपदेश कर्णदोळिट्टा (आहा) कर्णादोळिट्टा । मायामोह बेडीकिडदू भ्रांतिय सुट्टा ॥ १ ॥ नेत्तिमेल करवा निट्टु निजवागीरंदा । (आहा०) अंतरंग तोरिसि कोट्ट भवभय बिडासिट्टा ॥ २ ॥ सद्गुरुनाथा भृंगोळिवासा आतन दयदिंद । (आहा०) सगुणरूप नागि इरुवा सहजानंद ॥ ३ ॥

### पद ७ वें.

करि मजवरी गुरुराजदयाळे राजदयाळे पूर्णकृपाळे ॥ ध्रु० ॥ कृष्णा कुरुपुर हें स्थळ पाहुनि । औदुंबरवटीं श्रीगुरु यति रे ॥ १॥ श्रीनरसिंहसरस्वति यतिवर । गाणगापूरपीठाधिपं तूं रे ॥२॥ रक्षुनि श्रीचरणीं रामात्मज श्रवणमननानिजध्यासक तूं रे ॥ ३ ॥

### पद ८ वें.

सावधनागि माडलो गुरुभक्ति । काव करणोळू तोरु निजध्याना । गुरुविणचरणव पूजीसो निशिदिना । गुरुविन नमनदि हाकि मुक्ति ॥ ध्रु० ॥ गुरुनामस्मरणीं अनुदीना । गुरुमूर्ति माडो निजलोटांगणा ॥ १ ॥ गुरुभक्तर संगवन्नु माडी । गुरुकरुणाद महिमेनुपाडी गुरुवाक्यप्रसादवन्नु बेडी । गुरु अभयव कंड्ड नळि दाडी ॥ २ ॥ गुरुविनळी हिडियदेनरभाव गुरुविगे अर्पिसो तनमन धनजीवा गुरुविनदयदिंदिलो भवबंधवा । गुरुमहिपति बालनागीरुवा ॥ ३ ॥

### पद ९ वें.

शांभविनिन्न पादारविंददिंद । कांभाविकरुणेंदु व्यापक ताई तंदे ॥ ध्रु० ॥ अष्टदळदकमलमध्यदळि । स्पष्टतोरुव यरडु दळदाळि ।

मुट्टि नोडुवरु महात्मरु आह्लि । बट्ट बैलागि हादि वेळगाह्लि ॥ १ ॥ भृगुटि दार्चीले हत्तंगुलस्थान । भृगुटाश्रीआटा गोलाटकारणा । भृगुट औटपिटादिंध्याना । प्रगटवागोळू अमरगुंफस्थाना ॥ २ ॥ येकाकारी ब्रह्मांडापिंडमीरी । ओंकारनादविंदूकलाधारी । लोकोद्धारकशाक्तिअवतारी शाखांबरी शंकरगेसहकारी ॥ ३ ॥

२

धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ० ॥ पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी । सर्वही तीर्थें घडलीं आम्हां आदि करुनि काशी ॥१॥ कोटीब्रह्महत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायातें ॥ २ ॥ मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थें गाती । नामसंकीर्तन नित्यानंदें नाचती ॥ ३ ॥ गुरुभजनाचा महिमा अगम्य निगमागमासी । अनुभव जे जाणती सद्गुरुपदचें अभिलाषी ॥ ४ ॥ प्रदक्षिणा करुनि देह भावें वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥

## पद ११ वें.

श्रीपादश्रीवल्लभनरहरि तारि तारि मजला । दयाळा तारि तारि मजला । श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥ ध्रु० ॥ करितां आटाटी प्रपंच अवघा दिसतो मिथ्यत्व । दयाळा दिसतो मिथ्यत्व । म्हणवूनि मजला तूं मज देवा भासे सत्यत्व ॥ १ ॥ किंचित मात्र कृपा करि मजवरि करिसि उदार मन । कृपाळा करिसी उदार मन । चुकलों मीं या विषयसुखाच्या आरांतुनि जाण ॥ २ ॥ कृष्णातटनिकटीं जो विलसे औदुंबरछायीं । दयाळा कल्पतरुछायीं । हंस परात्पर भारतिनायक लीन तुझे पायीं ॥३॥

## पद १२ वें.

तीन शिरें सहा हात तया माझा दंडवत । कांखे झोळी पुढें श्वान नित्य जान्हवीचें स्नान ॥ १ ॥ दंडकमंडलु हातीं पायीं खडावा

गर्जती ॥ २ ॥ माथां शोभे जटाभार अंगीं विभूति सुंदर ॥ ३ ॥ तुका म्हणे दिगंबर तया माझा नमस्कार ॥ ४ ॥

## आरती.

त्रिगुणात्मक त्रैमूर्ति.

## आरती.

अत्रि अनुसूयानल्यवतारव कोंडु.

## प्रार्थना.

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें । प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन भावें ओंवाळीन म्हणे नामा ॥ १ ॥ त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पये तत् ॥ ३ ॥ लोकाभिरामं रणरंगधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम् । कारुण्यरूपं करुणाकरंतम् श्रीरामचंद्रम् शरणं प्रपद्ये ॥ ४ ॥ अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं भजे । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ५ ॥ हरिनारायण दुरितनिवारण परमानंद सदाशिव शंकर । भक्तजनप्रिय पंकजलोचन नारायण तव दासोऽहम् ॥ ६ ॥ नमो गुरुभ्यो गुरुपादुकाभ्यो नमः परेभ्यः परपादुकाभ्यः।आचार्यसिद्धेश्वरपादुकाभ्यो नमोस्तु लक्ष्मीपतिपादुकाभ्यः ॥७॥ आनंदमानंदकरप्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपम् । योगींद्रमीड्यं भवरोगवैद्यं श्रीमद्गुरुं नित्यमहन्नमामि ॥ ८ ॥ दत्तदत्त जय दत्तदत्त जय ॥

श्रीगुरुदेवदत्त.

॥ श्रीदत्तानंदनाथाय नमः ॥

# पदें.

## ( भजन )

॥ श्रीगजानन जय गजानन । जय जय गजानन मोरया ॥

### पद १ लें

गुरुमहाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरु ॥ ध्रु० ॥ तूं गुरु-माउलि समर्थ माझे मी तुज लेकरूं ॥ मी जडमूढ अपराधि म्हणूनि॥ नको वाइलें करूं ॥१॥ तूं गुरुनाथा तारि अनाथा दाता कल्पतरू॥ असतां संशय कां भवसागर न तरूं किंवा तरूं ॥ २ ॥ पतीत पावन परम कृपाघन कशासि मी घाबरूं॥ तव गुण लिहितो म्हणुनी इक्षुपेक्षां सुंदरबरू ॥ ३ ॥ जिव जावो वा राहु परंतु नांव तुझें दृढ धरूं ॥ विष्णुदास म्हणे स्वयं उद्धरूनि आणिकातें उद्धरूं ॥ ४ ॥

### श्रीगणपतीचें पद २ रें.

गजवदना सखा म्यां नमिला हो ॥ ध्रु० ॥ प्रथमारंभीं मूळारंभीं नाचत रंगणीं आला हो ॥ १ ॥ शेष फणीवर मेरू वाहे । वाल्मिकी कीर्तनीं आणिला हो ॥ २ ॥ तुका म्हणे ध्यातो त्याला । वाल्मिक संदेह फिटला हो ॥ ३ ॥

### श्रीविघ्नहरि चिंतामणीचें पद ३ रें.

राग पूरिया—ताल त्रिवट.

ॐनमोजी विघ्नहरा । गजवदना चिंतामणीसुखकरा ॥ ध्रु० ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि । दत्तराज ये गाणगापुरी । स्थापुनि तुजला प्रथम मंदिरीं । अखंड वसति दत्तगुरु करी ॥ १ ॥ श्रीगुरुनीं तुज आत्मरूपचीं । स्थान करूनि आज्ञा साची । केली प्रथम तुझे दर्शनंची । कृपा करावी वरद करांची ॥ २ ॥ श्रीपति नरहरी दत्तगुरुपदा । अखंड मिळबुनि मज दे वरदा । दत्तगुरुचि तूं इहपर सुखदा । गुरुपद सेवा नाम मुखीं सदा ॥ ३ ॥

## पद ४ थें.

शंख चक्र गदाधर ब्रह्मरूप दत्तगुरु । दत्तगुरु दत्तगुरु दत्तात्रेयगुरु ॥ ध्रु० ॥ पतितपावन दिनानाथ ब्रह्मरूप दत्तगुरु ॥ १ ॥ आदिनाथ दिनानाथ ब्रह्मरूप दत्तगुरु ॥ २ ॥ दिगंबर जटाधार ब्रह्मरूप दत्तगुरु ॥३॥ निर्गुणरूप ब्रह्मरूप सगुणरूप दत्तरूप ॥ ४॥ निरंजन निर्विकल्प ब्रह्म० ॥ ५ ॥ उमापते रमापते ब्रह्म० ॥ ६ ॥ एकाजनार्दनीं स्मरण ब्रह्म० ॥ ७ ॥

( भजन )

**दत्तराज गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥**

## पद ५ वें.

धन्य धन्य गाणगापूर । सर्वा ठायीं यतिवर ॥ ध्रु० ॥ धन्य धन्य तो हा मठ । काय करावें वैकुंठ ॥ १ ॥ धन्य धन्य तो गाभारा । गुरुमाईचा देव्हारा ॥ २ ॥ धन्य धन्य तो झुरका । न्याहाळावें गुरुमुखा ॥३॥ धन्य धन्य चिंतामणी । सकळ विद्येचें खाणी ॥४॥ धन्य धन्य तो मारुति । द्रोणागिरी घेउनि हातीं ॥ ५ ॥ धन्य धन्य तो अश्वत्थ । वांझेलागीं पुत्र देत ॥ ६ ॥ धन्य धन्य अष्टतीर्थ । जीवजंतु उद्धरित ॥ ७ ॥ धन्य धन्य ते आरती । आली विघ्नेंची हरती ॥ ८ ॥ धन्य धन्य तो अंगारा । कामक्रोध लागीं मारा॥९॥ धन्य धन्य ते पुजारी । सेवा घेतो ज्याचे करीं ॥ १० ॥ धन्य धन्य तो हा शंख । माध्यान्हेसी देतो हांक ॥ ११ ॥ धन्य धन्य माधुकरी । चारी पदार्थ आहे घरीं ॥१२॥ धन्य धन्य तें भोजन । सेवेलागीं उपोषण ॥ १३ ॥ दास म्हणे वर्णिला कोण । शेष जिव्हा झाले दोन ॥ १४ ॥

( भजन )

**॥ दत्ता दिगंबरा या हो सावळ्या मला भेट द्याहो ॥**

## पद ६ वें.

( राग हमीर–ताल—त्रिवट चाल—नमन नटवरा )

नमन गुरुवरा गाणगवासा । भक्तहृदयसर कमलविलासा ॥ ध्रु० ॥ जगत्पालका नरहरिदेवा । अल्पवती तव व्हावी सेवा । सर्व सुखाचा अससी ठेवा । जाणुनि गुण वर्णनिरंतर दासा ॥ १ ॥ विधि हरिहर शेषादिक अगणित । दमले कारितां तव गुण सुगुणित । मंदबुद्धि मी तव सुदयांकित । तूंचि वदविता स्वयंप्रकाशा ॥ २ ॥

## पद ७ वें.

( राग भिमपलास–ताल—त्रिवट )

भज मन गाणगपुरीं गुरुराज । तारक सकलांचा हा नरहरि । कलियुगीं सौम्य उपाय ॥ ध्रु० ॥ कृतीं जनार्दन नाम घेउनी । त्रेतायुगीं रघुराज होउनि । रामकृष्ण द्वापारीं नटुनि । अवतरला गुरुराज ॥ १ ॥ तोच या युगीं अवतरला हरि । श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि । लीला करूनि· गाणगापुरीं । कृष्णाग्रज धरि पाय ॥ २ ॥

## पद ८ वें.

( राग मालकंस–ताल—त्रिवट )

दत्त दिगंबर रे दयाघन । अलख निरंजन रे ॥ ध्रु० ॥ निर्गुण निरुपम नित्य निरामय । मायापति हर रे ॥ १ ॥ भक्तकामकल्पद्रुम यतिवर । स्थित गाणगापुर रे ॥ २ ॥ विमल स्वरूप विशाल जगत्प्रभु । लीला नटवर रे ॥ ३ ॥ दाससहाय्यक सुरनरपालक । चरण सदा धर रे ॥ ४ ॥

## पद ९ वें.

( राग भैरवी–ताल—त्रिवट )

म्यां नयनीं देखिला श्रीगुरु गाणगवासी । धरियला वेष संन्यासी । भिमाऽमरजा संगम राहे । ये माध्यान्हीं मठासी ॥ १ ॥ समग्र

दुःख निवारिल प्रभु तो । निष्ठा ठेवी मनासी ॥ २ ॥ जाई झड-करीं शरण तत्पदा । नाशिल पातकराशी ॥ ३ ॥

( भजन )

॥ कपाळीं केशरी गंध ॥ दत्ता तुझा मला छंद ॥

## पद १० वें

( चाल—विमल अधर० ) राग—हमीर—त्रिताल.

चरणिं सतत मजसि ठाव दे दत्ता; श्रीपाद श्रीनरहरि ॥ ध्रु० ॥ अनन्यभावें, शरण पदीं तव; करि मज पावन ॥ १ ॥ भव भय निवटुनि, आत्मपदीं मज; नेई दयाघन ॥ २ ॥

## पद ११ वें

( चाल—या नव नवल० ) राग—खमाज—त्रिताल.

जा म्हणि शरण करुणामया, न दिसे, दत्तप्रभुविण, जगतिं अनुदिनीं; नाशिल दुर्धर माया ॥ ध्रु० ॥ होतां त्वन्मन चंचल भारी, श्रीगुरु त्यासि निवारी, भक्तां दीनअनाथा तारी, नेई तो निज ठायां ॥ १ ॥

## पद १२ वें

( चाल—ललना मना० ) राग·गरुडध्वनि—त्रिताल.

करुणाघना नच तुजविण त्राता, जगतिं भवनाशना ॥ ध्रु० ॥ सगुणरूपा, प्रभु धरुनि तूं; सतत सुखविसी भक्त परम ॥ १ ॥ चरणिं प्रीति, मज अचल दे निकटिं तव पदीं ठाव सतत ॥ २ ॥

## पद १३ वें.

( चाल—उगिच का कांता० ) राग—पिलु—त्रिताल.

सकल या जगता, रक्षिता तूंचि दत्ता ॥ ध्रु० ॥ निर्गुण तूं देवा असुनि, भक्त उद्धराया भुवनीं, रूप सगुण तूं घेउनि, साच करिशि पावन पतितां ॥ १ ॥

## पद १४ वें.

( चाल--प्रेमभावें जीव० ) राग-जीवनपुरी-त्रिताल,

उद्धराया दीनपतिता सकलां, श्रीगुरु अवतरला ॥ ध्रु० ॥
प्रभुच्या विमला लीला, गाउनी वदनीं चुकवि भवाला ॥ १ ॥
पतिता-वदनीं वेदा वदवुनि, हरिलें विप्रमदाला ॥ २ ॥

## पद १५ वें.

( चाल-स्वकुल तारक० ) राग-भिमपलास-त्रिताल.

शरण जा गुरुपदा, मनुजा; चुकवी दुस्तर भव-आपदा ॥ध्रु०॥
अनन्यभावें त्वत्पद स्मरतां, देईल इहपर सौख्य सदा ॥ १ ॥
अगम्यलीला दत्ताप्रभूची, दिधलें रजका नृपतिपदा ॥ २ ॥

## पद १६ वें.

( चाल-गमली मना० ) राग-सोहनी--त्रिताल.

सुदया करी, गुरुमाउली, या भूतलीं ॥ ध्रु० ॥ परम भक्तां प्रभू तत्त्वतां; ने चरणाजवळीं ॥ १ ॥ अंत्यज-वदनीं श्रुति वदवुनी लीला अघटित केली ॥ २ ॥

## पद १७ वें.

( चाल—सत्य वदे वचनाला० ) राग-कॉफी—त्रिताल.

धीर किती धरुं दत्ता, आतां; भेट दयाळा दे अवधूता ॥ ध्रु०॥
तूंचि खरा मम--माता जनिता, कोणि नसे मज, जगिं या त्राता ॥१॥
अत्रिनंदना त्रिगुणातीता, छेदिं मनिंची दुष्ट अहंता ॥ २ ॥

## पद १८ वें.

( चाल—रूपवली तो० ) राग-कॉफी—त्रिवट.

नित्य स्मरा त्या त्रिगुणात्मक दत्ता, भवार्णवांतुनि मुक्त करी पतिता ॥ धृ० ॥ सदा भावें, गुरुनाम गावें, परम पावन तुम्हांसि पावे; नसे गुरुविण दैवत त्रिजगता ॥ १ ॥

## पद १९ वें.

पूर्णनंदकंद विबुधवंद्य । देखियला हो आम्हीं पाहियला हो ॥धृ०॥

सदयहृदय अत्रितनय । कलिकृत बहु पाहुनि अनय । सुजनीं अवनीं अवनितनय । यतिवेषें प्रगटियला हो ॥ १ ॥ भस्मभूषित सकल अंग । दुकुल अरुणसम सुरंग । मदनताप करुनि भंग । अर्पिसी सुख आत्मकाळ हो ॥ २ ॥ कोटिमदनविदितवदन । मंदहसित कुंदरदन । अमलकमलदलसुनयन । सततलसत माळ गळा हो ॥ ३ ॥ श्रीनरसिंहसरस्वती स्तवनचकित वेदमति । गंगाधरतनय कृति हृत्कमळीं पूजियला हो ॥ ४ ॥

## पद २० वें.

( राग–पिलु. ताल—दादरा,)

दयावंत दत्तप्रभो गाणगापुरीं रे । दया० ॥धृ.॥ निर्बलासि देत बल। वांझेसी देत बाळ । अंधळ्यासि देउनि नेत्र । देखणा करी रे ॥ १ ॥ दया० ॥ बधिरास देत कर्ण ।निर्धनासि देतो धन । भक्तकाम करी पूर्ण । इच्छिल्यापरी रे ॥ २ ॥दया० ॥ पांगळ्यासि पाय देत । खुळ्यालागिं हात देत । कफ–पित्त–संनिपात । दूर करी रे ॥३ ॥दया० ॥ रक्तपिती कुष्टरोग । जाउनि होय दिव्य अंग । नारुढेरू होत भंग । भजनीं स्मरा रे ॥ ४ ॥ दया० ॥ शंखडंख भूतप्रेत । पळती तव नाम घेत । शिवानंद वास करित चरणकमलभृंग रे ॥ ५ ॥ दया० ॥

## पद २१ वें.

( राग—भैरवी—त्रिवट ).

सद्गुरु भज सदा तूं मम मना ॥ जगिं हेंचि साधन मुक्त व्हाया ॥ धृ० ॥ न धरि मनिं कांहीं परि हेतु किंतु ॥ प्रभु तोचि पुरवि सकलां ॥ मधुप जनपाता निज दे प्रसादा ॥ १ ॥

## पद २२ वें.

दत्त तो हा पंचगंगासंगमीं राहीं हो । भस्मालेपन दिव्यविमोचन यतिमनरंजन ॥ धृ०॥ रत्नजडित हातीं कंबु जयाचे संनिध शोभे कामधेनु हो । ( चाल ) डमरूधारण । पिशाच्चदंडण । भक्ता-

कारण ॥ १ ॥ भिक्षुकवेषा घेउनि सुंदर । करवीरीं भिक्षा केली हो । अत्रिनंदन यमभयभंजन । भवभयकंदन ॥ २ ॥ होउनि तल्लिन बाळकृष्ण हा जटाधराला स्तवी हो । पापी हें मन करि भ्रमनिरसन । देई दर्शन ॥ ३ ॥

## पद २३ वें.

दत्तराज पाहुनि आज तुष्टलों मनीं ॥ धृ० ॥ माघ वद्य प्रतिपदा। ऐसे हर्ष नोहे कदा । दृढ धरुनी दत्तपदा । करिति पूजनीं ॥ १ ॥ औदुंबरीं नित्य वसे । भक्तकाम पुरवितसे । कमलनयन श्याम दिसे । विचारितो जनीं ॥२॥ विनायकदास दीन ॥ जलावीण जैसा मीन । ब्रह्माविष्णुमहेश तीन । आठवितों मनीं ॥ ३ ॥

## पद २४ वें.

मूर्ती श्रीगुरुची किती तरि रम्य दिसे साची । किती तरि रम्य दिसे साची ॥ धृ० ॥ रुद्राक्षांचे हार मनोहर विलसति बहु कंठीं ॥ १ ॥ कस्तुरिमिश्रित गंध केशरी शोभे ललाटीं । प्रभूच्या शोभे ललाटीं । किती तरि ॥ २ ॥ कटिं मेखला भगवी कफनी परिकर लंगोटी । प्रभुला परिकर० किती तरि० ॥ ३ ॥ पायीं खडावा मच्छाकृतिच्या आवड बहु मोठी । प्रभूला आवड बहु मोठी । आवड० किती तरि० ॥ ४ ॥ ऐसें मोहक ध्यान प्रभूचें साठवि हृदयपुटीं । सांठ० किती तरि रम्य दिसे साची ॥ ५ ॥ विद्यानंदें राघवसुत हा प्रेमें घालि मिठी । प्रभुला प्रेमें घालि मिठी । किती तरि० ॥ ६ ॥

## पद २५ वें.

गुरुनरसिंहसरस्वते पाही पाही हो मजला ॥ धृ० ॥ जन्मोजन्मीं जरामरणदुःख हें भोगावें किती तरी स्वामी मी तें पाही० ॥ १ ॥ दुर्लभ नरतनु व्यर्थ न जावें मति द्यावी मज तव भक्तीचि तें पाही० ॥२॥

चरणकमल तुझें पहावें म्हणुनि मनीं । इच्छितो निशि-दिनीं दावावें तें पाही० ॥ ३ ॥ पापी म्हणुनि जरी त्यागिसि मज-तरी पततपावन नाम कैसेनीं तें पाही० ॥ ४ ॥ बाळकृष्णगुरु राम-सदोदित मागणें कांहीं नाहीं यापरतें पाही० ॥ ५ ॥

## पद २६ वें.

( सत्पुरुष रामचंद्र महाराजकृत )

**चाल**—जनहो श्रीपादपदीं मनीं ठेवा.

स्मर रे स्मर सखया श्रीगुरुस्वामी । पुरगाणगग्रामीं । करुनी वास नरसिंहसरस्वती पुरवि त्वरित मन इच्छित कामी ॥ धृ ॥ भीमामरजा हे मिळुनी वाहे । संगमिं शोभा हे । नेमानुष्ठान स्थळ तें आहे । औदुंबरिं पाहे ( चाल ) शमदमादिगुरु करुनि साधनें । दावुनी तरवी मुमुक्षु कामीं ॥ १ ॥ अतसीकुसुमापरि तनुची छाया । यतिवेषें काया । धुतलें अति स्वच्छ वसन काषाया । नित्य तें नेसाया । हातीं विलसत दंडकमंडलु । त्रिशुल डमरुही देखियला मीं ॥ २ ॥ माळा पुष्पांच्या परिमळ असती । गळ्यांत ते दिसती । तुळसीबिल्वानें पूजा होती । झळके त्रैमूर्ती । बाळकृष्णगुरु राम निरंतर पाहुनी मनीं। वहु झाले विरामी ॥ ३ ॥

## पद २७ वें.

राग—भूप. ताल—त्रिवट.

त्रैमूर्ति अवतार गुरु हा त्रैमूर्ति अवतार ॥ धृ० ॥ ज्याची सेवा भावे वदतां । होतसे भव हा पार ॥ १ ॥ ज्याला ध्याता अमरचि होतो । स्फुरतो ब्रह्मविचार ॥ २ ॥ बाळकृष्ण सद्गुरुचे कृपेनें । राम दिसे निजसार ॥ ३ ॥

( भजन )

**॥ नारायण विधी अत्रिनाथ । दत्त जनार्दन एकनाथ ॥**

## पद २८ वें.

चाल—व्रजभुवनीं

सद्गुरु स्वामी अवतार घेउनी केला जगदोद्धार ।। धृ० ।। काय वर्णू महिमा अपार वर्णितां वेदहि थकले फार । नेति नेति म्हणुनि आकार । सुचवुनि मौनचि धरिलें सार ।। चाल ।। शोधितां नलगे अंत ना पार । पाहतां अनंत निर्विकार । तेथें नाहिंच द्वैतविचार । म्हणवुनी लागेना हो थार ।। १ ।। सुक्षेत्र गाणगाभुवनीं । येउनी पाहतां गुरुनयनीं । भीमामरजा एकवटुनी । वहाती संगम निजस्थानीं (चाल) बहु रम्य दिसत ते वनीं । एकांत स्थान पाहुनी । अनुष्ठान कराया मनीं । राहिले नेमुनि निज निर्धार ।। २ ।। कामिकासी कामना पूर्ण । करुनियां देतो सज्ञान । नाम स्मरतां पळवी विघ्न । धांव घेउनि येतो रे आपण ।। चाल ।। त्रैमूर्तिराज यति जाण । त्रिभुवनीं भरुनी उरले आपण ।। सद्गुरु बाळकृष्ण भगवान् । राममय करितोचि जगदाकार ।। ३ ।।

## पद २९ वें.

( सत्पुरुष रामचंद्र महाराजकृत हिंदुस्थानी )

मेरा गुरु गाणगपुर स्वामि यहि है । स्वामि येहि है जी मेरा । सद्गुरु येहि है ।। घृ० ।। तारन जीवोंको कहे तो । गुरु बिन नही जगतमे तो । गुरुका अवतार यहितो प्रगट हुवा है ।। १ ।। दंड और कमंडलुधर । पुंडरीक गदा उपर । मंडितकर शंखचक्र । कुंडल कानमें है ।। २ ।। पहितन काषाय वस्त्र सोहि रंग उपरि-वस्त्र । सुहास्यवदन कमलनेत्र । सुबरदानी है ।। ३ ।। नभसरिखा नीलरंग शोभत गुरु श्यामलांग । बभुतसे सुशोभितांग । प्रभुस्वरूप है ।। ४ ।। केशरका गंध तिलक विशालभालपर सुरेख । देशिकेंद्र बाबारामको दर्शन देते है ।। ५ ।।

## पद ३० वें.

### पद कानडी

॥ दत्तात्रयने गुरु अवतरिसिदनो । श्रीसुक्षेत्र गाणगभुवनदल्लिरुववनो ॥ प० ॥ वेदविहितकर्म आचरिसुवनो । शुद्धपद्धति जनरिगिदुतोरिसुववनो । बद्धजीवगळिगुद्धहरिसीहाकुवनो । सिद्ध सद्गुरुइवने सद्गतिघडववनो ॥ चाल ॥ भवविमोचक भस्मभूषित भीमातटवासनो ॥ सद्भावदिंददलिभजि सुवरिगिंव भयहरिसुवनो॥ १ ॥ चातुर्थाश्रमनडि सलिबेंकदवनो । महाक्षेत्रकाशिगेपोगिगरुशोधिसिदनो। यतिगोळवळगे कृष्णसरस्वातिगिवनो । अतीप्रीलिंदुपदेश गृहिसिकोंडवनो ॥ चा० ॥ कंडेयाति वरकर्णकुंडल काषायांबरदेवनो ॥ करदंडमंडितकमंडलुधर करुणावारिधिनो ॥ २ ॥ गुरुअनुष्ठान माडुवनित्यस्थळनो।भीमाऽमरजासंगम तीर सिद्धस्थानवनो भूरुकालदलि पूजिसिकोंबुववनो । हरिहरब्रह्मात्रैयमूर्ती तरुणोपायकनो ॥चा०॥ परमपुरुषिंव पतितपावन प्रगटजनरोळगादनो ॥ परमार्थप्राप्तिगेपंथ तोरिसिपरंज्योतिप्रभुनो ॥ ३ ॥ गुरुतापगळेल्लाकळेदुहाकुवनो । इन्नइरुववल्लेवुभूपपिशाचगळनो । गुरुअनुष्ठानस्थानदमहीमिदनो । इदकारुवर्णिसुवरु अपरीमितदनो ॥ चा० ॥ पारविल्लदे पार महिमिदुपरियतिळियदुकठिणनो गुरुपरम ॥ पावनपीठदरासिव परमानंदिवनो ॥४॥ कुरवपुर श्रीपादः श्रीवल्लभिवनो । मत्तुकारंजनगरदलिपुट्टिबंदवनो । तरुवरवदुंबरदलिशोभिसुवनो । देवा नरसिंहसरस्वती यतिराजनिवनो । निरुपिव निजज्ञानदायकनित्यानिर्मलवासनो । गुरुनिरंतर श्रीबालकृष्णगे रामवर्णिसुवनो ॥ ५ ॥

## पद ३१ वें.

पालखींत स्वारी नेम गुरुवारीं । आनंद दरबारीं वर्णवेना ॥ध्रु०॥ द्विजाची ही दाटी वेद बोले ओठीं । त्याइलासे छाटी दिगंबर ॥ १ ॥ रुद्राक्षांची माळ कस्तूरीचा टिळा । पाहतां मन डोळा

निवतसे ॥ २ ॥ जयजयकार नाम करिती वेळोवेळां । दुर्लभ सोहळा ब्रह्मादिकां ॥ ३ ॥ दास म्हणे गुरु घेई ही चाकरी । मोरचल करी देई माझ्या ॥ ४ ॥

## पद ३२ वें.

( चाल-होईल कलह म्हणूनी० )

चिंतूनी दत्त प्रभूला । जाई मनुजा मोक्षपदाला ॥ ध्रु० ॥ विप्रस्त्रीचा बालक होउनि । कलियुगीं भक्तां लीला दावोनि । कृष्णसरस्वती गुरुला । मानूनि घेई संन्याशाला ॥ १ ॥ रजका इच्छित राज्य अर्पुनि । वंध्यलागीं संतति देउनि । औदुंबर काष्ठाला । शाखी बनवुनि हरी कुष्टाला ॥ २ ॥ भास्करशर्मा याच्याकडूनि । त्रिवर्ग तृप्ति शीदा आणुनि । करुनि समाराधनेला । चारी सहस्र शमवी क्षुधेला ॥ ३ ॥ अनेक तीर्थे हिंडोनि भूवरीं । निर्गुणपादुका गाणगापुरीं । स्थापन करुनि गेला । श्रीवल्लभा हा श्रीशैल्याला ॥ ४ ॥ अल्पमतीनें गुण वर्णियले । वर्णन करितां वेदहि श्रमले । सेवक पायीं सकलां । निशिदिनीं सेवा गुरुचरणाला ॥ ५ ॥ चिंतुनि० ॥

## पद ३३ वें.

( राग-भूप. ताल-त्रिवट. )

दत्ता दीनदयाळा । पाहि कृपाळा मदनगोपाळा त्रिभुवनीं जयपाला ॥ सुंदर तव या रूपा लाजती कोटि चंद्रकळा ॥ धृ० ॥ त्रिशूल डमरु करि साचे विराजे भक्तांचें भय दूर करा जे। यास्तव धरिले दंड करा जे । किल्मिष कल्लोळा ॥ १ ॥ पायीं पादुका रज्जु कटीचे । दिसती नाना फणिवर साचे । दंडकमंडलु घेउनि साचे । स्फटिकाच्या माळा ॥ २ ॥ शांत दांत प्रभु यति श्रीमंता । सार्वभौम गुरु षड्रिपुहर्ता । क्षमा करी तव सेवे चुकतां। बाल कवी पाला ॥ ३ ॥

## पद ३४ वें.

( सत्पुरुष रामचंद्र महाराजकृत )

( राग–सारंग. ताल–झंपा. )

पाहिलें आज मी भक्तजनभाग्यनिधिला । भूमंडलामध्यें नरसिंह-सरस्वतिला ।। ध्रु० ।। पाहिलें आज मीं । सोडिना कधीं यासी मी । येउनि नरजन्मि महालाभ झाला ।। वारिजदळपदा परिकर । हृदयकमाळें जे ध्याति दृढतर । त्यांसि निजसुख देतो यतिवर । काम पुरवुनि हाचि गुरुवर । वर दे तयाला ।। १ ।। निगमागमासि आपण मुख्य म्हणवितों मूळ कारण । जगिं कमंडलु दंडधारण । सगुण होउनि करितो रक्षण । गुरु या जनाला ।। २ ।। इहलोकीं गाणगभुवनीं । वास केला क्षेत्र पाहुनि । वर गंगानुजासि देउनि । रक्षिलें दासासि अनुदिनीं । प्रभूची ही लीला ।। ३ ।। सायंदेवाचें ध्रुपद । कानडीत आहेत शब्द । तेंचि हें मराठींत पद । स्फुरविले गुरु बाबाबोध । रामदास याला ।। ४ ।।

## पद ३५ वें.

( राग–भैरवी. ताल–झंपा. )

पाहिलें पाहिलें आज हो आमच्या गुरूला भूमंडलामध्यें यति-कुलरामचंद्रमाला ।। ध्रु० ।। तत्त्वबोधक गुरूला । उपनिषच्चरिताला । व्यक्त झाला । तोचि परब्रह्म यतिला ।। १ ।। उरगेश शयनाला । परवेष कायाला । भाषापालक याला । शुभदायकाला ।। २ ।। गंध परिमळ याला । आनंदवारिधिला । सुयागेंद्र श्रीपाद श्रीवल्लभाला ।। ३ ।। मंत्रकूट मिरवोनी स्वतंत्राचि असलेला । मूर्ति हे पाहतांचि नवल पुरला ।। ४ ।। गजेंद्रवरद हा देई वर गंगुला । स्मरुनि तो यतिला परिसाचि झाला ।। ५ ।। ऐसें सायंदेव स्तवुनि गुरु बाबाला । नमितांचि रामपदिं प्राप्त झाला ।। ६ ।।

## पद ३६ वें.

( चाल—भूषण संसारा ).

दत्ता अवधूता । श्रीगुरुभक्ता राक्षिसि संकटीं पडतां ॥ ध्रु० ॥ भस्मांकित तनु रुद्राक्ष कंठा कक्षे झोळी कुबडी हातां ॥ १ ॥ अनुसूयेची भक्ती बघतां । प्रेमें येसी तिचिया पोटां ॥ २ ॥ सरस्वती भागे तव गुण गातां । विष्णुनंदन पदिं ठेवि माथा ॥ ३ ॥

## श्रीअष्टतीर्थी पद.

## पद ३७ वें.

ताल—धुमाळी.

अनंत कोटी ब्रह्मांडेश्वर नरहरी गुरु गाणगपूरीं । प्रगटवि दत्त दिगंबर तीर्थें अष्ट तीनही ताप हरी ॥ध्रु०॥ पहिलें षट्कुलतीर्थ असें तो भीमामरजासंगमची । प्रयागाहूनी अधिक थोरवी त्रिजगीं तुलना नच याची ॥ १ ॥ दुसरें तीर्थ असे नरसिंह मनोहर नामें गुरु वदती । संगमवासी ईश्वर हा श्रीमल्लीकार्जुनचि ते कथिती ॥ २ ॥ तिसरें काशीतीर्थाचि वाराणशि भागीराथि हे ख्याती । काशीहूनी असे श्रेष्ठची बहुतहि ईशाची वसती ॥ ३ ॥ पुढतीं चवथें तीर्थ असें हो पापविनाशी त्या म्हणती । तेथें स्नानादिक करितांची सकल दोष जळुनी जाती ॥ ४ ॥ पंचमकोटी तीर्थचि खासें किति वर्णू त्याची थोरी । जंबूद्वीपीं तितुकीं तीर्थें तितुकीं कोटिमाझारीं ॥ ५ ॥ तीर्थ सहावें रुद्रपाद तें सकलहि पितरां उद्धारी । गयेहुनी तें थोराचि, माघीं अवभृत सोहाळा भारी ॥ ६ ॥ तीर्थ सातवें चक्रतीर्थ तें द्वारावतिहूनी थोर । अस्थी तेथें टाकुनि देतां होती त्या चक्राकार ॥ ७ ॥ तीर्थ आठवें मन्मथनामें श्रीकल्लेश्वर वास करी । महाबळेश्वर गोकर्णाचि गिरिजापति शिव हा त्रिपुरारी ॥ ८ ॥ अष्टहि तीर्थें पावन केलीं श्रीगुरुंनीं जगदुद्धारा । स्नानें करितां श्रीगुरु चुकवी लखचौऱ्यांशीचा फेरा ॥ ९ ॥ या पद्याच्या श्रवणें पठणें अष्टहि तीर्थें

स्नान करीं । सहस्रदलकमलीं तूं हें मन, नरहरिचरण सदैव धरी ॥ १० ॥ श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर नरहरि दत्ताची लीला । या सद्गुरुनें नामचि गातां लाभ अलभ्यचि मज दिधला ॥ ११ ॥

## पद ३८ वें.

स्वामी नरसिंहसरस्वतीये । निम्मचरणक्केरागि वर बेडुवे ध्वरियेवा बयसूवे हरियें ॥ ध्रु० ॥ स्मरणी निन्नदु ननगिरली । पार दिल्लदे भवदुःख तोरधांगिरली । सारसार विचारिली । परम भाक्तियवदु निन्न चरणदल्लिरली अचरवागिरली ॥ १ ॥ साधू संतर संगतिरली । माधवानंत निन नामे वदनदल्लिरली । साधनकिदे यूक्तिरली । बोध परतत्त्व प्रकाशागूवंथादिरली । सद्दढवागिरली ॥ २ ॥ ज्ञान ईपरी ननगिरली । निन्नसत्स्वरूपदल्ले ना ऐक्यागोदारिली । अन्यवस्तुगळ्यल्ला मरिली । निने गुरुबाळकृष्णेंदु अनुभवकिरली । रामगतोरिवरली ॥ ३ ॥

## पंचपदी.

## पद १ लें.

( राग खमाज--कवाली )

चल मना गाणगापुरीं । दत्तगुरु तुला उद्धारी ॥ ध्रु० ॥ अनसूयात्री हे जेथें । वसती ब्रह्मा हरिहर तेथें दत्तगुरु । अवतार जगीं ते । घेती भक्तां तारी ॥ १ ॥ सकल देवमुनि संतहि येती । कार्तवीर्य नवनाथ भेटती । संतजनार्दन नाथावरती । केली कृपा संसारीं ॥ २ ब्रह्मानंदीं राहि निरंतर । प्रणवरूप तेजोमय सुंदर । श्री धी लोळति गुरुचरणांवर । सकल संकटें वारी ॥ ३ ॥ परमाणूंचा गाभा साच । होई विराटस्वरूपीं तोच । वर्णु शकेना ब्रह्मदेव वच । आत्मरूप अवधारीं ॥ ४ ॥ ध्याई तत्पद निशिदिनिं वाचे । नामस्मरण हृदयभक्तीचें । समजे सुरवर दत्तगुरु वचे।दासाचा कैवारी॥ ५ ॥

भजन

## ॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

### पद २ रें.

राग विहार—त्रिताल.

दत्तभजन मन सोडुं नको । उद्वेगाग्नी भडको परि तूं दत्तभजन कधिं टाळुं नको ॥ ध्रु० ॥ जरि दुर्दैवें दुःख तुफानीं । तव नौका जाई उसळोनी । दत्तपदीं दृढ विश्वासोनी । भजन करी गा शंकुं नको ॥ १ ॥ दुर्धर दुःखांतुनिही तूंतें । मुक्त करील झणिं धरि धीरातें । मृतपति उठवुनि सौभाग्यातें । सतिसी दिधलें विसरुं नको ॥ २ ॥ रजका राज्यपदीं बसविलें । शूद्रशेत शतगुण पिकविलें । शुष्क काष्ट पल्लवयुत केलें । जाणसि तूं भांबावुं नको ॥ ३ ॥ अनेक अघटित अगम्य लीला । नित्यसांप्रति असाति चालल्या । इहपर सौख्या देईल तुजला । अढळभाव धरिं डगूं नको ॥४॥ श्रम पावुनि जरि भजना चुकशिल । नौकेसह तूं फुकटाचि मरशिल । दत्तभजन-योगें उद्धरशिल । मुळिंच कुदैवा वचकुं नको ॥ ५ ॥ गुरुभजनें तूं विजयी होशिल । दुर्दैवातें भस्माचि करशिल । नौकेसह तूं तरुनी जाशिल । लाभ अलभ्याचि दवडुं नको ॥ ६ ॥ गोविंदात्मज विनवी हें मन । दत्तगुरुपदावरि घे लोळण । भजन करीं तूं निश्चल होउन । करिल कृपा गुरु भडकुं नको ॥ ७ ॥

### पद ३ रें.

राग–बागेसरी; त्रिताल—[ चाल—प्रेम नच जाई ]

दत्तगुरुनाम रसने घेई । हो सार्थक जन्माचें ॥ ध्रु० ॥ नामें तरले पाषाणहि ते । नामाचि तारिल देहातें ॥ १ ॥ नामयोग हा सुलभ कलियुगीं । सकल संत पथ हाचि वानिती ॥ २ ॥ नामामृत करिं पान सदोदित । श्रीपाद श्रीवल्लभ तारिल ॥ ३ ॥

## पद ४ थें.

( चाल—झालें )

दत्तदरबार जगतामधिं एकचि थोर ॥ ध्रु० ॥ कामिनाक निष्कामी भोजन । या निःशंकाचि अनन्यशरण । सेवा भक्तीनें गुरुचरण । करि उद्धार ॥ १ ॥ कैवल्यपद नरहरिचरण । पापताप दैन्याचें हरण । करितिल खास पहा अनुभवुन । कां मग घोर ॥ २ ॥ भक्तकामकल्पद्रुम यतिवर । दया–क्षमा–शांतीचा सागर । भक्तांचा अभिमान निरंतर । गुरु धरणार ॥३॥ नास्तिक येथें आस्तिक होती । आहे ऐशी सदा प्रचीती । भटकुं नको मृगजळासांगाती । हा निर्धार ॥ ४ ॥ भुवनेश्वरिसंनिध औदुंबर । वाडानरसिंह कृष्णातीर । क्षेत्र तसेंची गाणगापुर । भीमातीर ॥ ५ ॥ येथें येण्या शक्ति नसेल । असाल तेथुनि भक्ति कराल । अनुभव तुम्हां खास येईल । हें पटणार ॥ ६ ॥ दास्य करा दत्तात्रयगुरुचें । इतर सर्व दास्यांतुनि साचें । मुक्तचि करि हा निर्धाराचें । ध्यावें सार ॥७॥ अखिलहि तीर्थें नरहरिचरणीं । त्रिभुवनपति फेरी त्रयभुवनीं । प्रत्यक्ष वसे तीनीं स्थानीं । विश्वाधार ॥ ८ ॥ नरहरिदत्तकृपेचें अंजन । नेत्रीं भरतां होतें उन्मन । स्मरणाच्या योगें ये धाउन । अत्रिकुमार ॥९॥ रावरंकही फकिर अमीर । बादशहाही प्रजासुरासुर । हात पसरती होउनि किंकर । गुरु दातार ॥ १० ॥ अनसूयात्मज दत्तदिगंबर । विश्वंभर नरहरि साचार । श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर । गाणगापूर ॥११॥

## पद ५ वें.

( चाल–चंद्रकांत राजाची कन्या )

सद्‌गुरुनाथा परमसमर्था जगद्‌गुरूदत्ता ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि धाव पाव आतां ॥ ध्रु० ॥ मजसम नाहीं कुणी पातकी तीनीं जगतांत । पातकसंहारक तवसम कुणि नसे त्रिलोकांत ॥ १ ॥ कर्तुमकर्तुं तेवि अन्याथाकर्तुं तव शक्ती । परमाणूचा गाभा तेंवी

विराट तुला म्हणती ॥ २ ॥ विधिहरिहर तूं एकाचि अद्वय अलक्ष्य विश्वात्मा । काळातें गा त्वांचि जिंकिलें नसेच तुज उपमा ॥३॥ सगुणहि निर्गुण अखिलनिरंजन इहपर सुखदाता । परब्रह्म परिपूर्णाचि तेजोराशि गुरू—ताता ॥ ४ ॥ शाश्वत अविनाशी तूं सद्-गुरु विश्वजनकजननि । विश्वव्यापि संतराजराजेश्वर तिहिं भुवनीं ॥ ५ ॥ मायातीता कैवारी तूं भक्तांचा सदया । शरणांगत रक्षक सांभाळीं ब्रीद्र तुझें सखया ॥ ६ ॥ तुजासि वर्णितां कुंठित झाले थोरथोर जेथें । या बालाचा सद्गुरुनाथा पाड काय तेथें ॥ ७ ॥ जैसा तैसा तरि मी तव कैवल्यप्रद चरणा । शरणांगत आहेच निरंतर करिं मम उद्धरणा ॥ ८ ॥ तव चरणातें मिठी मारिली सोडी नच आतां । नाम तुझें गाई सुखदाई तुझीच वत्सलता ॥ ९ ॥ तारीं मारीं सर्वस्वी हा बाल तुझे पायीं ॥ एकरूपचि अद्वैतपणें करूनिया घेई ॥ १० ॥ दत्तगुरो हा सुदिन केधवां ऐसा दाखविसी॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि गाणगापुरवासी ॥ ११ ॥

**पंचपदी समाप्त.**

---

# बावन्न श्लोकी गुरुचरित्र.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयगुरवेनमः ॥ अथध्यानम् ॥ ॥ श्लोक ॥ दिगंबरंभस्मसुगंधलेपनंचक्रंत्रिशूलंडमरुंगदांच ॥ पद्मासनस्थंरविसोमनेत्रंदत्तात्रयंध्यानमभीष्टसिद्धिदम् ॥ १ ॥ काषायवस्त्रंकरदंडधारिणंकमंडलुंपद्मकरेणशंखम् ॥ चक्रंगदाभूषितभूषणाढ्यंश्रीपादराजंशरणंप्रपद्ये ॥ २ ॥ कृतेजनार्दनोदेवस्त्रेतायांरघुनंदनः ॥ द्वापारेरामकृष्णौचकलौश्रीपादवल्लभः ॥ ३ ॥ ॐनमोजीविघ्नहरा ॥ गजाननागिरिजाकुमरा ॥ जयजयाजीलंबोदरा ॥ एकदंताशूर्पकर्णा ॥१॥ श्लोक ॥ त्रिमूर्तिराजागुरुतूंचिमाझा ॥ कृष्णातिरींवासकरूनिओजा ॥ सद्भक्ते-

थेंकरितीआनंदा ॥ त्यादेवस्वर्गींबघतीविनोदा ॥ २ ॥ जयजयाजी-
सिद्धमुनी ॥ तूंतारकभवार्णवांतुनी ॥ संदेहहोतामाझेमनीं ॥ आजितुवां-
कुंडकेलें ॥ ३ ॥ ऐशीशिष्याचीविनंति ॥ ऐकूनिसिद्धकायबोलती ॥
साधुसाधुतुझीभक्ती ॥ प्रीतिपावेश्रीगुरुचरणीं ॥४॥ भक्तजनरक्षणार्थ ॥
अवतरलाश्रीगुरुनाथ ॥ सगरपुत्रांकारणेंभगीरथें ॥ गंगाआणिलीभूमं-
डळीं ॥ ५ ॥ तीर्थेंअसतींअपारपरी ॥ समस्तासांडूनिप्रीतिकरी ॥
कैसापावलाश्रीदत्तात्री ॥ श्रीपादश्रीवल्लभ ॥ ६ ॥ ज्यावरीअसेश्रीगुरुची-
प्रीति ॥ तीर्थमहिमाऐकावयाचित्तीं ॥ वांच्छाहोतसेत्याज्ञानज्योती ॥
कृपामूर्तियतिराया ॥ ७ ॥ गोकर्णक्षेत्रींश्रीपादयती ॥ राहिलेतीनवर्षें-
गुप्ती ॥ तेथूनिश्रीगुरुगिरीपूरायेती ॥ लोकानुग्रहाकारणें ॥ ८ ॥ श्री-
पादकुरवपुरींअसतां ॥ पुढेंवर्तलीकैशीकथा ॥ विस्तारूनिसांगआतां ॥
कृपामूर्तिदातारा ॥ ९ ॥ सिद्धम्हणेनामधारकासी ॥ श्रीगुरुमहिमाकाय-
पुससी ॥ अनंतरूपेंपरियेसीं ॥ विश्वव्यापकपरमात्मा ॥ १० ॥ सिद्ध-
म्हणेऐकवत्सा ॥ अवतारझालाश्रीपादहर्षा ॥ पूर्ववृत्तांतऐकिलाऐसा ॥
कथासांगितलीविप्रास्त्रियेचीं ॥ ११ ॥ श्रीगुरुम्हणतीजननीसी ॥ आम्हां-
ऐसानिरोपदेसी ॥ अनित्यशरीरतूंजाणसी ॥ कायभरंवसाजीविताचा
॥ १२ ॥ श्रीगुरुचरित्रकथामृत ॥ सेवितावांच्छाअधिकहोत ॥ शमन-
करणारसमर्थ ॥ तूंचिएककृपासिंधू ॥ १३ ॥ ऐकूनिशिष्याचेंवचन ॥ संतोष-
करीसिद्धआपण ॥ श्रीगुरुचरित्रकामधेनुजाण ॥ सांगतांझालाविस्तारें
॥ १४ ॥ ऐकाशिष्याशिरोमणी ॥ धन्यधन्यतुझीवाणी ॥ तुझीभक्तिश्रीगुरु-
चरणीं ॥ लीनझालीपरियेसीं ॥ १५ ॥ विनवीशिष्यनामांकित ॥ सिद्धयो-
गियातेंपुसत ॥ सांगास्वामीवृत्तांत ॥ श्रीगुरुचरित्राविस्तारें ॥ १६ ॥
ऐकशिष्यानामकरणी ॥ श्रीगुरुभक्तशिखामणी ॥ तुझीभक्तिश्रीगुरु-
चरणीं ॥ लीनझालीनिर्धारें ॥ १७ ॥ ध्यानलागलेंश्रीगुरुचरणीं ॥ तृप्ति-
नोहेअंतःकरणीं ॥ कथामृतसंजीवनी ॥ आणिकनिरोपावीदातारा
॥ १८ ॥ अज्ञानतिमिररजनींत ॥ निजलोंहोतोंमदोन्मत्त ॥ श्रीगुरु-

चरित्रवचनामृत ॥ प्राशनकेलेंदातारा ॥ १९ ॥ स्वामीनिरोपिलेंआ-
म्हांसी ॥ श्रीगुरुआलेगाणगापुरासी ॥ गौप्यरूपेंअमरपुरासी ॥ औदुं-
बरींअसतीजाण ॥ २० ॥ सिद्धम्हणेनामधारका ॥ ब्रह्मचारीकारणि-
का ॥ उपदेशींज्ञानविवेका ॥ तयेंप्रेतजननिसि ॥ २१ ॥ तुझाचरणसं-
पर्कहोतां ॥ झालेंज्ञानमजआतां ॥ परमार्थींमनऐकतां ॥ झालेंतुझे-
प्रसादें ॥ २२ ॥ लोटांगणेंश्रीगुरुसी ॥ जाऊनिराजाभक्तीसी ॥ नमस्कारी-
विनयेंसी ॥ एकभावेंकरूनियां ॥ २३ ॥ शिष्यवचनपरिसुनी ॥ सांग-
ताझालासिद्धमुनी ॥ ऐकभक्तानामकरणी ॥ श्रीगुरुचरित्रअभिनव
॥ २४ ॥ सिद्धम्हणेऐकबाळा ॥ श्रीगुरुचीअगम्यलीला ॥ सांगतांन-
सरेबहुकाळा ॥ साधारणमीसांगतसें ॥ २५ ॥ श्रीगुरुम्हणतब्राह्मणा-
सी ॥ नकोश्रमूंरेयुक्तीसी ॥ वेदांतनकळेब्रह्मयासी ॥ अनंतवेदअसती-
जाण ॥ २६ ॥ चतुर्वेदविस्तारेंसीं ॥ श्रीगुरुसांगतीविप्रासी ॥ पुढें
कथावर्तलीकैसी ॥ विस्तारावीदातारा ॥ २७ ॥ नामधारकम्हणे-
सिद्धासी ॥ पुढीलकथासांगाआम्हांसी ॥ उल्हासहोतोमाझेमानसीं ॥
श्रीगुरुचरित्रअतिगोड ॥ २८ ॥ पुढेंकथाकवणेपरी ॥ झालीअसे-
श्रीगुरुचरित्रीं ॥ निरूपावेविस्तारीं ॥ सिद्धमुनीकृपासिंधू ॥ २९ ॥
श्रीगुरुचरित्रसुधारस ॥ तुम्हींपाजिलाआम्हांस ॥ परितृप्तनव्हेगा-
मानस ॥ तृषाआणिकहोतसे ॥ ३० ॥ सिद्धम्हणेनामधारका ॥
पुढेंअपूर्वझालेंऐका ॥ योगेश्वरकाराणिका ॥ सांगेस्त्रियांचेस्वधर्म ॥ ३१ ॥
पतिव्रतेचीरीती ॥ सांगेदेवासीबृहस्पती ॥ सहगमनाचीफलश्रुती ॥
येणेंपरीनिरूपिली ॥ ३२ ॥ श्रीगुरुआलेमठासी ॥ पुढेंकथावर्त-
लिकैसी ॥ विस्तारूनिआम्हांसी ॥ निरूपावेंस्वामियां ॥ ३३ ॥
श्रीगुरुम्हणतीदंपतीसी ॥ ऐकापाराशरऋषी ॥ तयाकाश्मीररायासी ॥
रुद्राक्षमहिमानिरूपिला ॥ ॥ ३४ ॥ पुढेंकथाकैसीवर्तली ॥
विस्तारूनिसांगावहिली ॥ मतिमाझीअसेवेधली ॥ श्रीगुरुचरित्रऐ-
कावया ॥ ३५ ॥ गाणगापुरींअसतांश्रीगुरु ॥ महिमाझालाअप-

रंपारू ॥ सांगतांनयेविस्तारू ॥ तावन्मात्रसांगतसें ॥ ३६ ॥
ऐसाश्रीगुरुदातारू ॥ भक्तजनांकल्पतरू ॥ सांगताझालाआचारू ॥
कृपाकरूनिविप्रांसी॥३७॥आर्तझालोंमीतृषेचा॥घोटभरवींअमृताचा॥
चरित्रभागसांगेश्रीगुरूचा ॥माझेंमननिववींवेगीं ॥३८॥ सिद्धम्हणेनाम-
धारका ॥ पुढेंअपूर्वझालेंऐका ॥ साठवर्षेवांझदेखा ॥ पुत्रकन्याप्रस-
वली ॥ ३९ ॥ सिद्धम्हणेनामधारका ॥ अपूर्ववर्तलेंआणिकऐका ॥
वृक्षझालाकाष्ठसुका ॥ विचित्रकथापरियेसा ॥ ४० ॥ जयजयाजी-
सिद्धमुनी ॥ तूंतारकयाभवार्णवांतुनी ॥ नानाधर्मविस्तारूनी ॥
श्रीगुरुचरित्रनिरूपिलें ॥ ४१ ॥ मागेंकथानकनिरूपिलें ॥
सायंदेवशिष्यभले ॥ श्रीगुरूनींत्यांसीनिरूपिलें ॥ कलत्रपुत्रआणीं-
म्हणती ॥ ४२ ॥ श्रीगुरुम्हणतीद्विजांसी ॥ याअनंतव्रतासी ॥
सांगेनऐकातुम्हासी ॥ पूर्वींबहुतींआराधिलें ॥ ४३ ॥ श्रीगुरुमाझा-
मल्लिकार्जुन ॥ पर्वतम्हणजेश्रीगुरुभुवन ॥ आपणनयेआतांयेथुन ॥
सोडूनिचरणश्रीगुरूचें ॥ ४४ ॥ तूंभेटलासीमजतारक ॥ दैन्यगे-
लेंसकळाहिदुःख ॥ सर्वाभीष्टलाधलेंसुख ॥ श्रीगुरुचरित्रेऐकतां
। ४५ ॥ गाणगापुरींअसतांश्रीगुरू ॥ ख्यातीझालीअपारू ॥ लो-
कयेतीथोरथोरू ॥ भक्तबहुतझालेअसती ॥ ४६ ॥ सांगेनऐका-
कथाविचित्र ॥ जेणेंहोयपतितपवित्र ॥ ऐसेंहेंश्रीगुरुचरित्र ॥
तत्परतेंसीपरियेसा ॥ ४७ ॥ श्रीगुरुनित्यसंगमासी ॥ जातहोते-
अनुष्ठानासी ॥ मार्गांतशूद्रपरियेसीं ॥ शेतींआपुल्याउभाअसे ॥४८॥
त्रिमूर्तीचाअवतार ॥ वेषधारीझालानर ॥ राहिलेप्रीतींगाणगापुर ॥
कवणक्षेत्रम्हणूनियां ॥ ४९ ॥ तेणेंमार्गीतलावर ॥ राज्यपदधुरंधर ॥
प्रसन्नझालात्यासीगुरुवर ॥ दिधलावरपरियेसा ॥ ५० ॥ राज्यभेटी-
घेऊनी ॥ श्रीपादआलेगाणगाभुवनीं ॥ योजनाकरितीआपुलेमनीं ॥
गौप्यरहावेंम्हणूनियां ॥ ५१ ॥ म्हणेसरस्वतीगंगाधर ॥ श्रोतया-
करीनमस्कार ॥ कथाऐकामनोहर ॥ सकळाभीष्टलाधेल ॥ ५२ ॥

इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशत्-श्लोकात्मकंगुरुचरित्रं संपूर्णम् ॥

श्रीचरणपूजेचे वेळीं म्हणावयाचें स्तोत्र.

## श्रीदत्तात्रेय अष्टोत्तरशतनामस्तोत्र.

अस्य श्रीदत्तात्रेयअष्टोत्तरशतनामस्तोत्रमंत्रस्य ॥ ब्रह्माविष्णुमहेश्वरा ऋषयः ॥ श्रीदत्तात्रेयो देवता ॥ अनुष्टुप्छंदः ॥ श्रीदत्तात्रेयप्रीत्यर्थे जपे विनियोगः ॥ अथ ध्यानं ॥ दिगंबरं भस्मसुगंधलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदां च ॥पद्मासनस्थं दत्तात्रेयध्यानमभीष्टसिद्धिदं॥ इति ध्यानं ॥ अनसूयासुतो दत्तो अत्रिपुत्रो महामुनिः । योगींद्रः पुण्यपुरुषो देवेशो जगदीश्वरः॥ १ ॥परमात्मा परब्रह्म सदानंदो जगद्गुरु। नित्यतृप्तो निराकारो निर्विकारो निरंजनः ॥ २ ॥ गुणात्मको गुणातीतो ब्रह्माविष्णुशिवात्मकः ॥ नानारूपधरो नित्यः शांतो दांतः कृपानिधिः ॥ ३ ॥ भक्तप्रियो भयहरो भगवान् भवनाशनः । आदिदेवो महादेवो देवेशो भुवनेश्वरः ॥ ४ ॥ वेदांतवेद्यो वरदो विश्वरूपोऽव्ययो हरिः ॥ सच्चिदानंदसर्वेशो योगीशो भक्तवत्सलः ॥ ५ ॥ दिगंबरो दिव्यमूर्तिर्दिव्यभूतिर्विभूषणः ॥ अनादिसिद्धसुलभो भक्तवांछितदायकः ॥ ६ ॥ भुक्तिमुक्तिप्रदाता च कार्तवीर्यवरप्रदः ॥ एकोनैको न द्वितीयो निगमागमवंदितः ॥ ७ ॥ सात्वतानां महात्मा च विश्वात्मा विश्वतोमुखः । सर्वेश्वरः सदातुष्टो सर्वमंगलदायकः ॥ ८ ॥ निष्कलंको निराभासो निर्विकल्पो निराश्रयः ॥ पुरुषोत्तमो लोकनाथो पुराणपुरुषोत्तमः ॥ ९ ॥ अपारमहिमानंत आद्यंतरहितः शिवः॥ संसारभयदावाग्निर्भवसागरतारकः ॥ १० ॥ श्रीनिवासो विशालाक्षो क्षीराब्धिशयनोऽच्युतः । सर्वपापक्षयकरस्तापत्रयनिवारणः ॥ ११ ॥ लोकेशः सर्वभूतेशो व्यापकः करुणाकरः । ब्रह्मादिवंदितपदो मुनिवंद्यः स्तुतिप्रियः ॥ १२ ॥ नानारूपक्रियातीतो निःस्पृहो निर्मलात्मकः । मायाधीशो महात्मा च महादेवो महेश्वरः

॥ १३ ॥ व्याघ्रचर्मांबरधरो नागकुंडलभूषणः । सर्वलक्षणसंपन्नो सर्वसिद्धिप्रदायकः ॥ १४ ॥ सर्वज्ञः करुणासिंधुः सर्पहारः सदाशिवः ॥ सह्याद्रिवासः सर्वात्मा भवबंधविमोचनः ॥ १५ ॥ विश्वंभरो विश्वनाथो जगन्नाथो जगत्प्रभुः ॥ अष्टोत्तरशतं नाम्नां दत्तात्रेयमहामुनेः ॥ १६ ॥ नित्यं पठति यो भक्त्या सर्वपापैः प्रमुच्यते । सर्वदुःखप्रशमनं सर्वारिष्टनिवारणं ॥ १७ ॥ भोगमोक्षप्रदं नृणां दत्तसायुज्यमाप्नुयात् ॥ पठंति ये प्रयत्नेन सत्यं सत्यं वदाम्यहं ॥ १८ ॥ इति श्रीब्रह्मांडपुराणे ब्रह्मानारदसंवादे दत्तात्रेय अष्टोत्तरशतनामस्तोत्रं संपूर्णम् ॥

## पंचारति.

आरति भावें श्रीपतिची । नरहरिदत्तजगद्गुरुची ॥ धृ० ॥ काषायांबर करिं दंड । करि कलिकालातें दंड । भक्तांचें करितो अवन । तेंवी त्रिविधताप हरण ॥ चाल ॥ कमंडलु अमृतपूर्ण हातीं । पद्महि माला विजयवती । गदा ती शंखचक्र वरतीं । विधिहरिहर हा त्रैमूर्ति ॥ चाल ॥ श्रीपादश्रीवल्लभची । त्रिभुवनिं सत्ता करि साची ॥ १ ॥ कृतीं जनार्दने हा झाला । त्रेतीं रामचंद्र सजला । द्वापरिं रामकृष्ण नटला । कलियुगीं यतिवेषचि धरिला ॥ चाल ॥ श्रीपादश्रीवल्लभ हा कुरवपुरिं लीला करुनि महा । माधवांबासति–गेहा । पुनरपि ये धरुनी देहा ॥ चाल ॥ नरसिंहसरस्वति हा तोची । ख्याती जगिं अवताराची । जगदुद्धारास्तव आला । दिसतो आजहि नयनांला ॥ २ ॥ पंचप्राणांच्या ज्योती । ओवाळी नरहरिमूर्ति । ॥ चाल ॥ आनंदाश्रूंच्या माला तनुमनधन या सद्गुरुला । प्रेमें आत्मा अर्पियला । भेणें न लगे कलिकालां ॥ चाल ॥ श्रीपादश्रीनरहरिची । इहपर सुखदा चरणांची ॥ ३ ॥

## नरसिंहसरस्वतीस्तोत्रम् ॥ ( अष्टक ).

( सायंदेवकृत )

आदौ ब्रह्मत्वमेकमेव जगतां वेदात्ममूर्ति विभो । पश्चात् क्षोणितले विनाशि दितिजा कृत्वावतारं प्रभो । हत्वा दैत्यमनेकधर्मराचिता भूत्वात्मजोत्रिगृहे । वंदेऽहं नरकेसरीसरस्वतीश्रीपादयुग्मांबुजम् ॥ १॥ भूदेवाखिलमानुषं विदुजना बाधायमानः कलिं । वेदायुष्यमनेकवर्णमनुजाभेदादिभूतोन्नतिम् छेत्ताऽधर्मतमांधकारहरणं ज्ञानप्रदीपोज्वलम् । वंदेऽहं नर० ॥ २ ॥ ध्यातस्त्वं हरिमनेकयातिगुरवो जाताग्रजन्माविभो हेतुः सर्वविभो जनाय तरणं ज्योतिः स्वरूपं जगत् । चातुर्थाश्रमस्थापितं क्षितितले पातुः सदासेव्ययं ॥ वंदेऽहं नर० ॥३॥ चरितं चित्रमनंतकीर्तिमतुलं परिभूतभूमंडले मूकं वाक्यं दिवांधकस्य नयनं वंध्यां च पुत्रं ददत् । सौभाग्यं विधवां च दायकाश्रियं दत्वा च भक्तं जनम् ॥ वंदेऽहं नरकेसरी० ॥ ४ ॥ दुरिताघोरदरिद्रदावतिमिरहरणं जगज्ज्योतिषं सुरधेनुसुरपादरतजनाकरुणादिभक्तार्तिहा । श्रीनरसिंहसरस्वतीश्वराविभो शरणागतं रक्षणं ॥ वंदेऽहं० ॥ ५ ॥ गुरुमूर्तिश्चरणारविंदयुगलं स्मरणं कृते नित्यसौ चरितंक्षेत्रमनेकतीर्थसफलं सारितादिभागीरथी । तुरगामेधसहस्रगोविदु जनाः सम्यक् ददस्तत्फलम् ॥ ६ ॥ नो शक्यं तव नाम मंगलस्तवं वेदागमागोचरं । पादद्वंद्वहृदयाब्जमंतरलं निधाय माम् भूमिपाम् । भूयोभूयः स्मरन्नमामि मनसा श्रीसद्गुरुं पाहि माम् ॥ वंदेऽहं० ॥ ७ ॥ भक्तानां तरणाय सर्वजगतां दीक्षां ददन्योगिनां । सुक्षेत्रपुरगाणगास्थितप्रभो दत्वा चतुष्कामदां । स्तुत्वा भक्तिसरस्वतीगुरुपदं जित्वाघघोषादिकम् वंदेऽहं० ॥ ८ ॥

### अष्टक २.

ब्रह्मश्रीशहरस्वरूपमचलं लिंगं जगद्व्यापकं । सत्यं ज्ञानमनंतमक्षरमजं चांतर्बहिर्व्यापकम् । सच्छंदं स्वगुणाश्रितं सदमलं सर्वेश्वरं

शाश्वतं । वंदेऽहं गुरुपूर्णबोधमनिशं श्रीदत्तयोगेश्वरम् ।। १ ।। विश्वस्यायतनं विराटतनुभृत् वेदांतसारं विदुश्चंद्रादित्यकृशानुनेत्रमनघं ज्योतिः परं जीवनम् । उत्पत्तिस्थितिनाशनं जगदिदं चैतन्यबीजात्मकं ।। वंदे० ।। २ ।। शास्त्राकारमनेककाव्यरचनादीक्षोपमंगीकृतं । कालातीतमनादिसिद्धपुरुषं कर्पूरगौरोपमम् । निःसीमं निगमादिदं नितिपरं नेतीति निर्धारितम् ।। वंदे० ।। ३ ।। भूतानामधिदैवतं निजमहत्तत्वं पुराणं परं । मूलस्थाननिवासिनं मुनिवरं मृत्युंजयं मुक्तिदम् । सर्वोपाधिविवर्जितं च विषयैः सर्वेंद्रियैः स्वाधिनम् ।। वंदे० ।। ४ ।। आधिव्याधिहरं नृणामतिशयं चारोग्यमायुःकरं । सौभाग्यं सकलेप्सितार्थकरणं संपत्करं शोभनम् । कल्याणं खलु दुःखदोषशमनं कारुण्यपुण्येश्वरम् ।। वंदे० ।। ५ ।। आनंदानंदकर्त्रा त्रिभुवनगुरुशं शुद्धसत्वप्रधानम् । अज्ञानां ज्ञानदाता गुणयतिशयनं शुद्धसत्वप्रकाशम् । सोऽहं सर्वात्मतत्त्वं जगदखिलपदं पूर्णबोधं पुराणम् ।। वंदे० ।। ६ ।। भक्तानामभयंकरं भवभयक्लेशापहारं शुभं । निर्विघ्नं निरुपद्रवं सुनियतं नित्योत्सवं निर्मलम् । शस्त्रोस्त्रामसहारिणं लघुनतातापत्रयोन्मूलनम् ।। वंदे० ।। ७ ।। सोहं हंसः पुराणं स्वगतवरपरं पूर्णमानंदसाक्षी । व्योमाकारं विशालं विभवप्रभवनं भूतमाद्यंतसाक्षी । ज्ञानं ज्ञानार्थसारं अहमिह नियतं अद्वितीयं अभिन्नं ।। वंदे० ।। ८ ।। इत्येवं ह्यनसूयकं प्रतिदिनं दत्ताष्टकं वै मुदा । ये शृण्वंति पठंति शुद्धमनसा गायंति ध्यायंति वा । ते धन्याः सकलाः कलासु कुशलाः संसारपारंगताः । ब्रह्मानंदमवाप्नुवंति परमं सत्यं परं शाश्वतम् ।।९।। इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यशंकराचार्यविरचितं श्रीदत्ताष्टकस्तोत्रं संपूर्णम् ।

पादुकांची आरती झाल्यानंतर म्हणण्याचें स्तोत्र ।

**श्रीपादश्रीवल्लभस्तोत्रम्.**

श्रीपादश्रीवल्लभ त्वं सदैव श्रीदत्तास्मान् पाहि देवाधिदेव । भाव-

आद्य क्लेशहारिन् सुकीर्ते घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ १ ॥ त्वन्नो माता त्वं पितासोऽधिपस्त्वं त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् । त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते ॥घो०॥२ पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं भीतिं क्लेशं त्वंहरत्वशूदन्यम् । त्रातारं नो वीक्ष्य ईशास्तजुर्ते ॥ घो० ॥ ३ ॥ नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता त्वत्तो देव त्वं शरण्यो-कहर्ता । कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते ॥ घो० ॥ ४ ॥ धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् । भावासक्तिं चाखिला-नंदमूर्ते ॥ घो० ॥ ५ ॥ श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् । प्रपठे-न्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ॥ ६ ॥

इति श्रीमंत् प० हं० पं० श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीकृतं श्रीपादवल्लभस्तोत्रं संपूर्णम्.

## पादुकास्तोत्रप्रारंभः

निषक्तमणिपादुकं नियमिताघकोलाहलं । स्फुरत्किसलयारुणं नख-समुल्लसच्चंद्रिकम् । परामृतसरोवरोर्जितसरोजरोचिष्म तत् । भजेम शिरसि स्थितं गुरुपदारविंदद्वयम् ॥ १ ॥ ब्रह्मरंध्रसरसीजलोदरे नित्य-लग्नमवदातमद्भुतम् । कुंडलीकनककांडशोभितं द्वादशांतसरसीरुहं भजे ॥ २ ॥ तस्य कंदलिककर्णिकापुटे क्लृप्तरेखमकथादिरेखया । कोणलक्षितहलक्षमंडलं भावलक्ष्यमनलालयं जजे ॥ ३ ॥ तत्पुटे पुट-तटित्कटारिमत्स्पर्धमानपरिपाटलप्रभुम् । चिंतयामि हृदि चिन्मयं सदा नादबिंदुमणिपीठमंगलम् ॥ ४ ॥ ऊर्ध्वमस्य हुतभुक्शिखासखं चिद्वि-लासपरिब्रह्मणास्पदं । विश्वाद्यस्मरमहत्छटोत्कटं व्यामृशामि युगमा-दिहंसयोः ॥ ५ ॥ तत्र नाथचरणारविंदयोः संविदासमज्ञरीमंर-दयोः । द्वंद्वमिंदुकरकंदशीतलं मानसः स्मरतु मंगलास्पदम् ॥ ६ ॥ पादुकापंचकस्तोत्रं पंचवक्त्रमुखोद्गतम् । पंचवाहक्रमप्राप्तं प्रपंचदुर्लभं स्मृतम् । इति श्रीपादुकापंचकस्तोत्रं संपूर्णम् । श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ।

## पाळणा

राग—सारंग. ताल त्रिवट

जो जो जो जो रे । सुकुमारा । दत्तात्रेय अवतारा ॥ ध्रु ॥ कमलासन विष्णु त्रिपुरारी । अत्रीमुनिचे घरीं । सत्व हरुं आले नवलपुरी । श्रम दवडीला दूरी ॥ १ ॥ प्रसन्न त्रयमूर्ती होऊनी पुत्रत्वा पावोनि । हर्ष झालासे त्रिभुवनीं । राहे ऋषिचे सदनीं ॥ २ ॥ पालख बांधियला सायासीं । निर्गुण ऋषिचे वंशीं । पुत्र जन्मला अविनाशी । अनसूयेचे कुशीं ॥ ३ ॥ षट्दश नामासी आधारे । दत्तात्रेय अवतार । कृष्णदासासी सुख थोर । आनंद होतो फार ॥ ४ ॥

श्रीदत्तात्रेय प्रसन्न । ध्यानं । दत्तात्रेयं शरणमनुदिनं दीनबंधुं मुकुंदं । नैस्त्रैपुण्ये संनिविष्टं पतिपरमामिदं बोधयंतं मुनीनां । भस्माभ्यंगं जटाभिः सुललितं दिकूपटं दिव्यरूपं । सह्याद्रौ नित्यवासं प्रमुदितममलं सद्गुरुं चारुशीलं ॥ १ ॥

### ( प्रार्थना )

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ॥ गंगापापं शशीतापं दैन्यं कल्पतरुस्तथा ॥ पापं तापं च दैन्यं च हरति श्रीगुरुदर्शनात् ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

॥ स्व

( श्रीगुरुद नु )

REFBK-0005539



दा. क्र.